अकोला । रविवार
दि. ११ मे २०२५
वर्ष : १९ अंक : ७०
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग




www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये

**मध्यस्थी केल्याचा डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा**

**सामंजस्य करार: शस्त्रविराम करण्यास दोघांची सहमती**

**सर्व प्रकारचा गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबविण्याचा निर्णय**

# शेपूट वाकडेच! अवघ्या ४ तासात पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन!

नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था

**७ मे पासून सुरू झालेले ऑपरेशन सिंदूर आज अखेर थांबविण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तान यांनी सामंजस्य करार केला असून आज सायंकाळी ५ वाजल्यापासून शस्त्रविराम करण्यास सहमती दर्शवली आहे. दोन्ही देशांनी जमीन, हवा आणि समुद्रात सर्व प्रकारचा गोळीबार आणि लष्करी कारवाई तात्काळ थांबवण्यावर सहमती दर्शवली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी याची माहिती दिली. तत्पूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही वेळापूर्वी एक्सवर पोस्ट टाकून भारत आणि पाकिस्तानदरम्यान मध्यस्थी घडवून आणण्यासाठी अमेरिकेने प्रयत्न केल्याचा दावा केला. भारत आणि पाकिस्तान शस्त्रविरामासाठी तयार झाल्याची घोषणाही त्यांनी केली. तर भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटले की, भारत आणि पाकिस्तानने आज गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबविण्याबाबत सामंजस्य करार केला आहे. भारताने सर्व प्रकारच्या दहशतवादाविरोधात आजवर कोणतीही तडजोड न करता ठाम अशी भूमिका घेतलेली आहे आणि पुढेही घेत राहिल.**

## यापुढे कोणतेही दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाईल : पाकिस्तानला इशारा





नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था

दहशतवादाच्या संदर्भात भारताने मोठा निर्णय घेतला आहे. भविष्यातील कोणतेही दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाईल. त्यानुसार त्याला चोख प्रत्युत्तर देऊ, असा इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे. तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी पश्चिम सीमेवरील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान आणि तिन्ही दलांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यापूर्वी, चौहान यांनी सिंह यांना सुरक्षेच्या परिस्थितीची माहिती दिली. गेल्या ३ दिवसांपासून भारत आणि पाकिस्तानात ड्रोन आणि मिसाईल हल्ले सुरू होते. भारताने पाकिस्तानचे सर्व हल्ले यशस्वी परतवून लावले. दरम्यान दोन्ही देशांमधील वाढता तणाव पाहता अमेरिकेने दोन्ही देशांमध्ये मध्यस्थी केली. अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर पाकिस्तान शस्त्रसंधीसाठी तयार झाला. दरम्यान या शस्त्रसंधीला स्वीकृती देताना भारताने महत्त्वाची अट टाकली. भविष्यातील कोणतेही दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाईल. त्यानुसार त्याला चोख प्रत्युत्तर देऊ, असा इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे. त्यानुसार दोन्ही देशांमध्ये आज, शनिवारी संध्याकाळी ५ वाजेपासून शस्त्रसंधी लागू करण्यात आली आहे.

पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी म्हटले की, पाकिस्तान आणि भारत यांनी तात्काळ शस्त्रविरामावर सहमती दर्शविली आहे. पाकिस्तानने नेहमीच या प्रदेशात शांतता आणि सुरक्षिततेसाठी प्रयत्न केले आहेत. संरक्षण मंत्रालयाकडून पत्रकार परिषद घेऊन आतापर्यंत झालेल्या लष्करी संघर्षाची माहिती देण्यात आली. शस्त्रविराम झाला असला तरी पाकिस्तानने यापुढे काही आगळीक झाल्यास त्याला भारतीय सैन्यदलाकडून सडेतोड उत्तर देण्यात येईल, असेही संरक्षण मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. शस्त्रविराम झाला असला तरी पाकिस्तानने यापुढे काही आगळीक झाल्यास त्याला भारतीय सैन्यदलाकडून सडेतोड उत्तर देण्यात येईल, असेही संरक्षण मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव चांगलाच वाढला होता. दरम्यान दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारताने पाकिस्तान आणि पाकिस्तानच्या नियंत्रणात असलेल्या जम्मू काश्मीर येथील दहशतवादी तळांवर हल्ला केला होता.

## जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा ड्रोन हल्ले आणि गोळीबार!

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तानमधील ८६ तास चाललेले युद्ध शनिवारी संध्याकाळी ५ वाजता संपले. दोन्ही देशांमध्ये युद्धबंदीवर सहमती झाली. पण त्यानंतर अवघ्या ४ तासांतच पाकिस्तानने युद्धबंदीचे उल्लंघन केले. जम्मू आणि काश्मीरमध्ये सीमेपलीकडून पाकिस्तानच्या प्रक्षोभक कारवाया पुन्हा एकदा तीव्र झाल्या आहेत. शनिवारी रात्री, पाकिस्तानने अनेक भागात युद्धबंदीचे उल्लंघन केले आणि जोरदार गोळीबार केला, तर काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यात एका संशयित ड्रोनमुळे स्फोट झाला. भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धाची परिस्थिती कायम आहे. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आज दुपारी ३.३५ वाजता पाकिस्तानच्या लष्करी महासंचालकांनी भारतीय लष्करी महासंचालकांना संपर्क



साधला आणि शस्त्रसंधीचा प्रस्ताव दिला. त्यानंतर भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५ वाजल्यापासून युद्धजन्य कारवाया थांबवण्याचे दोन्ही देशांनी मान्य केले. अखेर आज सायंकाळी ५.३० वाजल्यापासून पूर्णविराम मिळाला असे वाटत असतानाच रात्री ८:३० वाजता पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन करत जम्मू मधील सीमा भागात हल्ला करण्यात आला. असे म्हटले जाते की, कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडी, अगदी तशीच परिस्थिती शेजारच्या देशाची झाल्याचे पाहायला मिळत आहे. पाकिस्तानने शस्त्रसंधी भंग करत जम्मूच्या उधमपूरमध्ये आंतरराष्ट्रीय सीमेवर पाककडून गोळीबार करण्यात आला. या गोळीबारानंतर जम्मू, नौशेरा, अखनूरसह अनेक भागात ब्लॅकआऊट करण्यात आला आहे. या आगळीकीला भारतानेही चोख प्रत्युत्तर दिले आहे.

श्रीनगरमध्येही स्फोटांचे आवाज ऐकू आल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाकिस्तानने अखनूर, राजौरी आणि आरएस पुरा आंतरराष्ट्रीय सीमेवर तोफ गोळे डागल्याचे समोर आले. त्याचवेळी बारामुल्लामध्ये ड्रोन हल्ला करण्यात आला. जम्मूच्या पालनवाला सेक्टरमध्येही पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. भारतीय सैन्याला चोख प्रत्युत्तर देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## यापुढे हल्ला कराल तर खबरदार..! भारतीय सैन्याचा पाकला इशारा



नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधीची घोषणा झाल्यानंतर संरक्षण मंत्रालयानं चालू घडामोडींबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे. कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी पत्रकार परिषदेला संबोधित करताना पाकिस्तानकडून करण्यात आलेले दावे खोडून काढले. भारताच्या ब्रह्मोसचं नुकसान झाल्याचा, हवाई तळांचं प्रचंड नुकसान झाल्याचा दावा पाकिस्तानी सैन्याकडून करण्यात आला. त्यात काडीमात्र तथ्य नाही. हा दावा बिनबुडाचा असल्याचं कुरेशी यांनी सांगितलं. गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या संघर्षात पाकिस्तानचं प्रचंड नुकसान झालेलं आहे. लष्कर असो वा हवाई दल पाकिस्तानची मोठी हानी झालेली आहे, अशी माहिती व्योमिका सिंह यांनी दिली. शस्त्रसंधीची घोषणा दोन्ही देशांकडून झालेली आहे. संरक्षण मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेला कमांडर रघू नायरदेखील उपस्थित आहेत. पत्रकार परिषद संपत असताना नायर यांनी पाकिस्तानला सज्जड इशारा दिला. देशाच्या संरक्षणासाठी आम्ही सज्ज आहोत. यापुढे कोणतीही आगळीक केल्यास चोख प्रत्युत्तर देण्यात येईल. यापुढे हल्ला केलात खबरदार. आम्ही कोणत्याही हल्ल्याला उत्तर देण्यास पूर्णपणे सज्ज आहोत, असा थेट इशारा कमांडर रघू नायर यांनी दिला. पाकिस्तानने काल भारतातील काही रुग्णालये आणि शाळांवर हल्ले केल्याची माहिती भारतीय लष्कराच्या अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली आहे. शनिवारी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून पाकिस्तानच्या प्रक्षोभक आणि उत्तेजक कृती करत आहे. कर्नल सोफिया कुरेशी यांनी पत्रकार परिषदेत पुढे सांगितले की, पाकिस्तानने पंजाबमधील हवाई तळावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. कर्नल कुरेशी यांनी असेही सांगितले की, पाकिस्तानी सैन्य सीमावर्ती भागात त्यांचे सैन्य हलवत असल्याचे दिसून आले आहे. लष्करी तळांना लक्ष्य करण्याव्यतिरिक्त, पाकिस्तानने श्रीनगर, अवंतीपुरा आणि (पान २ वर)



### तापमान °C
विदर्भात आज

| जिल्हा | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | 40.6 | 27.1 |
| चंद्रपूर | 38.6 | 26.4 |
| ब्रम्हपूरी | 41.1 | 24.1 |
| अमरावती | 41.4 | 21.8 |
| वर्धा | 39.5 | 26.7 |
| नागपूर | 39.6 | 26.6 |
| यवतमाळ | 40.0 | 27.0 |
| गडचिरोली | 37.6 | 24.0 |
| वाशिम | 38.2 | 00.0 |
| भंडारा | 40.0 | 22.0 |
| गोंदिया | 38.7 | 24.8 |
| बुलढाणा | 36.6 | 24.0 |

### थोडक्यात

## राज्यभरात उद्या तिरंगा रॅली!

**मुंबई :** महायुती सरकारकडून विविध जिल्ह्यात ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ रविवार दि. ११ मे रोजी पायी यात्रेचे आणि तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीत सैन्य दलाच्या समर्थनार्थ आणि भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. त्यानंतर, भारतीय सैन्य दल आणि भारत सरकारच्या समर्थनार्थ अनेक जिल्ह्यात ही रॅली निघणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही या रॅलीत सहभाग असणार आहे. यासह महायुतीमधील अनेक मंत्री आपआपल्या जिल्ह्यातून या रॅलीत सहभाग घेणार आहेत.

## भारतीय लष्कराने केलेली कारवाई अनिवार्य होती - शरद पवार

मुंबई, दि. १० वृत्तसंस्था

पहलगाम हल्ल्यानंतर सुरू झालेला भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष आज संपुष्टात आला. आज (१० मे) संध्याकाळी ५ वाजल्यापासून दोन्ही देशांमध्ये शस्त्रविरामाबाबत एकमत झाले आहे. यादरम्यान आता यासंदर्भात राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया उमटताना पाहायला मिळत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

भारताचा कोणत्याही लष्करी तळांवर किंवा पाकिस्तानी नागरिकांवर हल्ला करण्याचा हेतू नव्हता असे शरद पवार म्हणाले आहेत. तसेच त्यांनी भारतीय लष्कराने केलेली कारवाई अनिवार्य



होती असेही म्हटले आहे. भारताने कधीच दहशतवादाचा पुरस्कार केलेला नाही. 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे भारताने केवळ दहशतवादी तळांवर प्रखर आणि अचूक कारवाई केली, कोणत्याही पाकिस्तानी लष्करी तळांवर वा सामान्य नागरिकांवर हल्ला करण्याचा हेतू नव्हता. ही कारवाई देशाच्या सुरक्षेसाठी अनिवार्य होती, असे शरद पवार म्हणाले आहेत.

पाकिस्तानकडून सातत्याने होणाऱ्या कुरघोड्यांना संयमाने आणि निर्णायक उत्तर देणं ही भारताची जबाबदारी आहे आणि भारताने ती जागतिक शांततेच्या भानासह पार पाडली आहे. भारत हा नेहमीच शांततेचा आणि संवादाचा समर्थक राहिला आहे. आणि त्यादिशेने काही घडामोडी घडत असतील तर ते स्वागतार्ह आहे. मात्र दहशतवादाविरोधात कठोर पावले उचलणं हेदेखील आंतरराष्ट्रीय समुदायाचं सामूहिक कर्तव्य आहे. शांतीच्या दिशेने टाकलेलं प्रत्येक पाऊल हे दहशतवादाविरोधात सामूहिक लढ्याचं बळ वाढवतं, असेही शरद पवार त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत.

### तर हा रक्तपात थांबला असता- ओमर अब्दुल्ला



» **जम्मू :** शस्त्रविराम करण्यास दोन्ही देशांनी सहमती दर्शवली, या घटनेनंतर जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी समाधान व्यक्त केले आहे. माध्यमांशी संवाद साधत असताना ओमर अब्दुल्ला म्हणाले, शस्त्रविरामाची जी घोषणा झाली, त्याबद्दल मी मनापासून आभार व्यक्त करतो. उशीरा का होईना, पण चांगला निर्णय झाला. दोन-तीन दिवसांपूर्वी हा निर्णय घेतला असता तर आपल्याला जो रक्तपात पाहावा लागला, तो दिसला नसता. अनेक अमूल्य जीव आपण या दिवसांत गमावले. ते जीव वाचू शकले असते. पण अखेर पाकिस्तानच्या डिजीएमओंनी फोन उचलून आमच्या डिजीएमओंशी चर्चा केली आणि शस्त्रविराम प्रत्यक्षात आला.

## शस्त्रसंधी: सिंधू जलकरारावर काय निर्णय?

नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सीमेवर गोळीबार थांबला असला, तरी पाकिस्तानसाठी दिलासा मिळण्याची शक्यता दिसत नाही. भारताने पुन्हा एकदा आपल्या मुत्सद्देगिरीचा वापर करत सिंधू जल करारावर कोणताही निर्णय घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या आशांवर पाणी फेरले गेले आहे. सिंधू जल करार सध्या स्थगितच राहणार आहे. पाकिस्तानने शस्त्रसंधीचा प्रस्ताव दिला होता, पण भारताने तो आपल्या अटींवर मान्य केला.

या संदर्भात, परराष्ट्र मंत्रालयाच्या सूत्रांनी एक महत्त्वाची माहिती दिली आहे. ती म्हणजे, सीमेवर शस्त्रसंधी करण्याचा प्रस्ताव पाकिस्ताननेच दिला होता. पण, भारताने तो स्वीकारताना काही अटी घातल्या.



### जगासाठी संदेश

» भारताने पाकिस्तानला स्पष्ट संदेश दिला आहे की, आता भारत नरमाईने घेणार नाही. मग तो सीमेवर शांतता राखण्याचा प्रश्न असो किंवा पाण्याचा, भारत आपल्या अटींवरच कायम राहणार आहे. आता पाहावं लागेल की, या मुत्सद्देगिरीच्या या फटक्यातून पाकिस्तान कसा सावरतो, की त्याच्या अडचणी आणखी वाढतात. भारताची ही भूमिका केवळ पाकिस्तानसाठीच नाही, तर संपूर्ण जगासाठी एक संदेश आहे की, भारत आपल्या सार्वभौमत्वाशी आणि हिताशी कोणतीही तडजोड करणार नाही.

त्या अटी पाकिस्तानला मान्य कराव्या लागल्या. सूत्रांनी स्पष्टपणे सांगितले की, हा काही दोन्ही बाजूंचा समझोता (पान २ वर)

# भारताने मारले पाच कुख्यात दहशतवादी!

जम्मू, दि. १० वृत्तसंस्था

**७ मे रोजी पहाटे भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये खोलवर हवाई हल्ला केला तेव्हा ऑपरेशन सिंदूरच्या सुरुवातीच्या टप्प्यात पाकिस्तानस्थित दहशतवादी गट, जश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तोयबा यांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे पाच दहशतवादी ठार मारले गेले होते. त्या पाच दहशतवाद्यांची नावं आता समोर आली आहेत.**

भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर द्वारे काश्मीर आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवाद्यांचे तळ नेस्तनाबूत केले. या एअर स्ट्राइकमध्ये ज्या दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला, त्या दहशतवाद्यांवर पाकिस्तानने



शासकीय अंत्यसंस्कार केले. अशा या पाच दहशतवाद्यांची नावं मुदस्सर खादियान खास, हाफिज मुहम्मद जमील, मोहम्मद युसूफ अझहर, खालिद उर्फ अबू आकाशा आणि मोहम्मद हसन खान अशी आहेत. लष्करी गणवेशात या दहशतवाद्यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित असलेल्या उच्च पाकिस्तानी अधिकाऱ्यांचे फोटो व्हायरल झाले होते, ज्यामुळे पाकिस्तानी सैन्य आणि दहशतवाद्यांमधील दशकांपूर्वीचे संबंध यामुळे संपूर्ण जगासमोर उघड झाले होते. भारताने पाकिस्तानच्या ध्वजात लपेटलेल्या दहशतवाद्याचा ताबूत दाखवणारा फोटो जगासमोर सादर करत, पाकिस्तान जागतिक दहशतवादात सहभागी असल्याचा निर्विवाद पुरावा सादर केला.

**मुदस्सर खादियान खास :** मुदस्सर आणि अबू जुंदाल या नावांनी ओळखला जाणारा खास हा लष्कर-ए-तोयबाशी संबंधित होता. त्याच्याकडे भारताच्या सीमेपासून सुमारे २५ किमी अंतरावर असलेल्या पाकिस्तानातील मुरीदके येथील मरकझ तैयबा या दहशतवादी छावणीचा प्रमुख होता. ही छावणी लष्कर-ए-तोयबाचे मुख्यालय होते. २००८ च्या मुंबई हल्ल्यात जिवंत पकडलेला दहशतवादी अजमल कसाबने या छावणीत प्रशिक्षण घेतले होते. २६/११ मध्ये सहभागी असलेला आणखी एक दहशतवादी डेव्हिड हेडली यानेही येथे प्रशिक्षण घेतल्याचे वृत्त आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, खासचा अंत्यसंस्कार एका सरकारी शाळेत जागतिक दहशतवादी हाफिज अब्दुल रौफ याच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. त्याच्या अंत्यसंस्काराच्या वेळी, पाकिस्तानी लष्कराने खासला गार्ड ऑफ ऑनर दिला आणि उच्च लष्करी अधिकाऱ्यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर आणि पंजाब प्रांताचे मुख्यमंत्री मरियम नवाज यांच्या वतीने पुष्पहार अर्पण केला. त्याच्या अंत्यसंस्काराला पाकिस्तानी लष्करातील लेफ्टनंट जनरल आणि पंजाब प्रांताच्या पोलिस महानिरीक्षक पदावरील एक अधिकारी उपस्थित होता.

**हाफिज मुहम्मद जमील :** जमील हा जैश-ए-मोहम्मद हा जैशचा संस्थापक मसूद अझहरचा मेहुणा होता. पाकिस्तानच्या आत सुमारे १०० किमी अंतरावर असलेल्या बहावलपूरमधील मरकझ सुभान अल्लाहचा (पान २ वर)

## भारताचा पाकिस्तानवर डिजिटल स्ट्राईक!
### ८,००० हून अधिक खाती ब्लॉक

नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था

जम्मूसह अनेक भागात पाकिस्तानच्या हल्ल्यांदरम्यान, भारताने डिजिटल आघाडीवरही एक मोठे पाऊल उचलले आहे. भारत सरकारच्या सूचनेनुसार सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सने देशातील ८,००० हून अधिक खाती ब्लॉक करण्यास सुरुवात केली आहे. ही माहिती कंपनीच्या ग्लोबल गव्हर्नमेंट अफेयर्स टीमनेच दिली.

कंपनीच्या म्हणण्यानुसार, या आदेशांमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की जर ने ही खाती ब्लॉक केली नाहीत तर कंपनीला मोठा दंड होऊ शकतो आणि भारतातील तिच्या कर्मचाऱ्यांना तुरुंगातही जावे लागू शकते. ब्लॉक केलेल्या खात्यांमध्ये आंतरराष्ट्रीय मीडिया हाऊसेस आणि काही सेलिब्रिटींचे प्रोफाइल देखील समाविष्ट आहेत. एक्स म्हणाले की, बहुतेक प्रकरणांमध्ये सरकारने या खात्यांनी कोणत्या कायद्याचे उल्लंघन केले आहे हे उघड केले नाही. अनेक प्रकरणांमध्ये, कोणतेही कारण दिले गेले नाही आणि कोणतेही पुरावे दिले गेले नाहीत. म्हणते की ते फक्त भारतातच ही खाती ब्लॉक करत आहे जेणेकरून प्लॅटफॉर्मच्या सेवा देशात सुरू राहू शकतील. कंपनीने म्हटले आहे की, आम्ही सरकारच्या आदेशांशी सहमत नाही, परंतु भारतातील लोक माहितीशी जोडलेले राहावेत म्हणून आम्हाला हा कठीण निर्णय घ्यावा लागला. एलोन मस्क यांच्या मालकीच्या या कंपनीने असेही स्पष्ट केले की त्यांना सरकारी आदेशांबाबत पारदर्शकता राखायची आहे परंतु विद्यमान कायदेशीर नियम तसे करण्यास परवानगी देत नाहीत. ही माहिती शेअर करण्यात अयशस्वी झाल्यास सरकारी जबाबदारीत अडथळा येऊ शकतो आणि मनमानी निर्णय घेतले जाऊ शकतात, असे एक्स म्हणाले.

## पान 1 वरून...

### यापुढे हल्ला कराल तर खबरदार...

उधमपूरमधील वैद्यकीय सुविधांनाही लक्ष्य केले, असे कुरेशी यांनी सांगितले. कुरेशी म्हणाल्या की, पाकिस्तानी सैन्य पश्चिम सीमेवर सतत हल्ले करत आहे. त्यांनी भारताच्या लष्करी ठिकाणांवर हल्ला करण्यासाठी ड्रोन, लांब पल्ल्याची शस्त्रे, युद्धसामग्री आणि लढाऊ विमानांचा वापर केला आहे. भारताने त्यांचे अनेक हल्ले निष्प्रभ केले आहेत. पाकिस्तानने २६ हून अधिक ठिकाणी हवाई मार्गाने घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. यामुळे उधमपूर, भूज, पठाणकोट, भटिंडा येथील हवाई दलाच्या तळांवर भारताची उपकरणे आणि जवानांना फटता बसला आहे. त्यांनी पहाटे १:४० वाजता पंजाबच्या हवाई तळाला लक्ष्य करण्यासाठी हाय-स्पीड क्षेपणास्त्रांचा वापर केला. याचबरोबर पाकिस्तानने भारतातील आरोग्य सुविधा आणि शाळांवरही हल्ला केला. शनिवारी सकाळी पाकिस्तानी हवाई दलाच्या विमानांनी श्रीनगरमध्ये हल्ला करण्याचा प्रयत्न केला, याला भारतीय सशस्त्र दलांनी प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले. शुक्रवारी रात्री आणि शनिवारी सकाळी पाकिस्तानने भारतीय सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये अनेक ड्रोन हल्ले केले.

### १२ मे रोजी डीजीएमओ चर्चा

पाकिस्तानच्या लष्करी अधिकाऱ्यांनी भारताच्या डीजीएमआय यांच्याशी आज दुपारी ३.३५ वाजता फोनवरून चर्चा केली. दोघांमध्ये दोन्ही बाजूंकडील गोळीबार, जमिनी लष्करी कारवाई तसेच हवाई आणि समुद्री कारवाई भारतीय वेळेनुसार आज संध्याकाळी ५ वाजल्यापासून थांबवण्याबाबत एकवाक्यता झाली. याबाबतच्या सूचना दोन्ही बाजूंना देण्यात आल्या आहेत. १२ मे रोजी दुपारी १२ वाजता दोन्ही देशांचे डीजीएमओ चर्चा करतील, अशी माहिती भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी दिली आहे. दोन्ही देशांत सध्या शस्त्रसंधी झालेली असली तरी अद्याप हा तणाव पूर्णपणे संपलेला नाही. याच कारणामुळे येत्या १२ मे रोजी दोन्ही देशांच्या डिजीओंमध्ये चर्चा होणार आहे. या चर्चेत शस्त्रसंधीच्या अटी आणि इतर गोष्टींवर चर्चा होणार आहे. त्यामुळे १२ मे रोजी होणाऱ्या चर्चेकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

### युद्धबंदी करण्यावर सहमती – ट्रम्प

अमेरिकेच्या मध्यस्थीने रात्रभर चाललेल्या प्रदीर्घ चर्चेनंतर भारत आणि पाकिस्तानने युद्ध विरामासाठी पूर्णपणे सहमती दर्शवली असल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी केली. याबाबतची माहिती त्यांनी  वर पोस्ट करत दिली. अमेरिकेच्या मध्यस्थीने रात्रभर प्रदीर्घ चर्चेनंतर, मला हे जाहीर करताना आनंद होत आहे की भारत आणि पाकिस्तानने पूर्ण आणि तात्काळ युद्धबंदी करण्यावर सहमती दर्शवली. समंजस भूमिका आणि मुत्सद्दीपणा दाखवल्याबद्दल दोन्ही देशांचे अभिनंदन. या मुद्याकडे लक्ष वेधल्याबद्दल धन्यवाद!, असे ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

### शस्त्रसंधी: सिंधु जलकरारावर...

नाही, तर भारताच्या कणखर भूमिकेमुळे हे शक्य झाले आहे. शस्त्रसंधी भारताच्या अटींवर झाली आणि सध्या सिंधू जल करारावर कोणतीही चर्चा होणार नाही. यावरून हे स्पष्ट होतं की, भारताने पाकिस्तानला मुत्सद्देगिरीच्या खेळात हरवले आहे. आर्थिक आणि राजकीय अडचणींनी घेरलेल्या पाकिस्तानला आता पाण्यावरूनही मोठा फटका बसणार आहे. सिंधू नदीचं पाणी पाकिस्तानच्या शेतीसाठी आणि अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचं आहे. पण, भारताने स्पष्ट सांगितलं आहे की, जोपर्यंत पाकिस्तान आपल्या कारवाया थांबवत नाही, तोपर्यंत त्याला कोणत्याही मदतीची अपेक्षा ठेवू नये. तज्ज्ञांच्या मते, भारताचा हा निर्णय पाकिस्तानसाठी मोठा धक्का आहे.

### भारताने मारले पाच कुख्यात...

तो प्रमुख होता. बहावलपूर कॅम्पचा वापर नवीन भरती, दहशतवादी प्रशिक्षण आणि दहशतवाद बनण्यास प्रवृत्त करण्यासाठी केला जात होता. ७ मे रोजी दहशतवादी कॅम्पवर झालेल्या हल्ल्यात अझहरच्या कुटुंबातील किमान १० सदस्य आणि त्याचे चार सहकारी ठार झाले, ज्यामध्ये जमील देखील ठार झाला. मोहम्मद युसूफ अझहर: मोहम्मद युसुफ अझहर उर्फ उस्ताद जी हा देखील जैशची संबंधित होता.  तो मसूद अझहरचा मेहुणा होता आणि त्याने जैश-ए-मोहम्मदसाठी शस्त्रास्त्र प्रशिक्षणाचे काम पाहिले. त्याचे नाव जम्मू-काश्मीरमध्ये अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये आणि १९९९ मध्ये आयसी-८१४ विमानाच्या अपहरणामध्ये घेतले जाते. जे कंधार अपहरण म्हणून ओळखले जाते. असा हा मोठा दहशतवादी ऑपरेशन सिंदूर करवाईत ठार झाला.

## २६ भारतीयांचा बदला:

### ७२ तासांत पाकिस्तानची कमर मोडली!

।विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. १० :देशावर पुन्हा एकदा घाव घालण्याचा प्रयत्न दहशतवाद्यांनी केला आणि २६ निष्पाप भारतीयांचे प्राण घेतले; पण यावेळी भारत गप्प बसला नाही. केवळ निषेध नाही, तर थेट कृतीतून उत्तर दिलं. तीन दिवसांत भारताने अशा स्वरूपात कारवाई केली, ज्याची कल्पनाही पाकिस्तान आणि त्याच्या समर्थकांनी केली नव्हती.**

भारतीय लष्कर आणि वायुदलाने केवळ चार महत्त्वाची दहशतवादी हेडक्वार्टर उद्ध्वस्त केली नाहीत, तर डझनभर मोस्ट वॉन्टेड अतिरेकी हवेत विरले. एकूण सुमारे ५०० फूट-सोल्जर्सना निष्क्रिय करण्यात आलं. कंदहारपासून सुरू असलेल्या दहशतवादी साखळ्यांचे हिशेब एक एक करून चुकते करण्यात आले. युद्ध भारतात नव्हतं ते पूर्णपणे पाकिस्तानच्या भूमीवर लढवलं गेलं. परिणामी, सर्वच नुकसान त्यांचंच. पाकिस्तान सैन्याचं इन्फ्रास्ट्रक्चर कोसळलं, वायुदलाची ८ तळं पूर्णतः नष्ट झाली. पाक सैन्याची रणभूमीवर दाणादाण झाली आणि त्यांच्या या केवळ ७२ तासांत सिझफायरची याचना करावी लागली.

सिंधू नदी कराराचा पुनर्विचार करत भारताने तो इतिहासजमा केला. पाकिस्तानला मिळणाऱ्या पाण्याच्या सवलती पूर्णतः बंद करण्यात आल्या. या कारवाईत भारताने चीनलाही अप्रत्यक्षपणे बेनकाब केलं. चिनी ड्रोन्स, रडार्स, मिसाईल्स यांची नाचक्की झाली. ड्रॅगन फ सका निघाला. चीन दुसऱ्या फ्रंटवर युद्ध सुरू करणार, अशी अफवा पण भारतीय सजगतेपुढे टिकली नाही. बांगलादेश मार्गे घुसखोरीचे प्रयत्न निष्फळ ठरले.

या संपूर्ण लढाईने भारतीय सैन्याला एक प्रचंड महत्त्वाचा युद्धसराव मिळाला, जो भविष्यातील सामरिक धोरणांमध्ये उपयोगी ठरणार आहे. भारताची एअर डिफ ेन्स सिस्टम आज जगासमोर उभी राहिली आहे सक्षम, शिस्तबद्ध आणि पूर्णतः विश्वासार्ह, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या या कारवाईने एक गोष्ट स्पष्ट केली, जर कोणी भारताच्या नागरिकांवर हल्ला करेल, तर भारत शांतपणे स्वीकारणार नाही, तर निर्णायक आणि प्रभावी उत्तर देईल. पाकिस्तान आणि त्याच्या झारीतील शुक्राचार्यांचा भारताने मुखवटा फाडला. पाकिस्तानचा डाव फसला आणि भारताची अर्थव्यवस्था अधिक बळकटपणे उभी राहिली.

# आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा !

### जिल्हा प्रमुख श्रीरंग पिंजरकर : जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिका, जिल्हा परिषद आणि नगरपालिकेवर भगवा झेंडा फडकवण्यासाठी सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांनी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख श्रीरंग दादा पिंजरकर यांनी केले.

येथील शासकीय विश्रामगृहात गुरुवारी (ता. ८) आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता जिल्हा प्रमुख श्रीरंग पिंजरकर व जिल्हा प्रमुख अश्विन नवले यांच्या मार्गदर्शनात जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी महानगरप्रमुख योगेश अग्रवाल, पश्चिम शहर प्रमुख रमेश गायकवाड, पूर्व शहर प्रमुख अँड.पप्पू मोरवाल, उपजिल्हाप्रमुख शशिकांत चोपडे, गोपाल म्हैसणे, निवासी उपजिल्हाप्रमुख संतोष अनासने, तालुकाप्रमुख विजय वानखडे, प्रकाश गीते, अनंत बगाडे, मुर्तीजापुर तालुका प्रमुख दीपक दांदळे, सचिन गालट, मंगेश म्हैसणे, जिल्हा समन्वयक गजानन पावसाळे, गणेश बोबडे, जिल्हा संघटक बादल सिंग ठाकूर, तालुका संघटक रमेश थुकेकर, शहर संघटक सागर पूर्णेय, राहुल जाधव,महिला समन्वयक स्वानंदीताई पांडे, महिला उपजिल्हाप्रमुख संगीताताई शुक्ला, महिला महानगरप्रमुख निशाताई ग्यारल, महिला शहर प्रमुख प्रीती मोहोळ, जयश्री तोरडमल, प्रतिभा दांगटे, युवा सेना लोकसभा प्रमुख कुणाल पिंजरकर, उपशहर प्रमुख प्रदीप काशीद, राजेश पिंजरकर, राजेश दांडेकर, प्रतीक मानेकर, नितीन बदरखे, भूषण इंदोरिया,स्वप्निल देशमुख, अश्विन लांडगे,दीपक नावकार, शुभम वानखडे, राजेश कलाने, सतीश समुद्रे, जिल्हा सचिव सतीश गोपनारायण, संजय रोहनकर, मधुकर सोनारगन ,चेतन जैन, समीर शहा, सुभाष भागवत, प्रवीण गावंडे, ऋषिकेश सोनारगन , राहुल सोनारगण उपस्थित होते. यावेळी शहर प्रमुख रमेश गायकवाड, पप्पू मोरवाल, अकोला तालुकाप्रमुख विजय वानखडे, तालुकाप्रमुख सचिन गालट महिला जिल्हा समन्वयिका स्वानंदीताई पांडे, जिल्हा समन्वयक गजानन पावसाळे यांनी आपले विचार प्रकट केले. आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने संघटन बांधणी, संघटन रचना, व निवडणुकीच्या तयारीबाबत मार्गदर्शन शिवसेना जिल्हाप्रमुख श्रीरंग दादा पिंजरकर व जिल्हाप्रमुख अश्विन नवले यांनी केले. यावेळी अकोला पश्चिम, अकोला पूर्व व पातुर विधानसभा क्षेत्रातील विविध पक्षातील कार्यकर्त्यांना शिवसेना पक्षामध्ये प्रवेश देण्यात आला. यावेळी पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी झालेल्या भारतीय नागरिकांचा मिशन सिंदूर राबवत भारत सरकारने जे सडेतोड उत्तर दिले त्या प्रित्यर्थ पहलगाम येथे मृत्युमुखी पडलेल्या भारतीय नागरिकांना मिशन सिंदूर हीच खरी श्रद्धांजली या भावनेने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार महानगर प्रमुख योगेश अग्रवाल यांनी केले, अशी माहिती जिल्हा प्रसिद्ध प्रमुख शंकर जोगी यांनी दिले.

## भुसावळ विभागात जीवनदायी रक्तदान शिबिर



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** स्थानिक आरोग्य व्यवस्थेला मदत करणे आणि रेल्वे कुटुंबीय तसेच सामान्य जनतेमध्ये स्वयंप्रेरित रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी ९ मे २०२५ रोजी भुसावळ विभागाने विभागीय रेल्वे रुग्णालय, भुसावळ येथे भारतीय रेड क्रॉस सोसायटी ब्लड बँक, जळगाव यांच्या सहकार्याने जीवनदायी रक्तदान शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

या शिबिराला महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांची उपस्थिती होती . जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहून सहभागी रक्तदात्यांचे त्यांच्या उदात्त कार्याबद्दल अभिनंदन केले आणि आणि स्वत:ही रक्तदान करून एक प्रेरणादायी उदाहरण ठेवले. या शिबिरामध्ये भुसावळ विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्रीमती इति पाण्डेय, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (प्रशासन) सुनीलकुमार सुमन, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (तांत्रिक) एम.के. मीणा, मुख्य वैद्यकीय अधीक्षक श्रीमती मंगला नारायणे, तसेच विविध वरिष्ठ शाखाधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी सक्रिय सहभाग घेतला. विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्रीमती इति पाण्डेय यांनी सर्व रक्तदात्यांचे मन:पूर्वक आभार मानले आणि भारतीय रेल्वे केवळ परिवहनच नव्हे तर सामाजिक कल्याणातही आपले योगदान देत असल्याचे नमूद केले. या शिबिरामध्ये एकूण १४३ रेल्वे कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी रक्तदान केले. संकलित रक्ताच्या पिशव्या अनेक गंभीर रुग्णांचे प्राण वाचविण्यात मदत करतील. शिबिर वैद्यकीय देखरेखीखाली व स्वच्छतेच्या दृष्टीने काटेकोर पद्धतीने करण्यात आले.भुसावळ विभाग आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी ब्लड बँक, जळगाव यांच्यातील ही सहकार्याची भागीदारी समाजाच्या आरोग्यदायी उभारणीसाठी एक सकारात्मक पाऊल आहे आणि स्वयंप्रेरित रक्तदान संस्कृतीला चालना देणारी ठरते.

## शहिदांच्या वारसांचे प्रश्न संवेदनशीलतेने सोडवावेत- शंभूराज देसाई

सातारा, दि. १० वृत्तसंस्था



जिल्ह्यातील वीर माता, वीर पत्नी किंवा त्यांचे कायदेशीर वारस यांना शासकीय जमीनवाटपाबाबत शासनाचे धोरण असून, सैनिकांबाबतचे प्रश्न यंत्रणेने संवेदनशीलतेने सोडवावेत. ज्यांना शासकीय जमिनी देय आहेत अशांना पर्यायी जागा दाखविण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. शहिदांच्या वारसांना जमीन वाटपासंदर्भातील कामकाजाचा आढावा पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी घेतला. या वेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्यासह शहिदांचे वारस उपस्थित होते.युद्धात किंवा युद्धजन्य परिस्थितीत किंवा कोणत्याही लष्करी कारवाईत वीरमरण आल्यास अशा जवानांच्या अथवा अधिकाऱ्यांच्या विधवा किंवा त्यांचे कायदेशीर वारस यांना शेती प्रयोजनार्थ दोन हेक्टर कोरडवाहू जमीन देण्याबाबतचे शासनाचे धोरण आहे.

## कांदळवन क्षेत्रातील अतिक्रमणे हटवा- वनमंत्री गणेश नाईक

नवी मुंबई, दि. १० वृत्तसंस्था

नवी मुंबई क्षेत्रातील कांदळवन भागात असलेली अतिक्रमणे तात्काळ हटवण्याचे आदेश वनमंत्री गणेश नाईक यांनी नवी मुंबई महापालिकेला दिले आहेत. बैठकीत नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे तसेच पालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कांदळवन क्षेत्रात असलेल्या अतिक्रमण संदर्भात बैठकीत नाईक यांनी कांदळवन क्षेत्रातील अतिक्रमणे हटवण्याचे निर्देश नवी मुंबई महापालिका आयुक्तांना दिले.

## राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पक्षाने राबविले सदस्य नोंदणी अभियान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला , दि. १० :** आज राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पक्षाच्या वतीने राष्ट्रवादी सदस्य नोंदणी अभियान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महानगर अध्यक्ष विजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबवीण्यात आले.हे अभियान प्रभाग क्रमांक १९ कौलखेड चौक येथे राबविण्यात आले आहे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महानगर अध्यक्ष विजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले आहे या कार्यक्रमाला महिला आघाडी संघटिका मंदाताई देशमुख राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक तथा गटनेते मनोज गायकवाड राष्ट्रवादी विधार्थी काँग्रेस पक्षाचे महानगर अध्यक्ष वैभव घुगे यांच्या नेतृत्वामध्ये राबविण्यात आले आहे या अभियानात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पक्षाचे सोशल मीडिया प्रमुख गौरव चव्हाण,संदीप खंडारे,नितीन ताजने, यश तायडे, दर्शन खेळकर,अभिषेक काकड, भूषण नागे आदी पदाधिकारी उपस्थित होते

## गाळयुक्त शिवार योजनेत निवडकांना लाभ?

### जलसंधारण विभागावर रिपब्लिकन परिषदेचे आरोप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** गाळयुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत काम वाटप करताना जलसंधारण विभागाकडून निवडक संस्थांना मर्जीने काम देण्यात आल्याचा आरोप करत रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेकडून जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या योजनेच्या नावाखाली आर्थिक अपहार होत असून, संबंधित कर्मचाऱ्यांकडून कार्यालयाबाहेरच आर्थिक व्यवहार चालत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

जिल्हा जलसंधारण कार्यालयातील कर्मचारी चंद्रशेखर खंडेराव यांच्याकडून चुकीची माहिती देत दिशाभूल करण्यात येत असल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना गाळाचे वाटप करताना गरजू व सामान्य शेतकऱ्यांऐवजी मर्जीतील शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोपही रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेकडून करण्यात आला.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अकोला जिल्हाध्यक्ष आकाश हिवराळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. ही मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला.

जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर यांना हे निवेदन देण्यात आले. यावेळी आदित्य अवचार, वैभव अवचार, अजित निखाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खड्ड्यांचा अकोला, अतिक्रमणाचे साम्राज्य : मनपाला निवेदन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि.१० :** अकोला शहरात वाढत्या नागरी समस्या, वाहतूक अडथळे, रस्त्यांची दुर्दशा आणि अतिक्रमण यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर 'अकोला संरक्षण व संवर्धन समिती'च्या 'दखल' या उपक्रमांतर्गत मनपा आयुक्त श्री. सुनील लहाने यांना निवेदन सादर करण्यात आले. डॉ. अशोक ओळंबे आणि प्रदीप गुरुखुद्दे यांनी समस्यांवर सविस्तर चर्चा करत उपाययोजना करण्याचे आवाहन केले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जुने व नवीन शहर जोडणाऱ्या लोखंडी पुलावर अतिक्रमणामुळे दररोज वाहतूक कोंडी होते. पुलावरील रेलिंग तुटले असून अनेक ठिकाणी विक्रेते व्यवसाय करत आहेत. हा प्रश्न वाहतूक पोलीस, मनपा आणि प्रशासनाने संयुक्तपणे सोडवावा. डाबकी रोडवरील रुंदीकरणाचे काम रखडले असून दोन्ही बाजूंनी खोदलेले खड्डे पावसात अपघाताला कारणीभूत ठरू शकतात. हे खड्डे भरून काम गतीने पूर्ण करण्यात यावे. टीडीआरचा मोबदला लवकर मिळावा, अशीही मागणी करण्यात आली. डाबकी रोड रेल्वे गेटजवळ विनाकारण खोदलेला रस्ता सुरळीत करावा.खोलश्वर रोडवर असलेला दीर्घकालीन खड्डा वारंवार अपघाताला कारणीभूत ठरतो आहे. स्पीडब्रेकर काढून हा खड्डा कायमस्वरूपी बुजवावा. गोरक्षण रोडवर रस्त्यावर सुरू असलेल्या दुकानांमुळे वाहतूक ठप्प होत आहे. अतिक्रमित विक्रेत्यांना पर्यायी जागा द्यावी.तसेच, मनपातील एलईडी स्क्रीन वॉल नागरिकांना दिसेल अशा सार्वजनिक ठिकाणी बसवावी, असेही सूचवण्यात आले. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षकांना देण्यात आली आहे.

## खासगीकरण सहकार चळवळ संपुष्टात – नितीन गडकरी

राहाता , दि. १० वृत्तसंस्था

सहकार चळवळीचे खासगीकरण झाल्यामुळे ही चळवळ संपुष्टात आली. या प्रवृत्तीमुळे अनेक सहकारी संस्था आजारी होत पुढे बंद झाल्या, अशी खंत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी येथे व्यक्त केली. विदर्भातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी आपण पुढील आयुष्य खर्च करणार असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या 'देह वेचावा कारणी' या आत्मचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते शुक्रवारी लोणी येथे करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यास जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार शिवाजी कर्डिले, मोनिका राजळे, काशिनाथ दाते, विठ्ठल लंघे, विक्रमसिंह पाचपुते, अमोल खताळ, तसेच प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे, डॉ. सुजय विखे, शालिनी विखे, सुवर्णा विखे, भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर व दिलीप भालसिंग आदी उपस्थित होते.



ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना विंधन विहीर देण्याची योजना होती, परंतु या सरकारी योजना केव्हा येतात व केव्हा जातात, हे कळत नाही अशी अप्रत्यक्ष टीका गडकरी यांनी सरकारवर केली. मंत्री विखे यांनी जलसंपदा विभागाच्या माध्यमातून जिल्ह्याची सिंचन क्षमता ६० ते ६५ टक्क्यांनी वाढवावी, असे आवाहन करून गडकरी म्हणाले, की शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करावी.

'त्या' एका डायलॉगने संपलं करिअर, आमिर-शाहरुखला टक्कर देणारा अभिनेता अचानक झाला गायब, नाव बदललं अन 'ऑपरेशन सिंदूर' व भारताचा अपमान करणं भोवलं, फवाद-महिरासह सर्व पाकिस्तानी कलाकारांवर आजीवन बंदी

भारत-पाक तणावादरम्यान बलुचिस्तान का करतोय पाकिस्तानावर हल्ला? वाचा हा प्रदेश पाकिस्तानपासून वेगळा का होऊ इच्छितो?

ज्ञान हीच शक्ती समजून लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी सहकार चळवळीचा आधार घेऊन उभे केलेले काम सामाजिक, आर्थिक समता निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरले. याच विचाराने ग्रामीण विकासाचा निर्देशांक २६ टक्क्यांपर्यंत आपल्याला न्यावा लागेल.

लोकनेते विखे पाटील यांनी आपल्या गुणात्मक कार्यातून वेगळे स्थान निर्माण केले. या पाठीमागे त्यांचा त्याग होता, लोकांशी बांधिलकी होती. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव व बाळासाहेब यांच्या कार्यातील विचार प्रेरणादायी असल्यानेच अशा व्यक्तींना यश मिळते. या भागात सहकारातून शैक्षणिक प्रकल्प उभारून त्यांनी ग्रामीण भागाचा सुखांक वाढविण्याचा प्रयत्नही केल्याचे गडकरी यांनी सांगितले.

## पुण्यातील जिल्हा प्रशासन, पोलीस अलर्ट मोडवर; लोहगाव एअरपोर्टबाबत महत्त्वाचे निर्देश

पुणे , दि. १० वृत्तसंस्था

भारत पाकिस्तान सिमेवर सुरू असलेल्या धुमशचक्रीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहर आणि जिल्ह्यातील प्रशासन अलर्ट मोडवर आले असून, पोलिसांनीही जिल्ह्यातील सर्व संवेदनशील ठिकाणांवर सुरक्षा व्यवस्था चोख ठेवली आहे. एनडीए, आयुध निर्माण फॅक्टरी, रेल्वे स्थानकं, विमानतळ, जिल्ह्यातील महत्त्वाची धार्मिक स्थळे व महत्त्वाच्या प्रशासकीय इमारती अशा अनेक ठीकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. स्थानिक पोलिस, विशेष पोलिस दले, निमलष्करी दलातील जवान, या ठिकाणी पहारे देत आहेत. रेल्वे पोलिसांनीही जिल्ह्यातील सर्वच स्थानकांवर सुरक्षा कडक केली असून, स्थानकावर येणाऱ्या प्रवाशांसह प्रत्येकाची कसून तपासणी करण्यात येत आहे.

युध्दस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने सर्व जिल्ह्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले असून, जिल्हयातील आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा चोवीस तास कार्यरत ठेवण्याबाबत राज्याच्या मुख्य सचिवांनी सूचना केल्या आहेत. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने नागरिकांमध्ये जनजागृती करून, अफवांना आळा घालावा, चुकीच्या माहितीचे त्वरित खंडन करावे असे या सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे.सध्या सोशल मिडियावरून चुकीची व खोटी माहितीही मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

## थोडक्यात

### पाकिस्तानचे हल्ले परतवून लावण्यात भारताला यश; हरियाणात सापडले क्षेपणास्त्रासारखे अवशेष



**नवी दिल्ली :** पाकिस्तानने हरियाणाच्या सिरसाच्या दिशेने केलेला हवाई हल्ला रोखण्यात भारतीय लष्कराला यश आलं आहे. सिरसाच्या जिल्हा प्रशासनाने म्हटलंय की क्षेपणास्त्रासारखं अवशेष सिरसाच्या दोन ठिकाणी आढळून आले आहे. भारत पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढत जात असून पाकिस्तानने भारताच्या नागरी वस्तीत हल्ले करायला सुरुवात केली आहे. पण पाकिस्तानचा प्रत्येक हल्ला परतवून लावण्याचा चोख प्रयत्न भारताकडून सुरू आहे. भारतीय लष्कराचे तिन्ही दल अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पाकिस्तानच्या हालचालींवर लक्ष ठेवत असून त्यांची प्रत्येक कारवाई हाणून पाडली जात आहे. दरम्यान, हरियाणाच्या सिरसा येथे क्षेपणास्त्राचे अवशेष सापडले आहेत. सिरसा जिल्हा प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, हवाई दलाच्या तळाजवळील सिरसा येथील शेतात दोन ठिकाणी क्षेपणास्त्रासारख्या वस्तूंचे अवशेष आढळले. भारतीय हवाई दल आणि जिल्हा पोलिसांच्या पथकांनी दोन्ही ठिकाणी पोहोचून मलबा गोळा केला आणि तो बाहेर काढला. शुक्रवारी संध्याकाळपासून, पंचकुला, अंबाला आणि पानिपत या हरियाणातील तीन जिल्ह्यांमध्ये संध्याकाळी ७ वाजल्यापासून पूर्णपणे वीजपुरवठा खंडित झाला.

### पंजाबमध्ये रेड अलर्ट! दारे-खिडक्यांपासून लांब राहा



**नवी दिल्ली :** पाकिस्तानला लागून असलेल्या भारतातील राज्यांना सर्वाधिक धोका आहे. राजस्थानसह पंजाबमध्ये सरकारने रेड अलर्ट जारी केला आहे. शुक्रवारी रात्री पंजाबच्या फिरोजपूरमध्ये झालेल्या संभाव्य ड्रोन हल्ल्यात तीन जण जखमी झाले. फिरोजपूरचे एसएसपी भूपिंदर सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पठाणकोटवर संशयास्पद ड्रोन देखील दिसले आणि सुरक्षा दल त्यांच्याशी सक्रियपणे संपर्क साधत होते. या पार्श्वभूमीवर पंजाबमध्ये नागरिकांना घराबाहेर न पडण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.फिरोजपूर आणि पठाणकोटमध्येही स्फोट झाल्याची नोंद झाली आहे. भारताने त्यांच्या हवाई क्षेत्रातून अनेक पाकिस्तानी क्षेपणास्त्रे रोखल्यानंतर पाकिस्तानने भारतावर हल्ला केला. भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी त्यांच्या निवासस्थानी तातडीची मंत्रिमंडळ बैठक बोलावली आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील १० सहकाऱ्यांना राज्यात काम करण्यास आणि सीमावर्ती भागात राहण्यासाठी नियुक्त केले. तसंच, जनतेच्या संपर्कात राहण्याचेही आदेश सरकारने नेत्यांना दिले आहेत.चंदीगड विमानतळाभोवती हवाई हल्ल्याची भीतीअधिकाऱ्यांनी शुक्रवारी मोहाली आणि पंचकुलासह चंदीगड विमानतळाभोवतीच्या भागात तातडीने इशारा जारी केला.

### पाकिस्तानच्या गोळीबारात आयुक्त राजकुमार थापांचा मृत्यू



**राजौरी :** : जम्मू आणि काश्मीरमधील राजौरी येथे पाकिस्तानच्या गोळीबारात अतिरिक्त जिल्हा विकास आयुक्त राज कुमार थापा यांचा मृत्यू झाला आहे. जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी एक्स वर पोस्ट करून ही माहिती दिली आहे.राजौरी शहरातील त्यांच्या निवासस्थानी झालेल्या गोळीबारात राजौरीचे अतिरिक्त उपायुक्त राजकुमार थापा आणि त्यांचे दोन कर्मचारी गंभीर जखमी झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, आयुक्त राज कुमार थापा यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले, तर त्यांच्या कर्मचाऱ्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी थापा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.त्यांनी ट्विटरवर पोस्ट करत म्हंटल की, ''राजौरीहून आलेली विनाशकारी बातमी. आपण जम्मू-काश्मीर प्रशासकीय सेवेतील एक समर्पित अधिकारी गमावला आहे.

# भारत-पाक तणावामुळे जगातील महाशक्तींना टेन्शन

**नवी दिल्ली, दि.१०** वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तान यांच्यात सध्या तणावाची स्थिती आहे. कोणत्याही क्षणी या दोन्ही देशांत युद्ध भडकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दोन्ही देश एकमेकांवर रॉकेट हल्ले, क्षेपणास्त्र डागत आहेत. असे असताना आता जगातील महाशक्ती असलेल्या जी-७ देशांनी एकत्र येत भारत-पाक तणावावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. जी-७ देशांनी दोन्ही देशांना चर्चेतून प्रश्न सोडवण्याचे आवाहन केले आहे.

जी-७ देशांनी भारत आणि पाकिस्तान यांनी एकमेकांशी थेटपणे चर्चे करावी, असा आग्रह केला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शत्रूत्त्व आणखी वाढत चालले आहे. असे असतानाच जी-७ देशांनी ही भूमिका घेतली आहे.जी-७ देशांत कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, ब्रिटन अमेरिका आणि युरोपीयन संघांच्या परराष्ट्र मंत्री तसेच उच्च प्रतिनीधींनी दोन्ही देशांनी त्यांच्यातील तणाव कमी करावा असे आवाहन केले आहे. शनिवारी जी-७ राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी एक अधिकृत निवेदन जारी केले आहे. या निवेदनाच्या माध्यमातून भारत आणि पाकिस्तानला




आवाहन करण्यात आले आहे.'आम्ही दोन्ही देशांतील नागरिकांच्या सुरक्षेची आम्हाला चिंता आहे. हा तणाव कमी करण्याचे आम्ही आवाहन करतो. तसेच शांतीसाठी थेट चर्चेत सहभागी होण्यासाठी आम्ही या देशांना प्रोत्साहित करतो आहोत. या दोन्ही देशात चालू असलेल्या घडामोडींवर आमचे बारिक लक्ष आहे. तत्काळ आणि कायमस्वरुपी राजकीय तोडगा काढण्याचे आम्ही समर्थन करतो,' अशी भूमिकाही जी-७ देशांनी घेतली

### दोन्ही देशांनी संयम बाळगावा

'आम्ही कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, ब्रिटन आणि अमेरिका हे जी-७ देशांचे परराष्ट्रमंत्र तसेच युरोपीयन संघाचे उच्च प्रतिनिधी २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करतो. आम्ही भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी संयम बाळगावा असा आग्रह करतो. लष्करी कारवाईमुळे मोठा आणि गंभीर धोका निर्माण होऊ शकतो,' असं जी-७ देशांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

आहे.दरम्यान, २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. पहलगाम हल्ल्याचे उत्तर म्हणून भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले. या मोहिमेअंतर्गत भारताने पाकव्याप्त काश्मीर तसेच पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्ध्वस्त करून टाकले. त्यानंतर शुक्रवारच्या रात्री म्हणजेच ९ मे रोजी पाकिस्तानने भारताच्या सीमाभागातील राज्यांत हल्ले केले. राजस्थान, जम्मू, पंजाब यासारख्या राज्यांना पाकिस्तानने लक्ष्य केलं आहे.

## पाकिस्तानला 'आयएमएफ'कडून मोठी आर्थिक मदत; भारताच्या विरोधानंतरही कर्ज मंजूर

**नवी दिल्ली दि.१०** वृत्तसंस्था



पाकिस्तानला भारताला डिवचणं चांगलचे महागात पडले आहे. आधीच आर्थिक संकटाचा सामना कराव्या लागणाऱ्या पाकिस्तानला मित्र देशांकडे हात पसरण्याची वेळ आली आहे. यातच भारताच्या विरोधानंतर आयएमएफने पाकिस्तानला एक अब्ज डॉलरचे कर्ज मंजूर केले आहे. अशातच आता आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आयएमएफने पाकिस्तानला काही अंशी दिलासा दिला आहे.

आयएमएफकडून पाकिस्तानसाठी १ अब्ज डॉलर्सच्या हप्त्याला मिळालेली मंजुरी ही महत्त्वाची असल्याचं शाहबाज शरीफ यांच्या कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. कार्यकारी मंडळाने पाकिस्तानसाठी ७ अब्ज डॉलर (अंदाजे ६० हजार कोटी रुपये) च्या कर्जाच्या पुनरावलोकनानंतर १.३ अब्ज डॉलरच्या पहिल्या हप्त्याला मान्यता दिली आहे. हे कर्ज २ वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात आले आहे. मात्र पाकिस्तानला दिली जाणारी मदत ही दहशतवादी कारवायांसाठी वापरली जाईल, असा इशारा भारताने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला दिला होता.

## परराष्ट्र मंत्री जयशंकर यांच्याशी अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्यांनी केली चर्चा

**नवी दिल्ली, दि१०** वृत्तसंस्था

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला सडेतोड प्रत्युत्तर दिलं. यानंतर दोन्ही देशांमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. हा तणाव निवळावा या हेतूने अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांच्याशी चर्चा केली.ऑपरेशन सिंदूर राबवत भारताने पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केली. यानंतर पाकिस्तानकडून भारतीय भूभागांवर ड्रोनने सतत हल्ले केले जात आहेत.



पाकिस्तानच्या बाजूने रात्री झालेल्या हल्ल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये सकाळी जी दृष्ये समोर आली आहेत, त्यामध्ये जम्मू काश्मीरच्या रहिवासी भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. तसेच अनेक घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.जम्मू-काश्मीरच्या उरीमध्ये पाकिस्तानच्या गोळीबारात रहिवासी परिसरातील घरांचे मोठे नुकसान झाले आहे.

## पाकिस्तानचे अमानवी कृत्य; भारतातील रुग्णालये आणि शाळांवर हल्ले

**नवी दिल्ली, दि.१०** वृत्तसंस्था

### सोफिया कुरेशी यांनी दिली माहिती



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले केले होते. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यामातून केलेल्या या लष्करी कारवाईनंतर पाकिस्तान सातत्याने भारतातील शहरांवर हल्ले करण्याचा प्रयत्न करत आहे. अशात पाकिस्तानने काल भारतातील काही रुग्णालये आणि शाळांवर हल्ले केल्याची माहिती भारतीय लष्कराच्या अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली आहे.

शनिवारी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून पाकिस्तानच्या प्रक्षोभक आणि उत्तेजक कृती करत आहे. कर्नल सोफिया कुरेशी यांनी पत्रकार परिषदेत पुढे सांगितले की, पाकिस्तानने पंजाबमधील हवाई तळावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. कर्नल कुरेशी यांनी असेही सांगितले की, पाकिस्तानी सैन्य सीमावर्ती भागात त्यांचे सैन्य हलवत असल्याचे दिसून आले आहे. लष्करी तळांना लक्ष्य करण्याव्यतिरिक्त, पाकिस्तानने श्रीनगर, अवंतीपुरा आणि उधमपूरमधील वैद्यकीय सुविधांनाही लक्ष्य केले, असे कुरेशी यांनी शनिवारी सकाळी सांगितले.

यावेळी माहिती देताना कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या की, ''पाकिस्तानी सैन्य पश्चिम सीमेवर सतत हल्ले करत आहे. त्यांनी भारताच्या लष्करी ठिकाणांवर हल्ला करण्यासाठी ड्रोन, लांब पल्ल्याची शस्त्रे, युद्धसामग्री आणि लढाऊ विमानांचा वापर केला आहे. भारताने त्यांचे अनेक हल्ले निष्प्रभ केले आहेत. पाकिस्तानने २६ हून अधिक ठिकाणी हवाई मार्गाने घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. यामुळे उधमपूर, भूज, पठाणकोट, भटिंडा येथील हवाई दलाच्या तळांवर भारताची उपकरणे आणि जवानांना फटता बसला आहे.

त्यांनी पहाटे १:४० वाजता पंजाबच्या हवाई तळाला लक्ष्य करण्यासाठी हाय-स्पीड क्षेपणास्त्रांचा वापर केला. याचबरोबर पाकिस्तानने भारतातील आरोग्य सुविधा आणि शाळांवरही हल्ला केला.''दरम्यान, शनिवारी सकाळी पाकिस्तानी हवाई दलाच्या विमानांनी श्रीनगरमध्ये हल्ला करण्याचा प्रयत्न केला, याला भारतीय सशस्त्र दलांनी प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले. शुक्रवारी रात्री आणि शनिवारी सकाळी पाकिस्तानने भारतीय सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये अनेक ड्रोन हल्ले केले. परंतु, भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने परतावून लावले.

## पाकिस्तानच्या डोक्यात अणुबॉम्ब हल्ल्याचा विचार?

**नवी दिल्ली, दि.१०** वृत्तसंस्था



भारत-पाकिस्तान तणाव वाढत असतानाच एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी नॅशनल कमांड अथॉरिटीची इमर्जन्सी बैठक घेतली आहे. महत्त्वाचे म्हणजे नॅशनल कमांड अथॉरिटीकडे अणुबॉम्बच्या नियंत्रणाची जबाबदारी आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या डोक्यात अणुबॉम्ब हल्ल्याचा विचार सुरु आहे की काय अशी शंका उपस्थित होते आहे.

ऑपरेशन सिंदूरनंतर दोन्ही देशातील तणाव प्रचंड वाढला आहे. पाकिस्तानकडून सलग दोन दिवसांपासून ड्रोन आणि मिसाईल हल्ले करण्यात येत आहेत. विशेष म्हणजे पाकिस्तानने भारतच्या नागरी वस्त्यांनाही लक्ष्य केलं आहे. या हल्ल्यात चार ते पाच जण जखमी झाल्याची माहिती आहे. याशिवाय एका अधिकाऱ्याचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, पाकिस्तानच्या या हल्ल्याला भारतानेही चोख प्रत्युत्तर दिलं आहे.

## पाकमधील बलुचिस्तान प्रांताची स्वातंत्र्याची घोषणा

**क्वेट्टा, दि.१०** वृत्तसंस्था




पाकिस्तानातील एक प्रांत बलुचिस्तान येथील बलुच आर्मीने पाकच्या एक तृतीयांश प्रांतावर ताबा मिळवत स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा केली. बलुच लिबरेशन आर्मीच्या या घोषणेने पाकिस्तानपुढे गंभीर आव्हान उभे राहिले आहे. दरम्यान, बलुच लिबरेशन आर्मीच्या तडाख्याने अनेक पाकिस्तानी सैनिकांनी पलायन केले आहे.

अफगाणिस्तान आणि इराण सीमेलगत असलेल्या भागावर नियंत्रण मिळवले असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. याशिवाय पाकिस्तानी लष्कराने आपल्या काही चौकी सोडून माघार घेतली असून, सध्या पाकिस्तानच्या अनेक भागांत आणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. नागरिकांना घराबाहेर न पडण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्याचाही दावा 'बीएलए'ने केला आहे.

'बीएलए'ने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मस्टंग आणि लाखी भागात त्यांनी पाक लष्कर व त्यांच्या सहयोगींवर सहा वेगवेगळ्या ठिकाणी हल्ले केले. या कारवायांत रिमोट कंट्रोल आणि इम्प्रोव्हाईज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाईसेस (आयईडी) चा वापर करून पाकिस्तानी लष्कराच्या गुप्तचर आणि संवाद यंत्रणा असलेल्या टॉवर्सना लक्ष्य करण्यात आले.

गुरुवारी पहाटे साडेचार वाजता जमरानच्या ढांग भागात 'बीएलए'ने पाक लष्कराच्या बॉम्ब निकामी पथकावर (बीडीएस) हल्ला केला.

## 'ऑपरेशन सिंदूर'मुळे दाऊद लटपटला

### पाकने सुरक्षित ठिकाणी हलविले; छोटा शकील, मुन्ना झिंगडाचीही पळापळ

**इस्लामाबाद , दि.१०**वृत्तसंस्था



भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर' आणि ड्रोन हल्ल्यांनंतर अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याच्यासह छोटा शकील आणि मुन्ना झिंगडा हे तिघेही गर्भगळीत झाले असून, त्यांना पाकिस्तानने सुरक्षित ठिकाणी हलवल्याची माहिती समोर आली आहे. विशेषतः, जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय भारताने उडवून दिल्यानंतर दाऊद इब्राहिम बिथरला आहे.

'ऑपरेशन सिंदूर' राबवत भारताने हल्ला केल्यानंतर भारतीय सुरक्षा यंत्रणा पाकिस्तानवर बारीक लक्ष ठेवून आहेत. याचदरम्यान, दाऊद इब्राहिम भारताच्या हल्ल्यामुळे भेदरला आहे. अट्टल गुन्हेगार छोटा शकील आणि मुन्ना झिंगडा हेही दाऊदसोबत आहेत.

हे तिघेजण पाकिस्तान सोडून इतर देशात पळून गेल्याचीही शक्यता वर्तविली जात आहे. भारतीय संरक्षण यंत्रणा या माहितीची पडताळणी करत आहेत. कारण, बऱ्याचदा दिशाभूल करण्यासाठी अशी माहिती हेतूपूर्वक पेरली जात असते.

कराचीतील क्लिफ्टन या उच्चभ्रूंच्या वसाहतीत दाऊद गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्याला आहे. त्याला 'आयएसआय' या पाकिस्तानच्या लष्करी गुप्तचर संस्थेने संरक्षण कवच पुरविल्याचे सांगितले जाते. मात्र, भारताच्या लष्करी कारवाईमुळे तो आपल्या साथीदारांसह जीव वाचवण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी गेला आहे. त्याने कराचीतून पळ काढला आहे. त्याला कराचीतून बाहेर काढण्यामागे 'आयएसआय' असल्याची चर्चा आहे. त्याला पाकिस्तानमध्येच दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आल्याची माहितीही सूत्रांकडून मिळत आहे.

### विदेशात पळ काढल्याची चर्चा

सूत्रांकडून मिळालेल्या आणखी एका माहितीनुसार, दाऊद, छोटा शकील आणि मुन्ना झिंगडा हे पाकिस्तान सोडून परदेशात पळून गेले आहेत. भारतीय सैन्य दलाकडून केल्या जात असलेल्या कारवाईत आपलाही गेम होऊ शकतो, या भीतीमुळे हे तिघेही भेकडासारखे अन्यत्र पळून गेले आहेत.

## नागपूरनिर्मित 'पिनाका' भारत-पाक सीमेवर ; पोखरणमध्ये अलीकडेच सराव

**नागपूर, दि.१०** वृत्तसंस्था

भारतीय सैन्याने राजस्थानमधील पोखरणमध्ये स्वदेशी बनावटीच्या पिनाका क्षेपणास्त्राचा अलीकडेच सराव केला होता. ते आता पाकिस्तानला प्रत्युत्तर देण्यासाठी सीमेवर सज्ज करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान मध्ये वाढत चाललेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर शस्त्रसज्जता करण्यात आली आहे. पिनाका क्षेपणास्त्र संपूर्णतः भारतीय बनावटीचे असून प्रचंड शक्तिशाली आहे. त्याची निर्मिती संरक्षण संशोधन व विकास संघटनेने (डीआरडीओ) केली असून प्रारंभी नागपूर आणि विदर्भातील आयुध निर्माणीत त्याचे उत्पादन झाले. आता त्याला मोठी मागणी आहे. त्यामुळे सोलर एक्सप्लोसिव्ह कंपनीला देखील उत्पादन करण्याचे काम देण्यात आले आहे.

पिनाका क्षेपणास्त्रात केवळ ४४ सेकंदात ७२ रॉकेट लॉन्च करण्याची क्षमता आहे. तसेच



### शत्रूला धडकी भरविण्यासाठी सराव

पिनाका क्षेपणास्त्राच्या वेगवेळ्या आवृत्त्या तयार आहेत. नवीन आवृत्ती ९० किलोमीटरपर्यंचे लक्ष्य गाठू शकते. एकाचवेळी अनेक रॉकेट सोडता येतात. युद्धाच्यावेळी लक्ष्यावर हल्लाबोल करणे हे या क्षेपणास्त्राचे प्रमुख काम आहे. 'ऑपरेशन सिंदूर'पूर्वी पाकिस्तानाविरुद्ध भारताची तयारी दर्शवण्यासाठी त्याचा सराव करण्यात आला, असे सूत्रांनी सांगितले.

६० ते ९० किलोमीटरपर्यंत मारा करता येतो. शिवाय अचूक लक्ष्य टिपले जाऊ शकते. हे क्षेपणास्त्र भारताच्या आत्मनिर्भर भारत उपक्रमाचा भाग आहे. भारताकडे वार्षिक ५ हजारपेक्षा अधिक क्षेपणास्त्र निर्मितीची क्षमता आहे. त्यामुळे अधिक काळ चालणाऱ्या युद्धासाठी त्यांची उपलब्धता होऊ शकते. सध्या सुरू असलेल्या युद्धातही पिनाकाचा वापर केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे एका निवृत्त अधिकाऱ्याने सांगितले.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

अजिंक्य भारत
आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ.
ajinkyabharat23@gmail.com
रविवार विशेष
www.ajinkyabharat.com
रविवार, दि. ११ मे, २०२५




दिनविशेष

सौ. ज्योती चव्हाण
मो. 7588590998

# आई : निस्वार्थ प्रेमाचं दुसरं नाव!

"मदर्स डे''... एक असा दिवस, जो त्या अपूर्व व्यक्तीसाठी समर्पित आहे जी आपल्याला जन्म देते, घडवते आणि आपल्या अस्तित्वात एक नवा अर्थ निर्माण करते ती म्हणजे ''आई!'' 'आई' या शब्दात एक जादू आहे, एक गोडवा आहे, एक अशी भावना आहे की जी शब्दांत मांडता येत नाही. ''आई'' म्हणलं की, आपोआप चेहऱ्यावर हसू उमटतं, डोळ्यात एक हलका अश्रू दाटतो या एका शब्दात एवढं काही सामावलेलं असतं की त्याला व्यक्त करताना मनही हरवतं.ती फक्त जन्म देणारी नसते ती आपलं अस्तित्व घडवणारी असते. जगात कितीही नाती असली कितीही माणस आसपास असतील, तरी एक व्यक्ती अशी असते जी न बोलता आपलं दुःख ओळखते, न मागता आपल्या प्रत्येक गरजेला प्रतिसाद देते न थकता आपल्यासाठी स्वतःला विसरते. ती म्हणजे आई .तिचं ममत्व, तिचं प्रेम, तिचं निस्वार्थ समर्पण, हे सर्व काही केवळ अनुभवता येतं, शब्दांनी व्यक्त करणं मात्र कधीही अशक्य आहे.

आई म्हणजे अनंत सागर, तिच प्रेम मोजता येत नाही, त्यागाची तुलना करता येत नाही. ती दिवसभर घराच्या कामांमध्ये, मुलांच्या संगोपनात आणि बाहेरच्या संसारात समतोल राखत असते, पण तरीही तिच्या चेहऱ्यावर कधीही थकवा दिसत नाही. कारण तिच्या प्रत्येक कृतीमध्ये असतो प्रेमाचा गंध, त्याच्या मागे असतो निस्वार्थ समर्पण. आई म्हणजे एक अशा आकाशातला तारा जो कधी गडद, कधी सौम्य आकाशात चमकतो पण त्याच्या प्रकाशामुळे आपली सृष्टी प्रकाशित होते . बाळाच्या एक हुंदका ही तिची झोप उडवितो. तिच्या कुशीत दिलेली उब म्हणजे संपूर्ण जगाचा आधार. ती फुंकर घालताच वेदना दूर जातात आणि ती कुशीत घेतल्यावर संपूर्ण विश्व विसरायला होतं. आई फक्त अन्न देत नाही, ती प्रेमाची तहान भागवते. ती फक्त मायेने कुरवाळत नाही तर , ती एक सुरक्षित आश्रय देते. ती फक्त शब्द बोलत नाही, ती आयुष्याच्या शहाणपण आपल्याला शिकवित असते कवी विठ्ठल वाघ म्हणतात ''आई हाक मारते तेव्हा आभाळ ही थांबतं,आई रडते तेव्हा देव सुद्धा थिजतो''. आई



म्हणजे शिस्त आणि माया यांचा सुंदर संगम. गरज पडल्यावर ती प्रेमळ आई, तर दुसऱ्या क्षणी कठोर गुरु. ती आपल्या मुलांना रडताना पाहू शकत नाही, परंतु स्वतःच्या अश्रूंना ताब्यात घेत, त्यांना कणखर होण्यासाठी मार्गदर्शन करते. ती आपल्या पावलांनी काटे सहन करते, जेणेकरून आपल्याला ते रस्ते सहजपणे पार करता येतात. कवी यशवंत पेंढारकरांच्या कवितेतून आई नसणाऱ्या मुलांची होणारी व्यथा अतिशय भावपूर्ण रित्या मांडली आहे.. ''चारा मुखी पिलाच्या चिमणी हळूच देई गोठ्यात वासरांना या चाटतात गाई वासल्य हे पशूंचे मी रोज रोज पाही पाहून अंतरात्मा व्याकुळ मात्र होई वासल्य माऊलीचे आम्हा जगात नाही दुर्भाग्य या विना का! आम्हास नाही आई..''

आईची भूमिका वयानुसार बदलते. लहानपणी ती आपली ममता, संरक्षण आणि आधार असते, किशोरवयात ती आपली मार्गदर्शक होऊन आपल्याला चुकांची सुधारण्यास सहाय्य करते. तरुणपणी ती आपली सखी बनते. शेवटी ती आपली मूक सावली बनते, जी निःशब्दपणे आपल्याला समजून घेते. प्रत्येक टप्प्यावर तिचं प्रेम कायमच असतं, फक्त ते जाणून घेण्याची गरज असते. कधी कधी वाटतं की आपण मोठे झालो, स्वतंत्र झालो, सगळं आपल्याला समजतं. परंतु, एखाद्या अशा क्षणी, जेव्हा सगळं गडबडलेलं वाटतं तेव्हा एकच हाक आपल्या हृदयाच्या गाभ्यातून ऐकू येते, ''आई!'' तिचं विश्वास, तिचं आशीर्वाद, तिचा प्रेमळ स्पर्श हेच आपल्याला पुन्हा उभं करतं. आई फक्त एक नातं नाही, ती एक भावना आहे. ती फक्त व्यक्ती नाही, ती संपूर्ण विश्व आहे. ती देव आहे, पण त्या देवतेचे रूप आपल्यासोबत चालत असते, आपल्याला धरून ठेवते. आजच्या धकाधकीच्या युगात, आपल्या जीवनात इतर गोष्टींना प्राधान्य देताना आपण तिच्या भावना आणि तिचा थकवा ओळखायला विसरतो. तिला म्हणायला आपल्याला वेळ नसतो. तिच्या आयुष्याच्या सांजवेळी प्रेमाने तिच्या डोक्यावरून हात फिरवायला आपल्या ला वेळ नसतो.तिच्या डोळ्यातील शोक, तिच्या रात्रभर जागण्याचे कष्ट या सर्व गोष्टीचा आपल्याला कधीच विसर पडलेला असतो. पण तिच्या डोळ्यातला ओलावा तिच्या कपाळावरच्या आठ्या आणि तिच्या थकलेल्या हातावरून आपल्यावरच तिचं प्रेम मात्र नेहमी कायम असतं. ती कितीही थकलेली असली तरी तिच्या हसऱ्या चेहऱ्यावर आपल्याला सुखाची झुळूक मिळते.

म्हणूनच मदर डे हा एक दिवस असला तरी दररोज आपल्याला काही क्षण तिच्यासाठी राखून ठेवायला हवेत. तिच्याशी गप्पा मारायला, तिचे ऐकायला, तिच्या भावना समजून घ्यायला, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे तिच्या प्रेमाला परत प्रेमाने उत्तर देण्याची वेळ आजपासूनच सुरु करायला हवी. आई आज वयाने थकली आहे यावेळी तिलाआपलं प्रेम, आपला सन्मान आणि आपला वेळ. आणि आपला सुंदर व्यवहार तिच्या म्हातारपणाची काठी असतो जी तिला नव्याने जगण्याचे सामर्थ्य देत असते तिच्या नजरेत, तिच्या हाताच्या ओझ्यात, तिच्या हसऱ्या चेहऱ्यात आपल्याला सर्व काही मिळालं असतं. तिच्या डोळ्यांत आपल्याला ''सर्वोत्कृष्ट'' असण्याची भावना नेहमीच दिसते. आज मदर डेच्या निमित्ताने प्रत्येकाने विचारावं, ''आपण आपल्या आईसाठी काय केलंय?'' फक्त सोशल मीडियावर फोटो पोस्ट करणं आणि सुंदर शब्द बोलणं पुरेसं आहे का? की आपण तिला कधी मनापासून मिठी मारली, तिच्यासोबत वेळ घालवला, आणि तिचं आशीर्वाद घेतला? कारण आई म्हणजे एक अशी व्यक्ती तिच्या मिठीत कितीही वादळं असली तरी आपल्याला शांत झोप लागते. म्हणून येथे गदिमाच्या चार ओळी सांगावयास वाटतात ''नकोस विसरू ऋण आईचे स्वरूप माऊली पुण्याईचे थोर पुरुष तू ठरून तियेचा होई उतराई ''.



ललित

विशाल कन्हेरकर
मो. 9172298839

# मनोरम्य पहाट

पहाट म्हणजेचं सकाळ. दिवस उजाडण्याची वेळ.प्रभातेचा मनोरम्य समय.रात्रीच्या अंधारातून काळोखाला चिरत रवी आपलं मार्गक्रमण करीत असतो.क्षितिजावर हळुवार तांबूस लालसर आभा नजरेस पडू लागते.अंधुक क्षितिज कपारीतून मग लाल तांबूस अग्निपुंज अलगत वर सरकू लागतो. पहाटेचा थंडगार वारा मनाला वेगळाचं आल्हाद देत आपला सुगंध चौफेर उधळीत असतो. पहाटेची चाहूल लागलेली असते. पक्षांचा मधुर किलरव आसमंती निनादत असतो. रात्रीची मरगळ झटकत सगळेचं प्राणिमात्रा प्रभातेच्या स्वागतास सज्ज झालेले असतात. हळूचं कुठेतरी दूर मस्जिदीतून पहाटेची पहिली अजान कानावर पडू लागते. गावटेकडीवरच्या मंदिरातून सकाळचा तो रम्य घंटानाद ऐकू येताचं वातावरण भक्तिमय व प्रसन्न वाटू लागतं. भूपाळीचे मधुर सूर शरीरात भक्तिमय चैतन्य प्रदान करून जातात. चराचर प्रफुल्लित होऊन जातं. आळसाला दूर सारत सगळे प्राणिमात्रा आपल्या दैनिक चर्येत गर्क होऊन जातात. सूर्याची उर्जादायी प्रभात किरणे जसजशी वर येऊ लागतात,तसतशी माणसातली शाश्वत क्रयशक्ती वाढू लागते.पोटापाण्याच्या शोधात प्राणीमात्रांची धावपळ सुरू होऊन जाते.कदाचित हेचं ते जीवनचक्र असावे जे मनोरम्य पहाटेसवे सुरू होऊन रात्रीच्या घनगर्द काळोखात विसावून जात असावं नाही..!

कितीतरी विलक्षण आभास .....पहाटेचं ते देखणं मनोहारी सौंदर्य पाहण्यास मन अधीर झालेलं.अंथरून बाजूला सारत व हळुवार सारी मरगळ झटकत मन निसर्गाच्या ताज्या व प्रसन्न हवेत अद्भुत आत्मानुभूती घेण्यास सज्ज झालेलं असत.सूर्याच्या कोवळ्या तांबूस आभेसह मंद मंद वाहणारा प्रसन्न थंड वारा मनाला मोहित करण्यास सज्ज झालेला असतो.खरचं कितीतरी अद्भुत.... आभासमान .....मनाला हवीहवीशी वाटणारी हिचं का ती पहाट असाही प्रश्न अलगदचं ओठांवर येऊन जातो. मग मात्र मन पहाटेच्या स्वागतास सुंदर गीत गात केव्हा सज्ज होऊन जातं ते कळतही नाही.

पहाटेची सुरुवात अदभुत रम्य अन मनोहारी असते. तीची वेगवेगळी रूपे आपल्याला त्या त्या वेळच्या वातावरणाशी समरूप होण्यास भाग पाडतात. किंबहुना मनाला मोहित करून समयानुरूप पहाटेचा मधुगंध कोमल वाऱ्यासवे हळुवार पसरवू पाहत असतात.मला अजूनही आठवते ती पावसातली चिंब भिजरी पहाट. धो धो कोसळणारा पाऊस समस्त चराचरात बेभान होऊन कोसळत असतो. तेव्हा ती पावसाळी पहाट काळपट ओलसर धुक्यात चिंब न्हात असते. वारा बेहोश होऊन वृक्षलतांशी झोंबत मिलनाचे चिंब ओले गीत गात असतो. मनाला भुरळ घालणारं हे दृष्य खिडकीतून पाहताचं मी ही माझं देहभान विसरून पाऊस होऊन जातो काही क्षणांसाठी......! तेव्हा अलगतचं सुमधूर मराठी भावगीतांची गुंजारव मनातून स्फुरत अलवार ओठांवरती तरारू लागते.मग मात्र मला गुणगुणल्या वाचून राहवत नाही. श्रावणातली रिमझिमणारी ती ओली पहाट माझ्यातला कवी जागा करून जाते. कधीकधी खिडकीच्या बाहेर डोकावत असतांना ही भिजरी पहाट मला काव्य लेखनाची साद घालत नवी उर्मी देऊन जाते. अन मी लिहित सुटतो सुसाट वेगाने. आभाळातून टिपटिपणाऱ्या पावसाची रिमझिम गाणी सोबतचं खळखळणाऱ्या पाण्याच्या झरझरणाऱ्या वाऱ्याच्या ओलसर कविता. म्हणूनचं कदाचित पावसातली ती झिम्माड ओली पहाट मी केव्हाचं विसरू शकत नाही. मनोभावन श्रावण संपून शिशिराची चाहूल लागलेली असते.त्याचबरोबर पहाट देखील आपलं शीतल व लोभस रूप धारण करून समस्त चराचरातील प्राणीमात्रांना आत्यंतिक सुंदर भुरळ घालू लागते. काकड आरतीचे सूर मंदिरात उमटू लागतात. वातावरणातली शीतलता तिच्या चरण सीमेवर पोहोचलेली असते.पांढऱ्याशुभ्र धुक्यांची दाट चादर सगळीकडे पसरलेली असते.वृक्षलता ओलसर दवांनी चिंब भिजून गेल्या असतात. शेताकडे जाणाऱ्या हिरव्यकंच वळणवाटा या दाट धुक्यात धूसर झालेल्या असतात.पहाटेचे हिमतुषार समस्त वातावरणात चैतन्य पसरवीत मनाला अधिकचं प्रसन्न करीत असतात.पहाट आपल्या सुंदरतेच्या चरण सीमेवर पोहोचलेली असते. शिशिरातल्या याचं गुलाबी थंडीत तिचं मनोवेधक सौंदर्य अधिकचं आकर्षित व मंत्रमुग्ध करून जाते. शरदाच्या आगमनासवे पहाटेची पानगळती सृष्टीला नवरूप व नवचैतन्य प्रदान करण्यास सज्ज झालेली असते. अलगदचं वसंताची चाहूल लागताच पहाट देखील पळस फुलांच्या रंगात बेधुंद भिजून जाते. वृक्षांच्या नवफुलोरांनी व कोवळ्या हिरव्या पानांनी वसंतातली हिचं पहाट अनेक रंग उधळू लागते. तेव्हा तिचे अद्भुत लावण्य चराचराला गंधित करून जाते.पहाटे उठणाऱ्या चिवचिवत्या पक्षांचे मधूर सूर अन कोकिळेचे मनमोहक कोकिळगान वसंतगुलाल उधळीत चौफेर निनादू लागतात. सृष्टीतल्या विविधांगी रुपांतून ऋतुचक्रावर स्वार होऊन पहाट आपल्या बहुरंगी सौंदर्याचा परिचय समस्त प्राणिजनांना देत असते. विविध रूपातील पहाटेचं हे अप्रतिम लावण्य मी कायमचं साठवत आलोय माझ्या हृदयस्थ साठ्यात एक अद्भुत नैसर्गिक देणं म्हणून. आयुष्यात जगण्याची नवी उमेद देण्याचे काम हिचं मनोरम्य पहाट अतिशय खुबीने करत असते. तेव्हा ऋतुचक्रासवे होत असलेल्या पहाटेच्या या शाश्वत परिक्रमेकडे मी बघत राहतो माझ्या आश्वस्त नजरेतून जीवनाचा व जगण्याचा सुंदर शोध घेण्यासाठी.



शिक्षण वार्ता

जयदीप सोनखासकर
मो. 9890508017

# शिक्षकांवर अन्याय करणारी संचमान्यता रद्द करा..!

गेल्या काही वर्षात देशात व राज्यात शिक्षण क्षेत्रात अनेक बदल घडवून येत आहे. त्यापैकी काही बदल हे शिक्षण क्षेत्राच्या दृष्टीने सकारात्मक तर काही बदल हे अत्यंत नकारात्मक स्वरूपाचे ठरत आहेत. खास करून अनुदानित शासनमान्य शाळांच्या धोरणासंदर्भात शासन वेळोवेळी कूटनीती वापरून ह्या शाळा कशा बंद होतील? हेच पाहत आहे. सध्याचे शासन धोरण शाळा व शिक्षकांच्या मुळावर उठले असून परिणामी यामुळे विद्यार्थ्यांचे सुद्धा नुकसान होणार आहे. समाज शिक्षण विहीन होतो की काय अशी भीती निर्माण झाली आहे. यासाठी कारण ठरणारी १५ मार्च २०२४ ची संच मान्यता निर्णय तूर्तास शिक्षक व शाळांच्या जीवाशी खेळणारा ठरला आहे. शिक्षणविश्व द्वारा मी या निर्णयाला ताबडतोस स्थगिती देण्याची मागणी करत आहे तसेच शिक्षकांवर अन्याय करणारी ही संचमान्यता रद्द करा अशी मागणी सुद्धा शासन व्यवस्थेला करीत आहे. मी या आधीच शिक्षणविश्वया आपल्या सदरात नवीन संच मान्यता शिक्षकांच्या व शाळांच्या मुळावर उठणार!हा लेख प्रकाशित केला होता त्यावर अनेक शिक्षक बंधू भगिनींच्या उत्स्फूर्त व तेवढ्याच संवेदनशील प्रतिक्रिया प्राप्त झाल्या होत्या. दिनांक १५ मार्च २०२४ ची शासन संच मान्यता जर अस्तित्वात व अमलात आणल्या गेली तर या संच मान्यतेचे सेवक संच निकष हे शिक्षकांना घरी बसवणारे व शाळा कायमचे बंद करणारे ठरतील असे भाकीत मी



व्यक्त केले होते. ते आता तंतोतंत खरे ठरले आहे.

नवीन संच मान्यतेनुसार राज्यातील अनेक जिल्ह्यात १५ ते २० टक्के शिक्षकांची पदे रिक्त म्हणजे शून्य झाली आहेत. विद्यार्थी असूनही केवळ २० च्या प्रमाणात ती पटसंख्या नसल्यामुळे अनेक शाळात इयत्ता नववी, दहावीचे ३९ विद्यार्थ्यांवर शिक्षक संख्या शून्य दाखवण्यात आली आहे. काही शाळांचे संचमान्यता चुकीच्या ऑनलाईन पद्धतीने निर्माण झाले आहेत. त्यामुळे आता या निर्णयाचा मराठी शाळांना मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. हे संच मान्यता धोरण शाळा,शिक्षण संस्था चालक, मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व खास करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर अन्यायकारक असेच आहे.

या संचमान्यते नुसार जर नवीन शैक्षणिक क्षेत्रात शिक्षकांचे पद रिक्त झाले किंवा अतिरिक्त झाले तर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या आदिवासी वाड्या,वस्तीवरील, तांड्यावरील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोठा प्रचंड खंड निर्माण होणार आहे. विद्यार्थ्यांचे हित जोपासना करणे हे राज्यकर्त्यांचे धोरण असले पाहिजे. त्या विद्यार्थ्यांना शिकवणारी पुरेशी शिक्षक संख्या असली पाहिजे. त्यासाठी शासनाने पाऊल उचलले पाहिजेत. मात्र नवीन नवीन शैक्षणिक नियम लादून अनुदानित शासन शिक्षण व्यवस्था बंद करून खाजगी,कंत्राटी स्वयं अर्थासहायित व जो पैसे देईल त्याची शिक्षण व्यवस्था आणि जो पैसे घेईल तो शिकविल, जो देणारा,तो शिकेल अशी भ्रामक व शोषण करणारी व्यवस्था राज्याचा शालेय शिक्षण विभाग निर्माण करू पाहत आहे. या विरुद्ध कोकण विभागातून मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे. या शिवाय जिल्हा जिल्ह्यातून माहिती घेतली असता राज्यातील सर्व जिल्ह्यातून अनेक संस्था चालक, शिक्षक संघटनांच्या माध्यमातून विविध खंडपीठात याचिका दाखल करण्याचे सत्र सुरू झाले आहे. याविरुद्ध जनमानसात तीव्र आक्रोश भविष्यात कदाचित निर्माण होऊ शकतो.

शिक्षण व शिक्षण व्यवस्थेची होणारी गळचेपी थांबवण्यासाठी राज्यातील सर्व शिक्षक, पदवीधर व इतरही आमदारांनी एकत्र येऊन येणाऱ्या पावसाळी अधिवेशनामध्ये हा मुद्दा लक्षवेधी स्वरूपात उपस्थित करावा. बहुजनांचे व गरिबांचे शिक्षण व्यवस्था उध्वस्त करणारे धोरण सभागृहात हाणून पाडावे. शिवाय शिक्षक बंधू-भगिनींवर अन्याय करणारी ही नवीन संच मान्यता तात्काळ रद्द करावी व पुढील निकष सर्व मान्यतेनुसार ठरवावेत असे आवाहन मी करीत आहे, तूर्तास एवढेच..!



कथा

प्रा. मोहन काळे
मो. ७०३८२७६५५८




''कुठी जात असतं रे तू रातभर? तुयी माय इकळे चिंता करते अन् तुले काइच फिकीर नाई! रातभर माला जीव थाऱ्यावर नसते. माल्या डोयाले डोया लागत नाई .असा कामुन माल्या जीवाशी खेतं? मले त्वालं लक्षन बरोबर दिसून नाइ राह्यलं. फक्त मले एवळंच सांग की तू कुठी असतं रातभर?'' विमलने प्रमोदकडे काळजीच्या सुरात विचारले. तिचे डोळे अश्रूंनी काठोकाठ भरलेले होते. तिचा चेहरा केविलवाणा झाला होता. प्रमोद, तिचा मुलगा, मागील एका महिन्यापासून विचित्रपणे वागत होता. नेमकं काय झालं होतं काहीच कळत नव्हतं. दहा एप्रिलला त्याची सातवीची वार्षिक परीक्षा संपली आणि त्याला सुटी लागली होती. शाळेत असेपर्यंत तो व्यवस्थित होता. तो दररोज सकाळी लवकर उठायचा. तिला कामात मदत करायचा. शाळेत दिलेला गृहपाठ पूर्ण करायचा. अभ्यास करायचा. वेळेवर शाळेत जायचा. घरी आल्यावर हात पाय स्वच्छ धुवून देवाजवळ प्रार्थना म्हणायचा. तिच्या कामात तिला मदत करायचा. जेवण झाल्यावर थोडावेळ तिच्याशी गप्पा मारायचा. शाळेत काय काय झालं हे सांगायचा. होमवर्क पूर्ण करायचा. सातवीत गेला तरी त्याला तिच्या कुशीतच झोप लागायची. ती त्याला गोष्ट सांगायची व त्याला थोपटत राहायची. त्याला झोपवता झोपवता तिचाही डोळा कधी लागायचा हे तिलाही समजायचं नाही. पण मागच्या एका महिन्यापासून तो अबोल झाला होता. तिच्याशी जास्त बोलत नव्हता. काही विचारलं तर मान हलवून हो किंवा नाही एवढंच म्हणत होता. तो आधीसारखा बडबड करत नव्हता. त्याला कशाची व कोणती चिंता खात होती देव जाणे! तो आधीचा प्रमोद वाटतच नव्हता. नेहमी हसरा व चंचल असणारा प्रमोद आता अकाली प्रौढत्व आल्यासारखा धीरगंभीर वाटत होता. हा बदल नेमका का व कशामुळे झाला हे कळायला मार्ग नव्हता. त्याच्या वागणुकीमुळे विमल चिंतित झाली होती. बरं, त्याला सरळ विचारावं तर तो घरात कमीच असायचा. जास्तीत जास्त वेळ तो घराबाहेरच असायचा. नक्कीच काहीतरी होतं जे तिला माहीत नव्हतं. तिनं तिचा नवरा गमावला होता. आता ती प्रमोदला गमावू शकत नव्हती. त्याच्याशिवाय तिला दुसरं होतं तरी कोण? आपण विचारावं अन् त्यानं जीवाचं काहीतरी बरंवाईट करावं असं ना व्हावं म्हणून ती ही त्याला जास्त काही विचारत नव्हती. वेळ आल्यावर तोच सांगेल असं ती स्वतःच्या मनाला समजवायची.

तिचे पती म्हणजे प्रमोदचे बाबा प्रमोद दोन वर्षांचा होता तेव्हाच शेतात वीज पडून देवाघरी गेले होते. तिच्यावर तर दुःखाचा डोंगरच कोसळला होता. प्रमोद लहान होता. त्याला तेव्हा पुरतं समजतही नव्हतं. तो लहान वयातच वडिलांच्या प्रेमाला व आधाराला पारखा झाला होता. पोरका झाला होता. पोरकेपणाचा शाप ती आधीपासूनच भोगत होती. ती स्वतः लहानपणीच पोरकी झाली होती. मामानं तिला वागवलं. मामा, मामी मायाळू होते. त्यांना मूलबाळ नव्हतं म्हणून तेही तिला जीव लावायचे. पण मामीला स्वतःचा मुलगा झाल्यापासून तिचं जास्तीत जास्त लक्ष तिच्या मुलाकडं राहायचं. त्याचं कोडकौतुक करता करता तिला विमल आवडेनाशी झाली, ओझं वाटायला लागली. विमलला जिल्हा परिषदेच्या शाळेत टाकलं. ती अभ्यासात हुशार होती. पण गावात चौथीपर्यंतच शाळा असल्यामुळे व पाचवीपासून शाळा तालुक्याच्या ठिकाणी असल्याने मामानं तिला पुढे काही शिकवलं नाही. किंबहुना मामीला वाटलं होतं की ही शाळा शिकेल तर मग घरातील आणि शेतातील कामं कोण करेल? ती फक्त मिळालेली कामगारच होती म्हणा ना! मामाच्या घरातली आणि शेतातली कामं करता करता ती कधी मोठी झाली हे कळलंच नव्हतं. ती अठरा वर्षांची झाल्यावर मामानं नात्यातलाच एक भूमीहीन परंतु कष्टाळू मुलगा पाहून तिचं लग्न लावून दिलं होतं. परंतु पतीच्या अकाली निधनाने तिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. पण ती खचली नाही. तिचा एकमेव आधार प्रमोदच होता. आपण इच्छा असूनही मनासारखं जास्त शिकू शकलो नाही याची सल तिच्या मनात कायमच होती. आपण शिकू शकलो नाही, परंतु त्याची भरपाई प्रमोदच्या माध्यमातून पूर्ण करू असं तिनं ठरवलं होतं. प्रमोदला खूप शिकवायचं असं तिनं मनात ठरवलं. त्यासाठी तिनं खेडं सोडून तालुक्याला राहायचं ठरवलं. एक साधी खोली भाड्यानं घेतली. अपार्टमेंटमधील अनेक सदनिकांमध्ये ती झाडू पोछा, धुणीभांडी करायला लागली. तिच्या मामाने तिला पुनर्विवाहाचा सल्ला दिला. एक विधूर शेतकरी तिच्याशी लग्न करायला तयार होता. परंतु सावत्र बाप प्रमोदवर माया करेल की नाही याची हमी कोण घेणार? त्यामुळे स्वतःच्या इच्छा आकांक्षा बाजुला ठेवून तिने लग्नाला नकार दिला होता. तिला एकच ध्यास होता: प्रमोदला शिकवून मोठं करायचं. प्रमोदही समजदार होता. मन लावून अभ्यास करायचा. आईशी सतत काहीना काही बोलत राहायचा. पण शाळेला सुटी लागल्यापासून तो अबोल झाला होता. बोलायला तो घरात तर थांबायला पाहिजे ना! विमल मनातून खूप घाबरली होती. सगळं व्यवस्थित सुरू असताना पोराचं असं वागणं तिला अस्वस्थ करत होतं. प्रमोद सकाळीच एक भाकरी खाऊन गायब व्हायचा तो संध्याकाळी जेवणाच्या वेळेवरच उगवायचा. विचारलं तर सांगायचा की मित्राकडे खेळायला जातो म्हणून. जेवण झाल्यावर थोडा वेळ रुंगयरांगय करून परत गायब व्हायचा. त्याची वाट पाहत पाहत ती झोपून जायची. सकाळी उठल्यावर तिला तो अंगणातील खाटेवर झोपलेला दिसायचा. खूप थकलेला दिसायचा. ती त्याच्या केसांतून हात फिरवायची तेव्हाच फक्त त्याच्या शरीराची थोडीसी हालचाल व्हायची. तो वाईट संगतीत सापडला अशी शंका तिच्या मनात यायला लागली व तो विचार तिचं मन कुरतडायला लागला. तिची जेवणावरची वासना निघून गेली. चांगला वागणारा मुलगा असा का वागतोय याचं कोडं तिला सुटेना. त्याचं मन दुखेल असं काही ती बोलली तर नाही ना असे विचार तिच्या मनात खळबळ निर्माण करायला लागले. प्रमोदच्या माध्यमातून आपल्याला सुख मिळेल हे तिचं स्वप्न दूर जाताना दिसायला लागलं. त्याला काही बोललं किंवा रागावलं तर तो स्वतःला काही करून घेईल या भीतीनं ती त्याला काहीच बोलत नव्हती आणि तोही पहिल्यासारखा तिला काही सांगत नव्हता. सकाळी ती उठली तेव्हा तिला आश्चर्याचा धक्काच बसला. तिच्या उशाशी बसून प्रमोद तिच्या चेहऱ्याकडे एकटक पाहत होता. त्याच्या चेहऱ्यावर वेगळेच भाव होते. त्याच्या डोळ्यांत अश्रू होते. त्यानं तिचे हात त्याच्या हातात घेतलेले होते. तिनं डोळे उघडताच त्याच्या चेहऱ्यावर स्मित आलं. ती उठली. तिला जाणवलं, की आपण दात घासत असताना तो आपल्याकडेच पाहतोय म्हणून. दात घासून तोंड धुतल्यावर तिनं आजुबाजुला पाहिलं. खोली स्वच्छ झाडलेली होती. देवाजवळ दिवा लावलेला होता. प्रमोदकडे बारकाईने पाहिलं तर त्याचीही अंघोळ झालेली दिसत होती. झोपेतून उठल्यावर हे तिच्या लक्षात आलं नव्हतं. आपल्याच विचारांत व गंभीर राहणारा प्रमोद आज चक्क गालातल्या गालात स्मित करीत होता. तिला नवल वाटलं. अंघोळ करून आल्यावर पाहते तर काय! हातात कपबशी घेऊन प्रमोद उभा होता. वाफाळलेल्या चहाचा गंध तिला जाणवला. आज हे काय आक्रीत घडत आहे हे तिला समजेना. ती खाटेवर बसून चहा घ्यायला लागली. ''आज तू लय खुस दिसतं. सांग तुले आज जेव्याले काय करू? आज त्वाल्या आवळीचा शिरा करतो.'' विमलच्या मनातली उत्कंठा शिगेला पोहोचली होती. आज अचानक प्रमोदला काय झालं होतं आणि इतके दिवस तो विचित्रपणे का वागत होता याचं उत्तर तिला मिळालं नव्हतं. दिवसभर ते बागेत दोघेच खेळत होते. बोलत होते. आज तीही लहान झाली होती. अनेक वर्षांनंतर ती बागेत आली होती. घसरगुंडीवर घसरताना, झोके घेताना, सी -सॉ वर खाली वर होताना व एकमेकांना धावून पकडताना तिला तिचं बालपण मिळाल्याचं जाणवत होतं. इतका आनंद तिला आतापर्यंतच्या जीवनात मिळाला नव्हता. सायंकाळी ते परत घरी आले. त्यानं देवाजवळ दिवा लावला. शुभंकरोती म्हणण्यासाठी दोघांनी हात जोडले. डोळे लावले. पण पुढच्याच क्षणी ती नखशिखांत शहारली. प्रमोदनं शुभंकरोती म्हणण्याच्या ऐवजी म्हटलं होतं, '' देवा, मला सगळ्याच जन्मांत हीच आई देजो.'' तिला क्षणभर काहीच समजलं नाही. तिला दिसलं तिला प्रमोदनं तिच्या पायांवर डोकं ठेवलं होतं व त्यानं तिच्या पायाचे मुके घेतले होते. ती थरथरली. तिनं त्याला उठवून कुशीत घेतलं. ती एकटक त्याच्याकडे पाहत होती. तिनं त्याला गच्च पकडलं. त्यानं मान वर करून तिच्याकडे पाहिलं आणि म्हणाला, ''हॅप्पी मदर्स डे!'' तिनं त्याच्या चेहऱ्याकडे कौतुकाने पाहिलं अन् परत त्याला अश्रूंनी भिजवायला लागली. तीन चार मिनिटे ते दोघेही निःशब्द होऊन एकमेकांवर मायेचा वर्षाव करत होते. प्रमोदनं त्याचे हात सोडवून घेतले. खाटेखाली लपवलेली वायरची पिशवी त्यानं बाहेर काढली. त्यातील मोरपंखी रंगाची साडी बाहेर काढली आणि आईच्या हातांवर ठेवली. पिशवीत परत हात घालून सुंदर अशा चपला बाहेर काढल्या आणि तिच्या पायांत घातल्या. तिचे तर शब्दच हरवले होते. ती फक्त मटामटा पाहत होती.

तो बोलत असल्याचं तिला जाणवलं. तो म्हणत होता: ''मा, गेल्या महिनाभर मी राहूलच्या घरी जात होतो. तुले तर माहीतच हाये की राहूल लय शिरीमंत हाये. पण अभ्यासात हुशार नाई. त्याचे बाबा त्याले घ्याले शाळेत आले होते. त्यायनं आमच्या सरले म्हटलं की सुट्टीत त्यायच्या घरी राहूलची टिवीशन घ्या म्हनून. पन आमचे सरनं त्यायले सांगतलं की ते उन्हाळ्याच्या सुट्टीत त्यायच्या कुटुंबासंग उत्तर भारतात फिऱ्याले जानार हायेत म्हनून. मंग सरनं मले बलावलं अन् राहुलच्या बाबाले सांगतलं की हा मुलगा खूप हुशार आहे. याचा अभ्यासात शाळेत नेहमीच पहिला नंबर असतो. याला सांगा राहुलला शिकवायला. मी दिवसभर राहूलच्या घरी जात होतो. त्याले शिकोत होतो अन् त्याच्यासंग खेळत बी होतो. महिना झाल्यावर मले त्याच्या बाबानं हजार रुपये देले. त्यातून मी तुले भारीतली साडी अन् चप्पल आनली. रात्री मी गोपालच्या घरी जात होतो. महिनाभर त्याचे बाबा भाहीरगावी गेले होते. त्याच्या मायले पॅरालिसीस व्हयेल हाये. आम्ही दोघं मिळून त्याच्या आईची कायजी घेत जावो. त्याचे बाबा काल गावाहून वापस आले. ते त मले पाचशे रुपये दिऊन रायल्ते. पन म्या ते घेतले नाईत. दोस्ताच्या मायच्या बिमार मायची काळजी कऱ्याचे पैसे घेत असतात काय तूच सांग! मी आता मोठा हून राह्यलो. मले सगळं समजते, की बाबा देवाघरी गेल्यानंतर तू किती कष्ट करतं, माली किती कायजी करतं, मी लय शिक्याले पायजे म्हनून तू जीवाचा किती आटापिटा करतं, माल्यावर किती माया करतं! माल्यासाठी तूच देव हायेस. शिरीमंताचे पोरं १२ मे च्या दिवशी मदर्स डे साजरा करतात. माल्यासाठी त बाराही महिने मदर्स डे असते. तरीबी म्या ठरोलं होतं की मदर्स डे आपुनबी साजरा कऱ्याचा म्हनून. तू माली काई चिंता करत जाऊ नको. मी वाईट मार्ग कधीच धरनार नाई. मी लय अभ्यास करून मोठा मानूस होईल अन् तुले लय सुखात ठेवीन.'' ते दोघं मायलेकंच नाही तर ती खोली सुद्धा त्या मायलेकाचं एकमेकांवरचं प्रेम पाहून कृतकृत्य होत होती.

लोकरंग

# मध्य प्रदेशातील पर्यटन स्थळांची रोमांचक झलक आता किडझानियामध्ये



चला पर्यटनाला

मध्य प्रदेश हा इतिहास, संस्कृती, अध्यात्म आणि वन्यजीवनाचा एक अद्भुत मिश्रण आहे. किडझानियाच्या माध्यमातून राज्याचा गौरवशाली वारसा, वन्यजीव आणि समृद्ध संस्कृती भावी पिढ्यांना मनोरंजक आणि आकर्षक पद्धतीने सादर केली जाईल. किडझानिया मुंबई येथे एमपी टुरिझम एक्सपिरीयन्स सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी पर्यटन आणि संस्कृतीचे प्रधान सचिव आणि एमपी टुरिझम बोर्डाचे व्यवस्थापकीय संचालक श्री शिव शेखर शुक्ला बोलत होते. यासोबतच, किडझानिया दिल्ली येथे एक पर्यटन अनुभव केंद्र देखील सुरू झाले. प्रधान सचिव श्री. शुक्ला म्हणाले की, मध्य प्रदेशात प्रत्येकासाठी सर्वकाही आहे. देशातील जवळजवळ सर्व पर्यटन स्थळे मध्य प्रदेशात आहेत. विशेषतः मध्य प्रदेशातील स्थानिक आदिवासी संस्कृतीचा अनुभव पर्यटकांसाठी अनोखा आहे. आदिवासी संस्कृती प्राचीन काळापासून जतन केली गेली आहे आणि तिच्या मूळ स्वरूपात जतन केली गेली आहे. तसेच, मध्य प्रदेश हे इतिहास प्रेमींसाठी स्वर्गासारखे आहे. येथे १८ युनेस्को जागतिक वारसा स्थळे आहेत. यापैकी ३ कायमस्वरूपी यादीत आणि १५ तात्पुरत्या यादीत समाविष्ट आहेत.या कार्यक्रमात किडझानिया आणि एमपी टुरिझम यांच्यात सामंजस्य करार विनिमय समारंभ पार पडला. मध्य प्रदेश पर्यटन अनुभव केंद्राचे उद्दिष्ट मुलांना राज्यातील नैसर्गिक वारसा, जैवविविधता, नद्या आणि सांस्कृतिक वारशाशी मनोरंजक आणि सर्जनशील पद्धतीने जोडणे आहे. हा उपक्रम मुलांना केवळ एक रोमांचक अनुभव देत नाही तर त्यांच्या माध्यमातून संपूर्ण कुटुंबाला मध्य प्रदेशातील पर्यटन स्थळांकडे आकर्षित करतो.या केंद्रात दोन प्रमुख व्हर्च्युअल अनुभव दिले जात आहेत - जंगल सफारी आणि रिव्हर राफ्टिंग. जंगल सफारी दरम्यान, मुलांना व्हर्च्युअल जीप सफारीमध्ये मध्य प्रदेशातील घनदाट जंगले, राष्ट्रीय उद्याने आणि वन्य प्राण्यांचा जवळून अनुभव मिळतो. तर, रिव्हर राफ्टिंगमध्ये, त्यांना राज्यातील नद्यांच्या लाटांवर स्वार होताना नैसर्गिक सौंदर्य आणि जलचर जीवन जाणून घेण्याचा थरार अनुभवायला मिळतो.

## चिवचिव चिमणी

वेध प्राणी विश्वाचा



चिमण्या हे भारतभर आढळणारे छोटे पक्षी आहेत. इंग्रजीत त्यांना '' म्हणतात. त्यांचे वैज्ञानिक नाव पॅसेरिडे आहे. जगभरात चिमण्यांच्या सुमारे २४ प्रजाती आढळतात. चिमण्या झाडांवर घरटी बांधतात आणि अनेकदा गटात राहतात. दरवर्षी २० मार्च रोजी जागतिक स्पॅरो दिवस साजरा केला जातो. शहरी आणि ग्रामीण भागात आढळणाऱ्या चिमण्या ''घरगुती चिमण्या'' म्हणून ओळखल्या जातात आणि जंगलात राहणाऱ्या चिमण्यांना ''जंगली चिमण्या'' म्हणतात.चिमण्या आकाराने लहान असतात, त्यांची लांबी १४ ते १६ सेंटीमीटर असते. त्यांचे वजन अंदाजे २५ ते ४० ग्रॅम असते. ते १०,००० ते १२,००० फूट उंचीपर्यंत उडू शकतात. चिमण्यांना पिवळी चोच आणि उडण्यासाठी दोन पंख असतात. ते किलबिलाट आवाज करतात. चिमणीचे सरासरी आयुर्मान ४ ते ६ वर्षे असते. ते ताशी ३५ किलोमीटर वेगाने उड्डाण करू शकतात. चिमण्या वर्षभरात सुमारे ३ ते ५ अंडी घालतात. पिल्ले १३ ते १५ दिवसांनी घरटे सोडतात. जोपर्यंत ते उड्डाण करू शकत नाहीत तोपर्यंत ते त्यांच्या पालकांसोबत राहतात. १५ ते २० दिवसांनंतर ते उडण्यास सुरवात करतात. चिमण्या सहसा मानवी वस्तीजवळ घरटे बांधतात.शहरी आणि ग्रामीण चिमण्या धान्य आणि लहान कीटक खातात. त्यांची शिकार मांजर, साप, कुत्रे, कोल्हे आणि गरुड करतात.. निसर्गाचा समतोल राखण्यात चिमण्या महत्त्वाची भूमिका बजावतात.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 37



### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या बौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेत शब्द:—**

**दोन अक्षरी**
- कथा
- कस
- काका
- कात
- खंत
- चमू
- तरू
- दान
- दीन
- नाद
- बंदी
- भात
- भाल
- मर्द
- मस
- माळ
- मोक्ष
- यथा
- रग
- रस
- लीन
- वाचा
- सिद्धी
- सुत
- स्थल
- क्षमा

**तीन अक्षरी**
- अतीत
- आवड
- कबंध
- कळस
- करारी
- काजवा
- कात्रण
- कानस
- कावड
- कोडगा
- खराब
- चकवा
- चमक
- जवळ
- जोगवा
- थरार
- धनको
- नक्षत्र
- पवन
- भासरा
- मानव
- मास्तर
- यमन
- रवाना
- रावण
- लालूच
- विरळ
- वेचक
- सफेद
- सुगावा

**चार अक्षरी**
- अपमान
- अरसिक
- अवास्तव
- केकावली
- जवळीक
- डरकाळी
- पुष्पांजली
- मूळव्याध
- लीलावती
- वानप्रस्थ
- सांजवात

**पाच अक्षरी**
- ओळखपत्र
- कर्दनकाळ
- केदारनाथ
- प्रभातफेरी
- मानसपुत्र
- रजनीचर
- सुंदरबन

**सहा अक्षरी**
- प्रथमोपचार

**सात अक्षरी**
- वेग प्रतिबंधक

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 416



**आडवे संकेत :—**

2) श्रीसमर्थ रामदास यांनी स्थापिलेल्या संप्रदायातील प्रत्येक मनुष्य
5) भूमितीत नव्वद अंशाचा कोन
8) तोंडी घेतलेला अन्नाचा गोळा
11) लोक, नागरिक
12) मृदू, मुलायम
13) खाली उतरणे, ग्रंथातील उतारा
15) स्पष्ट, मोठे
16) अतिक्रमण ओलांडणे, आज्ञाभंग
18) सुंदर स्त्री
20) तेथवर (हिं.)
21) निराळा, वेगळा, भिन्न
23) नवरात्रात देवीच्या पूजेपूर्वी समंत्रक मांडलेला कलश
25) मार्ग, संप्रदाय
26) एक सरपटणारा सर्पयोनीतील घातक प्राणी
27) बळी (हिं.)
29) माणूसघाण्या, मत्सरी
30) पकड, आधार
31) सातांचा समुदाय
34) मोठ्या भावाची बायको
37) एखाद्या व्रताचरणाचे फल सांगणारा ग्रंथ
39) कृतज्ञता व्यक्त करणे, धन्यवाद
40) खादाड
41) रानटी जात
42) सचोटी विषयीचा दुसऱ्यावरचा विश्वास, अब्रू
43) मनन करण्यास योग्य
44) घटक, प्रमाण
45) लग्नाच्यावेळी नवरा व नवरी यांच्या कपाळावर बांधण्याचे आभूषण
46) विद्वान, ज्ञानी
47) त्या बाजूकडे,
49) फुलातील रजःकण
50) अनुराग, तत्परता
51) चार युगांपैकी सध्या चालू असलेले युग
53) माणसाळलेला
54) महाराष्ट्रातील एक विशेष जात
55) जनता, लोक
57) मायावी, कपटी, प्रेम लावणारा
59) अतिशय, भरपूर
60) खोडेगावातील पंचायत समितीचा मुख्य, पंचकमिटीचा अध्यक्ष
62) नवरा, आशीर्वाद
64) एका पालेभाजीचे नाव
67) पायाची खोट
69) कुक्कुट
70) रिकामा, रिक्त
71) एका बाजुचा, एक पक्षीय
74) वृक्षाभोवतीचा ओटा
75) वस्त्र
76) दुसऱ्यांच्या मनातील नेमके भाव ओळखणारा

**उभे संकेत :—**

1) आवाजाच्या अधिकतेने बधिरता येते या अर्थाचा एक वाक्प्रचार
2) राजाची मुलगी
3) सुख दुःख जाणणारे इंद्रिय
4) दसऱ्याचे शिलांगण
5) अरण्य, जंगल
6) उपहास, थट्टा
7) मृदू, नरम
8) शस्त्राने झालेली जखम
9) एकसारखा पडणारा पाऊस
10) समुदाय, वर्ग, भक्तांचा समूह
13) ज्याला कुणीही नाही असा
14) द्रव्यसंख्या,
17) श्वसन मार्गाला प्रभावित करणारा एक रोग (डिप्थेरिया)
19) लपाछपीचा खेळ, लपून केलेले कृत्य
22) पसारा, कामाची गर्दी, पुष्कळ चिखल
24) साखर, केशर, तूप घालून केलेला गोड भात
28) माखलेला, व्यापलेला
30) मालक, स्वामी
32) कंगाल, जवळचे पैसे संपलेला
33) डोळ्यातील आसवे
35) कल्याण चिंतणारा
36) हिंदीत आमदार, प्रत्यक्ष कृतीचा
38) तिरसट मनुष्य
39) उदक, पाणी 40) अधर्म, दुष्कर्म,
41) पुरुषांनी कानात घालावयाचा मोत्याचा दागिना
45) पुणे जिल्ह्यात कऱ्हा नदीच्या काठावर वसलेले एक शहर
46) पंगत वाढताना केलेला भेदभाव
48) रांजण, मोठे पोट
52) जाहीरपणे वस्तूची बोली बोलणे
53) पायी चालणारा
56) गांजणूक, छळ
58) एकलकोंडा, घरीच राहणारा
59) यासाठी
61) कंटाळवाणे, नीरस
63) जोराचे भांडण
65) ओळ, रांग (हिं.)
66) एक चौकोर मिठाई
68) यमलोकीची यातनाप्रद जागा
72) तत्वांश, अर्क, धातूची परीक्षा
73) शरीर
74) विडा, पर्ण ●

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य


**मेष :** आज तुम्ही कठोर परिश्रमाने केलेले काम यशस्वी होईल. नोकरीत तुमचा आदर वाढेल. व्यवसायात तुम्हाला नफा मिळेल.


**वृषभ:** आज तुमचे धाडस वाढेल. तुमचे विरोधक गप्प राहतील. लग्नाच्या चर्चा शक्य आहेत. द्वेषाची भावना महागात पडू शकते.


**मिथून :** आज तुमच्या राजकीय क्षेत्रात गोंधळाची परिस्थिती असेल. व्यवसायात नफा होण्याची शक्यता आहे. तुम्हाला थकवा आणि ताण जाणवेल.


**कर्क :** आज तुमच्या कामात तुमचा अधिकार वाढेल. आर्थिक क्षेत्रात समस्या येऊ शकतात. व्यवसाय क्षेत्रात सावधगिरी बाळगा.


**सिंह :** तुम्ही वैवाहिक जीवनाचा आनंद घ्याल. घाईघाईने निर्णय घेणे टाळा, अचानक पैसे मिळतील.आज तुमचे सकारात्मक विचार देखील खूप उपयुक्त ठरतील.


**कन्या :** आज तुम्हाला भविष्याची चिंता असेल. आरोग्यात फायदे होतील. व्यवसायात चढ-उतार येतील. तुमच्या योजनांमध्ये अडथळे येतील.


**तुळ :** आज तुम्हाला चांगली बातमी मिळेल. तुमच्या स्वतःच्या प्रयत्नांनी सरकारकडून पैसे मिळवणे शक्य आहे. व्यवसायात नफा मिळण्याची शक्यता आहे.


**वृश्चिक :** आज तुम्ही नवीन योजना बनवाल. पैसे मिळवणे शक्य आहे. प्रवासामुळे तुमचा उत्साह वाढेल. कामामुळे ताण वाढेल.


**धनु :** आज तुमचा आळस तुमच्या प्रगतीत अडथळा आणेल. वाद टाळा. आर्थिक क्षेत्रात समस्या येतील, रागावर नियंत्रण ठेवा.


**मकर :** आज तुम्ही योजनांचा सखोल अभ्यास कराल. नवीन योजनेचे फायदे होतील. नोकरीत मान-सन्मान वाढेल. तुमच्या अनुपस्थितीत सर्व काम सुरळीत चालू राहील.


**कुंभ :** आज तुमचा राजकीय आदर वाढेल. तुमची लोकप्रियता वाढेल. लांब पल्ल्याचा प्रवास टाळा. जर तुम्ही आज इतरांचे ऐकून गुंतवणूक केली तर तुम्हाला आर्थिक नुकसान होईल.


**मीन :** आज तुमचे आरोग्य स्थिर राहील. नोकरीत कार्यक्षमतेचा फायदा तुम्हाला मिळेल. मुलांशी झालेल्या वादामुळे चिडचिड होईल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# घरकुल योजनेला रेतीचा 'ब्रेक'

## लाभार्थी हक्काच्या घरापासून वंचित; मोफत रेतीअभावी हजारो बांधकामे रखडली

। गणेश खडसे ।

**यवतमाळ, दि. ९ :** जिल्ह्यातील घरकूल योजनेतील हजारो लाभार्थी मोफत रेतीच्या घोषणेनंतरही प्रत्यक्षात रेती उपलब्ध होत नसल्याने बेघर होण्याच्या मार्गावर आहेत. शासनाच्या आदेशाला दोन वर्षे उलटूनही रेती घाट लिलाव न झाल्याने बांधकामे ठप्प झाली आहेत.



शासनाने घरकूल बांधकामासाठी लाभार्थ्यांना मोफत रेती देण्याची घोषणा केली होती. जानेवारी महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाच ब्रास मोफत रेती देण्याचे आदेशही जारी केले. मात्र, जिल्ह्यातील एकाही लाभार्थ्याला अद्याप याचा लाभ मिळालेला नाही. अनेक ठिकाणी उपलब्ध असलेली रेती मातीमिश्रित असल्याने ती बांधकामासाठी निकृष्ट दर्जाची ठरत आहे. यामुळे गरीब व गरजू लाभार्थ्यांना हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करता येत नाहीये आणि ते आजही उघड्यावर किंवा तात्पुरत्या निवाऱ्यात राहण्यास मजबूर आहेत. आधीच बांधकाम साहित्याच्या वाढलेल्या किमती आणि त्यात रेतीची अनुपलब्धता यामुळे लाभार्थ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

काही ठिकाणी निवडणुकीची आचारसंहिता किंवा अन्य राजकीय कारणांमुळे घरकूल योजनेचे अनुदानही प्रलंबित असल्याने त्यांची आर्थिक कोंडी अधिकच वाढली आहे. प्रशासनाने तातडीने चांगल्या प्रतीची रेती उपलब्ध करून द्यावी आणि बांधकाम साहित्याच्या किमती नियंत्रणात आणाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

### लाभार्थ्यांची दुहेरी कोंडी

एकीकडे सिमेंट, लोखंड, विटा यांसारख्या बांधकाम साहित्याच्या किमती गगनाला भिडल्या आहेत, तर दुसरीकडे घरकुलासाठी अत्यावश्यक असलेली रेती मिळेनाशी झाली आहे. मोफत रेतीची घोषणा होऊनही ती प्रत्यक्षात मिळत नसल्याने आणि बाजारात रेतीचे दर आवाक्याबाहेर गेल्याने अनेक लाभार्थ्यांनी नाइलाजास्तव आपल्या घरांचे बांधकाम थांबवले आहे. काहींना तर बांधकाम सुरूच करता आलेले नाही, त्यामुळे ते बेघर आहेत.

### मोफत रेतीचे अर्ज पडून

जिल्हा प्रशासनाने तहसील स्तरावर पात्र लाभार्थ्यांकडून मोफत रेतीसाठी अर्ज मागवले होते. हजारो अर्जही प्राप्त झाले. परंतु, जिल्ह्यातील रेती घाटांचा लिलाव गेल्या दोन वर्षांपासून रखडल्याने आणि डेपोत रेतीच उपलब्ध नसल्याने हे अर्ज तहसील कार्यालयात धूळ खात पडून आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या घोषणेची अंमलबजावणी होऊ शकली नाही, असे स्पष्टीकरण जिल्हा खनिकर्म विभागाकडून दिले जात आहे.




## आई आणि मातृत्वाचा सन्मान करण्याचा दिवस

**जगभरात मातृदिन म्हणजेच 'मदर्स डे' मोठ्या उत्साहात साजरा होतो. हा दिवस म्हणजे आई आणि मातृत्वाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. आईच्या प्रेमासाठी, त्यागासाठी आणि कुटुंबासाठी दिलेल्या योगदानासाठी हा दिवस महत्त्वाचा आहे. तसे पाहिले तर आईसाठी एकही दिवस कधीच पुरेसा नसतो. ज्या व्यक्तीने आपल्याला ९ महिने ९ दिवस पोटात ठेवले तिच्यासाठी एक दिवस कसा पुरेसा पडेल? पण तरीही ११ मे हा दिवस 'जागतिक मातृ दिवस' म्हणून साजरा केला जातो. या दिनाच्या अनुषंगाने विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आईबाबत व्यक्त केलेल्या या भावना..**



आईचा हात डोक्यावर हीच खरी संपत्ती
आई म्हणजे निस्वार्थ प्रेम,
तिच्या मायेची सर कुणालाच नाही.
तीचं अस्तित्वच आशीर्वाद आहे,
ती हसली की घर उजळतं.
आईचं प्रेम जगात सर्वात शुद्ध असतं.
तीचा हात डोक्यावर असावा,
हीच खरी संपत्ती वाटावी.

**शुभांगी राजेश बागडे (काळे),** फ्रेन्डस कॉलनी नागपूर



आईच्या कुशीतच खरं सुख
आई म्हणजे देवतेचा अवतार,
तिचं प्रत्येक काम मोलाचं असतं.
ती स्वतःस विसरून आम्हाला घडवते,
तिचं मोल शब्दात नाही मांडता येणारं.
तीचं प्रेम म्हणजे जीवनाचं बळ.
तिच्या कुशीत असतं खरं सुख.
आई, तुझ्या ऋणातून कधीच मोकळं होता येत नाही.

**वेदांत सुनील तळोकार,** एकनाथपूरम



आई शिवाय काहीही शक्य नाही
आई तुझं हास्य जीवनाचा प्रकाश,
तुझी माया हेच आमचं स्वर्ग.
तू नसेल तर सगळं सुन्न वाटतं,
तुझ्या कुशीतच खरी शांतता असते.
तुझं प्रेम निरपेक्ष आणि अटूट आहे.
तू दिलेल्या शिकवणीनेच जग जिंकतो.
आई, तुझ्याशिवाय काहीच शक्य नाही.

**आयुषी राजेश बागडे,** नागपूर



आई माझे विश्व
आई म्हणजे ताकद, प्रेरणा आणि आधार,
तिच्याशिवाय आयुष्य अपूर्ण आहे.
तिने शिकवलेले संस्कारच खरे वैभव.
तिचं प्रत्येक बोलणं सागरासारखं खोल.
आई, तू असतेस म्हणून आम्ही आहोत.
तू माझं विश्व आहेस.
मदर्स डे च्या खूप शुभेच्छा!

**शिवराज पाटील,** रामनगर, अमरावती



आई तुझं प्रेम अमर आहे,
तुझा हात म्हणजे आश्वासक सावली.
तू सतत आमच्यासाठी जागी असतेस,
तुझं न बोलताच कळतं सगळं.
आईची माया काळालाही हरवते.
तुझ्यासारखी दुसरी कोणी नाही.
मदर्स डे च्या दिवशी तुला शतशः वंदन.

**तन्वी संजय देशमुख,** एकविरा विद्युत कॉलनी,अमरावती

### प्रत्येक दिवस हवा 'मातृदिन' - प्रा.भाग्यश्री हेमंत बुरंगे



आईचे मातृत्व साजरा करण्यास केवळ एक दिवस पुरेसा नाही आईवर प्रेमाचा वर्षाव करण्यासाठी आपण प्रत्येक दिवस 'मातृदिन' (मदर्स डे) म्हणून खास बनवला तरी कमीच आहे. आपल्या आईला कधीही दुःखी होऊ न देणे, कधीही तिचा अनादर न करणे, आपल्या आईची काळजी घेणे हे प्रत्येक मुलांचे कर्तव्य आहे. आईला तिच्या मुलांचे प्रेम आणि आदर मिळणे यापेक्षा दुसरी कोणतीही मोठी भेट तिच्यासाठी असू शकत नाही.

लहानपणी शाळेत 'माझी आई' या विषयावर निबंध लिहून आणायला सांगायचे. अगदीच लहानसहान मुलांना त्या वेळीच आईचे महत्त्व या विषयी आपले मत व्यक्त करता येत असेल. सांगायचे हे आहे की लहानपणापासूनच आई नावाची महती कळायला सुरुवात होते. मदर्स डे प्रत्येकासाठी एक महत्त्वाचा दिवस आहे.

आईची ममता आणि प्रेमाला मूल्य नाही. एक आई आपलं मूल गर्भात वाढवण्यापासून ते आपल्या जिवंत राहण्यापर्यंत काळजी घेत असते. आई हीच आपल्या मुलांची पहिली शिक्षिका आणि पहिली मैत्रीण असते. लेकरांच्या हालचालीवरून त्याला काय हवे आहे हे जाणून घेणारी एक आईच असते. आई आपल्या मुलांवर नि:स्वार्थ प्रेम करते. आणि जीवनात योग्य मार्ग दाखवते. आपल्या मातांचे आभार मानण्यासाठी, त्यांच्याप्रती आपले प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपण मातृदिन साजरा करतो. अनेक शाळांमध्ये मदर्स डे मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. या दिवशी मुलांच्या आईला शाळेत आमंत्रित केले जाते. या दिवशी काही मुले त्यांच्या मातांसाठी निबंध लिहितात, त्यांच्यासाठी भाषणे करतात. काहीमुले त्यांच्या आईसाठी कार्ड तयार करतात, काही गाणी गातात, तर काही त्यांच्या आईला त्यांच्या आवडत्या वस्तू मिळवून देतात. महाविद्यालयीन स्तरावरसुद्धा असे उपक्रम राबविल्यास आईप्रति प्रत्येकाला एक दिवस कृतज्ञता व्यक्त करता येईल.

**प्रा. भाग्यश्री हे. बुरंगे,** अमरावती

### ती एक शक्ती आहे



आई ही कुणी व्यक्ती नसून ती एक शक्ती आहे. जी संपूर्ण जग व्यापूनही उरते. सर्व जगावर आपल्या मायेचे छत्र पसरवणारी ही शक्ती आपल्या छकुल्यांच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असते. ही मातृशक्ती स्त्री रुपाने आपल्यात वावरते. आपण तिचा आदर व सन्मान केला पाहिजे. नारी सन्मान ही कृतज्ञतेची पावती आहे.

**- नलिनी देशमुख,**
सचिव, मातुश्री शिक्षण सेवा मंडळ, नवीन खेतान नगर.

### ममतेच्या सावलीस मानाचा मुजरा



''आई मायेची सावली,
आई सुखाचा सागर
निळ्या आकाशाएवढा
तिचा मायेचा पदर''

हा दिवस प्रत्येक मातृत्वाचे वंदन करणारा आहे. मजुरी करणाऱ्या महिलांपासून ते भारताचे संरक्षण करणाऱ्या मातृशक्तिचा हा वंदनीय दिवस आहे. आई ही आपली प्रथम गुरु आहे. ती श्रेष्ठ दैवत आहे. आई मायेचा सागर असते. ती आपल्या मायेने आपल्या लेकरांचं आयुष्य सुंदर करते. आई या शब्दात संपूर्ण संसाराची एक सकारात्मक शक्ती वसलेली आहे. हा शब्द उच्चारता जगातील संकटाशी लढण्याचं बळ येतं. आई ही आई असते ती मायेची,ममतेची दैवत असते. ती अशी मातृशक्ती आहे, जी नेहमी आपल्या बालकांच्या रक्षणास तत्पर असते. आईचं ममत्व या जगात कुठेच मिळत नाही, ते फक्त आईच्या पदरात असतं. अशा मायेच्या सागरास,ममतेच्या सावलीस मानाचा मुजरा.

**- डॉ. श्वेता दीक्षित,**
मुख्याध्यापिका, स्कूल ऑफ स्कॉलर्स बिर्ला कॉलनी, अकोला.

### नाजूक व हलाखीच्या परिस्थितीमधून आमच्या आईचे कष्ट



माझी आई गं भा गंगाबाई विश्राम चोपडे मु पो झोडगा ता बार्शीटाकळी जिल्हा अकोला आम्ही एकूण चार मुले आहोत आमची परिस्थिती एक्दम हला खिची होती १९७०चा काळ इतक्या नाजूक व हलाखीच्या परिस्थिती मधून आमच्या आईने खूप काबाळ कस्ट करून आम्हाचारही भावांडांना शिक्षणा चे महत्व काय असते ते नेहमी सांगत असे आमची आई फक्त पहिला वर्ग शिकेल होती परंतु माझे मुलं शिक्षनातूनच पुढे जातील असे वारंवार सांगत असे आज आमच्या आईमुळेच आम्ही सर्व भाऊ शिक्षण घेऊन चांगल्या हुद्यावर आहोत आम्हाला गर्व आहे आमच्या आईचा आज रोजी सुद्धा आमची काळजी करते तिचे वय ७८वर्षाची असून सुद्धा स्वतः ची काम स्वतः करते शालूट अशा आईला.

**प्रवीण गंगाबाई विश्राम चोपडे**

### खूप संघर्ष करून आमच्या सर्व भावंडांवर चांगले संस्कार



माझी आई नामें पंचफुलाबाई सखाराम सरदार अतिशय मनमिळाऊ, साधी पण उच्च विचाराची संसाराचा पूर्ण गाडा अतिशय काटेकोर पणे पुढे घेऊन जीवनामध्ये खूप संघर्ष करून आमच्या सर्व भावंडावर चांगले संस्कार देऊन सर्वांना सुशिक्षित केले पण आज ती आम्हाला सोडून गेली व संपूर्ण आठवणी ठेऊन क्षनोकक्षणी सदैव आमच्या ह्रदयात वास करीत असते अशा आईला त्रिवार अभिवादन

**मंगला प्रवीण चोपडे**
अंगणवाडी सेविका अकोला

### आईसारखा दुसरा गुरू नाही



माझ्या जीवनात आईची भूमिका अतिशय मोलाची असून आई हा माझा पहिला गुरू आहे. मुलाला बोट धरून चालण्यापासून तर जीवनात कुठल्या परिस्थितीला कसे सामोरे जायचे याचे धडे आईकडूनच मिळत असतात. अतिशय बिकट परिस्थितीत आपल्या इच्छा बाजूला ठेवून आई नेहमीच मुलांसाठी तत्पर असते. पालन पोषण करण्यापासून काटकसर करण्यापर्यंत घर कसे चालवावे हे आईकडून शिकण्यासारखे आहे. या जगात आईसारखा दुसरा गुरू नाही.

**- पौर्णिमा पाचपोहे,**
उपनिबंधक, महापालिका



### आई शब्दातच मोठं बळ आहे

'आईविना स्वामी तिन्ही जगाचा भिकारी', असे उगाच म्हणत नाहीत. आईपेक्षा श्रेष्ठ या जगात दुसरा कुणीही नाही. मुलांच्या पालन पोषणापासून त्यांना घडविण्याचे काम आई करीत असते. कुंभार ज्या प्रमाणे मातीला आकार देऊन विविध उपयोगी वस्तू तयार करतो, त्या प्रमाणे आई मुलांना आकार देत असते. आईची भूमिका अतिशय महत्त्वाची असून, ती भूमिका पार पाडण्यासाठी ती स्वतःला जाळत असते. मुलांच्या यशामध्ये आईचा सिंहाचा वाटा असतो.

**ॲड.मीनाक्षी बेलसरे**
सहायक सरकारी वकील शासकीय अधिवक्ता.

### आईविना सर्वकाही अधुरे



आई म्हणजे प्रेम, त्याग आणि ममतेचे प्रतीक आहे. ती मुलांसाठी एक आधारस्तंभ, मार्गदर्शक आणि मैत्रीण असते. आईचे प्रेम बिनशर्त आणि निस्वार्थी असते. ती मुलांच्या जीवनात आनंद आणि दुःख दोन्ही मध्ये साथ देते. आईचे महत्त्व तिच्या मुलांच्या जीवनात अनमोल असते. आईचा आधार असला की कुठलंही संकट आलं तरी खचून जात नाही. त्यामुळे जीवनात आई हा शब्द अतिशय बळ देणारा आहे. यशाची प्रत्येक पायरी मूल आईच्या आधाराने चढत असतो.

**- योगिता पावसाळे,**
माजी नगरसेविका



### ...तेव्हाच खरं मातृत्व कळतं!

ती बरेचदा रागावते. तिचा जीव बरेचदा प्रेमाच्या शब्दांपलीकडे जाऊन वैतागून समजावण्याचा प्रयत्न करते; पण तिच्या आपुलकीची आणि मातृत्वाची आपल्याला जाणीवच होत नाही. कारण मातृत्व आईचं प्रेम आणि काळजीही तिचीच आपल्या लेकरासाठी... खरंतर मातृत्वाची जाणीव ही मातृत्वाची जबाबदारी आल्यावरच कळते, हे मात्र खरं. ज्यावेळी मी एका बाळाची आई झाली, त्यावेळी मला खरं मातृत्व कळलं. आपल्या काळजाच्या गोळ्यावर तो जन्माला यायच्या येण्याआधीपासूनच प्रेम करायला लावतो. तो जीव जन्माला येण्याआधीपासूनच अनेक स्वप्न रंगवतो... असंख्य वेदना सहन करून बाळाला जन्म देण्याची ताकद स्त्रीमध्ये येते आणि तेव्हाच ती आई बनते. या मातृदिनी माझी सर्वांना एकच विनंती, आईच्या प्रेमाला समजून घ्या. अनंत प्रेम करा. मातृदिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

**- ऋचा राम वायझोडे,(एलएलएम)** नागपूर.

### तिचे ऋण कधीच फेडता येणार नाहीत



कोणत्याही लेखणीमध्ये एवढी ताकद नाही की आईचे वर्णन लेखणीने लिहू शकू! कोणत्याही शब्दांमध्ये एवढी ताकद नाही की तिचे वर्णन शब्दांमध्ये करता येईल. आई नऊ महिने आपल्या उदरामध्ये बाळाला ठेवून स्वतःला सांभाळते. तिच्या श्वासाबरोबर श्वास देते. तिच्याबरोबर अन्न त्या बाळापर्यंत पुरवते. स्वतःबरोबर बाळाचा सांभाळ करते. प्रत्येक क्षणाला तिचा स्वतःचा विचार न करता बाळाचा विचार करते, अशा आईचे महत्त्व कसे शब्दात वर्णन करता येईल! तिचे ऋण, उपकार आयुष्यभर तिला सांभाळूनसुद्धा फेडता येणार नाही, अशी ती आई.

**- सुषमा देशमुख,** शिक्षिका न्यू ईरा हायस्कूल, अकोला, तथा जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड.

### प्रत्येकाच्या आयुष्यात आईचे स्थान श्रेष्ठ



आपल्या मुलांचे चारित्र्य आणि व्यक्तिमत्त्व घडवणारी आई असते. सर्व माता आपल्या मुलांना वाढवतात आणि विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. ती तिच्या मुलाला आवश्यक असलेल्या प्रत्येक गोष्टीची काळजी घेते. आई ही तिच्या मुलांची पहिली गुरू असते. प्रत्येक गोष्टीत ती तिच्या मुलांच्या पाठीशी उभी राहते आणि त्यांना जीवनातील प्रत्येक वळणावर मार्गदर्शन करते. ही एक आईच चुकीच्या गोष्टींपासून आणि ते चुकीचे वागण्यापासून रोखते. मुले चुकीच्या रस्त्याने जाताना ती त्यांना खडसावते आणि त्यांना योग्य मार्ग दाखवते, म्हणूनच आई ही कोणत्याही मुलाची गुरू म्हणून ओळखली जाते. आईसाठी तिचे संपूर्ण जग तिच्या मुलांभोवती फिरते. आई नेहमीच आपल्या मुलांना प्रेरणा देते, त्यांना पुढे जाण्यासाठी आणि जीवनात कठोर परिश्रम करण्यास प्रोत्साहित करते. माझ्या आतापर्यंतच्या जडणघडणीत आईचे योगदान मोठे आहे.

**रोहिणी अ. चवणे**



आई म्हणजे देवाचे सर्वात सुंदर रुप
माझी आई म्हणजे माझं जग आहे.
तिचं हास्य म्हणजे माझं सुख आहे.
ती संकटांमध्ये माझं बळ असते.
आई म्हणजे नि:स्वार्थ प्रेमाचा मूर्तिमंत अवतार आहे.
तिच्या मायेच्या सावलीत मी सुरक्षित असते.
ती माझं प्रत्येक स्वप्न समजून घेते.
माझी चूकही ती प्रेमाने सुधारते.
आईशिवाय जीवन अपूर्ण वाटतं.
ती देवाचं सर्वात सुंदर रूप आहे.
मदर्स डे म्हणजे तिच्या मोलाची आठवण.

**वृषाली पराग गावंडे,** रुक्मिणीनगर अमरावती.



आई म्हणजे पहिला शिक्षक
आई म्हणजे पहिला शिक्षक.
ती माझी मार्गदर्शक आणि आधारस्तंभ आहे.
तिचं प्रेम कधीही कमी होत नाही.
आईच्या कुशीतच खरी शांती मिळते.
तिच्या शिवाय प्रत्येक दिवस अधूरा वाटतो.
आईचा स्पर्श म्हणजे आशीर्वाद आहे.
ती आपल्या स्वप्नांपेक्षा माझे स्वप्न मोठं मानते.
आई माझी पहिली आणि शेवटची प्रेरणा आहे.
मदर्स डे हा तिच्या त्यागाचा सन्मान करण्याचा दिवस आहे.
आईसारखी कोणी नाही ती अनमोल आहे

**सायली नितेश देशमुख,** रुक्मिणीनगर, अमरावती.



आईच्या कुशित स्वर्ग सापडतो
माझी आई म्हणजे मायेचं सागर आहे.
तिच्या कुशीत मला स्वर्ग सापडतो.
ती थकली तरी माझ्यासाठी सतत धावते.
तिच्या शब्दात आशीर्वादाचं बळ असतं.
आईचं हसणं म्हणजे माझं जग उजळणं.
ती माझ्या दुःखांवर फुंकर घालणारी आहे.
तिला दुखवणं म्हणजे स्वतःला दुखवणं.
आईच्या कुशीत जगाचे सगळे प्रश्न मिटतात.
ती माझ्या यशाच्या मुळाशी असते.
आई आहे म्हणून मी आहे.

**अमिता पियुष गावंडे, रुक्मिणीनगर**



आईच्या मिठीत सारे प्रश्न संपतात
आईचे हात म्हणजे श्रमाचं सुंदर चित्र.
ती रडते, पण फक्त माझ्यासाठी लपून.
तिचं ''थोडं खा'' हेच तिचं प्रेम असतं.
आईच्या मिठीत सारे प्रश्न दूर होतात.
तिच्या डोळ्यांतून माझं भविष्य दिसतं.
आई म्हणजे एक अंतहीन प्रेमकथा.
ती मला ओळखते, शब्दांशिवायही.
आईच्या बोटांनी चालायला शिकलो.
आई माझ्या प्रत्येक यशात सहभागी असते.
मदर्स डे म्हणजे तिच्या प्रत्येक दिवसाचं प्रतीक.

**समीक्षा नरेंद्र लोंदे, नेरपिंगळाई**



आईच्या हातचं पोळं म्हणजे पराठ्यांवर भारी!
मी लपले तरी माझा पत्ता तिला सापडतो.
आईचं ''पुस्तक उघड'' म्हणजे मोबाईल बंद!
ती ''मीच बघितलंय'' म्हणते, आणि खरंच बघितलेलं असतं!
तिच्या ''उशीर झाला'' या वाक्याचं वजन भारी असतं.
मी जेव्हा आजारी पडतो, ती डोक्यावर बसते.
तिचं ''दहा मिनिटांत येते'' कधी ३० मिनिटांखालचं नसतं!
आईचा राग म्हणजे पावसाआधीचा वारा!
तिचं ''बघते तुला घरी आल्यावर'' हे सस्पेन्स फिल्मपेक्षा भारी!
तरीही, तीच माझी सर्वात मोठी फॅन आहे!

**भाविका पियुष गावंडे,** रुक्मिणीनगर



आई म्हणजे संसाराची शिल्पकार असते.
ती आपलं आयुष्य घडवण्यासाठी झटते.
आईचं प्रेम हे निसर्गासारखं असतं न थकणारे.
ती आपल्याला चांगले संस्कार देते.
आईच्या सहवासात बालपण सुंदर होतं.
ती आपल्याला आत्मविश्वास देते.
आईचं स्थान समाजात अतिशय महत्त्वाचं आहे.
मदर्स डे हा तिच्या योगदानाची आठवण आहे.
आपल्याला तिचा आदर राखणं गरजेचं आहे.
आई या शब्दात संपूर्ण विश्व सामावलेलं आहे.

**रुपाली मनीष गावंडे,** अमरावती



आई म्हणजे न थकणारी साथ.
तिचं अस्तित्व म्हणजे माझी ओळख.
आईची एक हाक पुरेशी असते.
तिचं प्रेम शब्दांपलीकडचं आहे.
आई हसली की मी हरखून जातो.
ती नाराज झाली की मन बेचैन होतं.
आईचं ''शाबास'' म्हणजे जग जिंकल्यासारखं.
ती असते तिथेच घर असतं.
आईचा रागही प्रेमाचाच भाग आहे.
आईसाठी रोजच मदर्स डे असावा.

**स्नेहल अनुज टेकाडे,** साईनगर

## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुजरात | 11 | 8 | 3 | 0 | 0 | 16 | +0.793 |
| बेंगलुरु | 11 | 8 | 3 | 0 | 0 | 16 | +0.482 |
| पंजाब | 11 | 7 | 3 | 0 | 1 | 15 | +0.376 |
| मुंबई | 12 | 7 | 5 | 0 | 0 | 14 | +1.156 |
| दिल्ली | 11 | 6 | 4 | 0 | 1 | 13 | +0.362 |
| कोलकाता | 12 | 5 | 6 | 0 | 1 | 11 | +0.193 |
| लखनौ | 11 | 5 | 6 | 0 | 0 | 10 | -0.469 |
| हैदराबाद | 11 | 3 | 7 | 0 | 1 | 7 | -1.192 |
| राजस्थान | 12 | 3 | 9 | 0 | 0 | 6 | -0.718 |
| चेन्नई | 12 | 3 | 9 | 0 | 0 | 6 | -0.992 |

# इंग्लंड दौरा: टीम इंडियात होणार बदल

नवी दिल्ली : दि. १० प्रतिनिधी

भारत-पाकिस्तान तणाव वाढत आहे. त्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी बीसीसीआयकडून आयपीएल २०२५ एका आठवड्याने पुढे ढकलण्यात आले आहे. त्याच्या कामकाजाबाबतचा निर्णय एका आठवड्यानंतर घेतला जाणार आहे. अशी माहिती समोर आली आहे. तसेच, भारतीय संघाला पुढील महिन्यात इंग्लंडचा दौरा देखील करायचा आहे. या काळात संघ इंग्लंडविरुद्ध पाच कसोटी सामनेखेळणार आहे. या मालिकेला २० जूनपासून सुरवात होत आहे. याआधी २००७ मध्ये भारतीय संघाने राहुल द्रविडच्या नेतृत्वाखाली इंग्लंड कसोटी मालिका जिंकली होती.अशा परिस्थितीत आता रोहित शर्माने मालिकेपूर्वी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. त्याच्या अनुपस्थितीत ही मालिका भारतीय संघासाठी खूप महत्त्वाची ठरणार आहे. यापूर्वी, भारतीय संघाला२०२५ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत स्थान



मिळवता आले नाही. म्हणूनच, इंग्लंडविरुद्धची ही पाच सामन्यांची कसोटी मालिका २०२५-२७ च्या जागतिक क्रिकेट स्पर्धेच्या चक्रात संघासाठी एक नवीन सुरुवात असणार आहे.रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. अशा परिस्थितीत, कसोटी मालिकेसाठी टीम इंडियाला नवीन कर्णधाराची गरज आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, सध्या भारतीय संघाच्या नवीन कर्णधारासाठी शुभमन गिल आणि जसप्रीत बुमराह यांच्यात स्पर्धा रंगली आहे. हे दोन्ही खेळाडू सद्या कर्णधारपदाच्या शर्यतीत आघाडीवर आहेत. यावेळी इंग्लंडविरुद्धच्या भारतीय संघात बी साई सुदर्शन, करुण नायर, वॉशिंग्टन सुंदर आणि मोहम्मद शमी हे खेळाडूंचा समावेश होऊ शकतो.इंग्लंड मालिकेत यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिल संघाकडून डावाची सुरुवात करतील. त्यानंतर विराट कोहली तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करेल. त्याच वेळी, केएल राहुलला यष्टीरक्षक म्हणून पसंती देण्यात येईल. तर डावखुरा फलंदाज बी. साई सुदर्शन देखील संघात जागा मिळवू शकतो. साई सुदर्शनने उत्तम कामगिरी करत आहे. याशिवाय, करुण नायरलाही संघात स्थान मिळू शकते अशी बातमी समोर आली आहे. हे उल्लेखनीय आहे की करुण नायरने इंग्लंडविरुद्ध तिहेरी शतकही झळकावले आहे.

# आयपीएल स्थगित होताच काव्या मारनच्या उदारतेचे दर्शन

नवी दिल्ली : दि. १० प्रतिनिधी

भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणाव वाढत असल्याकारणाने बीसीसीआयने आयपीएल २०२५ एका आठवड्यासाठी स्थगित केले आहे. बीसीसीआयच्या या घोषणेनंतर, आगामी सर्व सामने पुढे ढकलले आहेत. बोर्डाच्या या निर्णयानंतर, सनरायझर्स हैदराबादची मालकीण काव्या मारनने एक मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयाने तिने चाहत्यांचे मनं जिंकली आहेत.आयपीएल २०२५ मध्ये सनरायझर्स हैदराबादचा पुढील सामना १० मे रोजी कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध खेळवण्यात येणार होता. पण आता स्पर्धा स्थगित झाल्यामुळे हा सामना देखील होणार नाही. अशा परिस्थितीत, काव्याने या सामन्यासाठी विकल्या



गेलेल्या तिकिटांचे संपूर्ण पैसे प्रेक्षकांना परत करण्याचा निर्णय घेतला आहे. फ्रँचायझीने सोशल मीडियाद्वारे या निर्णयाची माहिती दिली.८ मे रोजी पाकिस्तानकडून भारतातील अनेक शहरांमध्ये ड्रोन हल्ले करण्याचा प्रयत्न केला. भारताने त्या हल्ल्यांना उधळून लावले. यानंतर, आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलने तात्काळ आपत्कालीन बैठक बोलावण्यात आली. या आपत्कालीन बैठकीत सर्व फ्रँचायझी मालकांशी चर्चा केल्यानंतर, ९ मे पासून १ आठवड्यासाठी लीग थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर एसआरएचने १० मे रोजी होणाऱ्या सामन्याच्या तिकिटांचे पैसे परत करण्याचे जाहीर केले.

फ्रँचायझीकडून सांगण्यात आले की, ''सध्याची परिस्थिती लक्षात घेता, आयपीएल २०२५ तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आले आहे. तिकिटांच्या परतफेडीची माहिती लवकरच दिली जाईल.'' एसआरएचच्या या हालचालीनंतर, सोशल मीडियावरील लोक फ्रँचायझी आणि काव्या मारनचे कौतुक करताना दिसत आहे. याशिवाय, एसआरएचने भारतीय सैन्याच्या शौर्य आणि शौर्याला सलाम करणारी एक भावनिक पोस्टही शेअर केली आहे. त्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, ''आम्ही आमच्या वीरांचा सन्मान करतो, अभिमानाने एकजूट होतो आणि भारतीय सशस्त्र दलांच्या अटळ समर्पणाला आम्ही सलाम करतो. जय हिंद.''पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील एसआरएच संघासाठी आयपीएल २०२५ खूप वाईट राहिले आहे.

# रोहितपाठोपाठ विराटही निवृत्तीच्या तयारीत



नवी दिल्ली : दि.१० प्रतिनिधी

भारतीय संघातील स्टार फलंदाज रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. त्यामुळे बीसीसीआय सध्या नव्या कर्णधाराच्या शोधात आहे. येत्या काही दिवसांत भारतीय संघ कसोटी मालिका खेळण्यासाठी इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. या मालिकेत नवा कर्णधार संघाचं नेतृत्व करताना दिसेल. दरम्यान आता रोहित पाठोपाठ विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. मात्र, बीसीसीआयने त्याला फेरविचार करण्यास सांगितले आहे.

द इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या माहितीनुसार, विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. मात्र, बीसीसीआयने त्याला स्पष्ट होकार किंवा नकार दिलेला नाही. येत्या काही दिवसांत इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघाची घोषणा केली जाणार आहे. हा दौरा भारतीय संघासाठी अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळे रोहितनंतर विराटसारखा अनुभवी खेळाडू संघात असणं अतिशय गरजेचं आहे. त्यामुळे बीसीसीआयने त्याला या निर्णयावर फेरविचार करावा असं सांगितलं आहे.करूण नायर हा वीरेंद्र सेहवागनंतर कसोटी तिहेरी शतक झळकावणारा दुसराच भारतीय फलंदाज आहे. त्याची फलंदाजी टेक्निक पाहता, तो कसोटीत मधली फळी सांभाळू शकतो. गेल्या एक दशकापासून विराट कसोटीत चौथ्या क्रमांकावर खेळतोय. करूण नायर ही जागा घेऊ शकतो.रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूचा कर्णधार रजत पाटीदार कसोटी क्रिकेटमध्ये विराट कोहलीची जागा घेऊ शकतो. २०२४ मध्ये त्याला इंग्लंडविरूद्ध पदार्पण करण्याची संधी मिळाली होती. मात्र त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. या कामगिरीची दखल घेऊन त्याला इंग्लंड दौऱ्यासाठी संधी दिली जाऊ शकते.आयपीएल २०२५ स्पर्धेत साई सुदर्शनच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे.

२०२३ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या वनडे मालिकेत पदार्पण करण्याची संधी मिळाली होती. यादरम्यान त्याने २ अर्धशतकं झळकावली होती. आयपीएल २०२५ स्पर्धेतही त्याने धावांचा पाऊस पाडला आहे. त्याचा फॉर्म पाहता, त्याला कसोटी संघात स्थान दिले जाऊ शकते.



# यशस्वी जैस्वालचा यू-टर्न

नवी दिल्ली : दि. १० प्रतिनिधी

भारतीय क्रिकेटमध्ये आयपीएल सुरू असताना देशांतर्गत क्रिकेटमधून मोठी बातमी समोर आली होती. भारतीय संघाचा सलामीवीर आणि मुंबईचा युवा क्रिकेटपटू यशस्वी जैस्वाल याने मुंबईचा संघ सोडून गोव्याच्या संघाकडून खेळण्याचे निश्चित केले होते. यशस्वी जैस्वालने यासंदर्भात मुंबई क्रिकेट संघटनेला पत्र लिहून म्हणजेच ना हरकत पत्र देण्याची विनंती केली होती. तसेच ही विनंती मुंबई क्रिकेट संघटनेने मान्यही केली होती. त्यामुळे आता यशस्वी जयस्वालचा गोव्याकडून खेळण्याचा मार्ग मोकळा झाला होता. पण आता यशस्वीने आपल्या निर्णयावरून यु टर्न घेतला असल्याचे सांगण्यात येत आहे.यशस्वी जैस्वाल याने मुंबई क्रिकेट असोसिएशनला एक पत्र लिहिले आहे. त्या पत्रात त्याने आधी मागितलेले ना हरकत पत्र रद्द करण्याची मागणी केली आहे. त्याने पत्रात असेही नमूद केले आहे की त्याचा भविष्यात आपल्या कुटुंबासोबत गोव्यामध्ये जाऊन वास्तव्य करण्याचा प्लॅन होता. परंतु काही कारणास्तव तो प्लॅन सध्या रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईकडून देण्यात येणारे ना हरकत पत्र रद्द करून त्याला यंदाच्या देशांतर्गत क्रिकेटच्या हंगामासाठी मुंबई संघाकडूनच खेळू दिले जावे. तो यंदाच्या हंगामातील मुंबईच्या सर्वसामान्यांच्या निवडीसाठी उपलब्ध असेल.ऑस्ट्रेलिया मध्ये झालेल्या ट्रॉफी २०२४-२५ मध्ये यशस्वीने सलामीवीर म्हणून अप्रतिम कामगिरी करून दाखवली होती. त्याने पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत ४३ च्या सरासरीने ३९१ धावा ठोकल्या होत्या. त्यामुळे यशस्वी हा केवळ टीम इंडियासाठीच नव्हे, तर मुंबईच्या संघासाठी खूप महत्त्वाचा कसोटीपटू आहे. अशा परिस्थितीत यशस्वीने गोव्याच्या संघात जाण्याची इच्छा व्यक्त केली त्यावेळी मुंबई क्रिकेट असोसिएशनला देखील आश्चर्याचा धक्का बसला होता. पण आता यशस्वीने यू टर्न घेतला असल्यामुळे तो यंदाच्या हंगामात मुंबई संघाकडूनच खेळेल अशी शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान यशस्वी ने केलेल्या ई-मेल ला अद्याप एमसीए कडून कोणतेही उत्तर देण्यात आलेले नाही आणि यशस्वी च्या मागणीवर अद्याप कुठलाही निर्णयही घेतला गेलेला नाही.

## खनिज तेलाच्या किमती घसरल्या



**नवी दिल्ली:** भारत हा जगातील सर्वात मोठा तिसऱ्या क्रमांकाचा खनिज तेल आयात करणारा देश आहे. भारत आपल्या गरजेच्या ८५% खनिज तेल आयात करतो. मात्र सध्या जागतिक बाजारात मागणी कमी आणि पुरवठा जास्त या परिस्थितीमुळे खनिज तेलाचे दर ६० डॉलरच्या जवळपास आले आहेत. हे दर असेच राहिले तर भारताचा १.८ लाख कोटी रुपयाचा फायदा होऊ शकतो असे मूल्यांकन ईक्रा या संस्थेने केले आहे.

भारताने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षांमध्ये २४२.४ अब्ज डॉलरचे खनिज तेल आयात केले. त्याचबरोबर १५.२ अब्ज डॉलरचा एलएनजी आयात केला. या आठवड्याच्या सुरुवातीला तेलाचा दर ६० डॉलर प्रति पिंपावर गेला होता. आगामी काळातही अशीच परिस्थिती राहण्याची जास्त शक्यता आहे. आता अमेरिकेतील उत्पादन कमी झाल्यामुळे आणि युरोप आणि चीन मधून मागणी वाढल्यामुळे खनिज तेलाचे दर ६२ डॉलरवर गेले आहेत. मात्र तरीही मार्च २०२४ च्या तुलनेत खनिज तेलाचे दर २० डॉलरने कमी आहेत. मार्च २०२४ मध्ये भारतात लोकसभा निवडणुकाअगोदर पेट्रोल आणि डिझेलचे दर दोन रुपयांनी कमी करण्यात आले होते. एकूण परिस्थिती पाहता ईक्राने आगामी वर्षात खनिज तेलाचा दर ६० ते ७० डॉलर दरम्यान राहील असे म्हटले आहे. अशा परिस्थितीत भारताचा खनिज तेल आयातीत १.८ लाख कोटी रुपयाचा आणि एलएनजी आयातीत ६,००० कोटीचा फायदा होऊ शकतो. त्यामुळे पेट्रोल पंपांना मिळणाऱ्या मार्जिनवर नकारात्मक परिणाम होणार नाही. तर एलएनजी आयात करणाऱ्या कंपन्यांना अधिक लाभ होऊ शकतो.व्यापार युद्ध आणि विविध देशादरम्यानच्या तणावामुळे तेल उत्पादक देशाची संघटना ओपीइसीने मे महिन्यापासून प्रतिदिन ४ लाख ११ हजार पिंप जास्त तर जून २०२५ पासून ४ लाख ११ हजार पिंप आणखी जास्त तेल उत्पादन करण्याचा निर्णय घेतला.

# बँकांचे सर्व एटीएम पुरेशा पैशांसह कार्यरत

## अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन



नवी दिल्ली : दि.१० प्रतिनिधी

भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आगामी काही दिवसांत बँकांची एटीएम बंद होण्याच्या अफवा समाजमाध्यमावर पसरल्या असून, स्टेट बँक, पंजाब नॅशनल बँकेसह इतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी त्या शुक्रवारी फेटाळून लावल्या. सर्व एटीएम कार्यरत असून, त्यात पुरेशी रक्कम आहे आणि डिजिटल सेवाही सुरळीत सुरू असल्याचे बँकांनी स्पष्ट केले.

भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर समाजमाध्यमावर अनेक अफवा पसरत आहेत. त्यात आगामी काही दिवसांत बँकांची एटीएम बंद होण्याच्या अफवा पसरल्या होत्या. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी या अफवा फेटाळून लावल्या आहेत. देशातील सर्वांत मोठी बँक असलेल्या स्टेट बँकेने समाजमाध्यमावर प्रसृत केलेल्या संदेशात म्हटले आहे की, आमची सर्व एटीएम सुरळीपणे सुरू आहेत. याचबरोबर डिजिटल सेवाही व्यवस्थित सुरू असून, ग्राहकांच्या वापरासाठी उपलब्ध आहे. ग्राहकांना खोट्या माहितीवर विश्वास ठेवू नये.याचबरोबर बँक ऑफ बडोदा, कॅनरा बँक, युनियन बँक, बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक, पंजाब अँड सिंध बँक आणि पंजाब नॅशनल बँक या बँकांनीही अशाच प्रकारचे स्पष्टीकरण दिले आहे. या बँकांनी त्यांच्या सर्व सेवा सुरळीतपणे सुरू असल्याचे म्हटले आहे. याचबरोबर डिजिटल सेवा सुरू असल्याने ग्राहक घरातून बसून सेवेचा सोयीस्कर वापर करावा, असेही बँकांनी नमूद केले आहे.सीमावर्ती भागातील बँक कर्मचाऱ्यांना काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यांनी तेथील स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. बँकेकडून सर्व शाखा आणि एटीएममध्ये पुरेशी रोकड ठेवण्यात आली आहे. याचबरोबर सायबर सुरक्षेच्या उपाययोजनांतही वाढ करण्यात आली आहे, असे युनियन बँक ऑफ इंडियाचे मुख्याधिकारी व व्यवस्थापकीय संचालक ए. मनिमेखलाई यांनी स्पष्ट केले.

# 'सॅटकॉम'साठी स्पेक्ट्रम वाटप, किमतीचा तिढा अखेर मार्गी

नवी दिल्ली : दि.१० प्रतिनिधी

दूरसंचार क्षेत्राची नियामक 'ट्राय'ने उपग्रह-आधारित इंटरनेट सेवा अर्थात 'सॅटकॉम'साठी स्पेक्ट्रमच्या किंमतींवरील शिफारसींची शुक्रवारी घोषणा केली. अब्जाधीश एलॉन मस्क यांच्या स्टारलिंकसह, रिलायन्स जिओचे मुकेश अंबानी, ॲमेझॉन या सारख्या दिग्गजांमध्ये आखाडा रंगलेल्या या क्षेत्रातील सेवा प्रदात्यांवर वार्षिक उत्पन्नाच्या ४ टक्के शुल्क आकारण्याचा सल्ला देण्यात आला आहे.शहरी भागात सेवा देणाऱ्या सेवा प्रदात्यांना दरवर्षी प्रति ग्राहक ५०० रुपये अतिरिक्त शुल्क द्यावे लागेल, असे 'ट्राय'ने दूरसंचार विभागाला सादर केलेल्या दिलेल्या शिफारसींमध्ये म्हटले आहे. ग्रामीण भागातील सेवांसाठी कोणताही अतिरिक्त कर लागू होणार नाही.भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण अर्थात 'ट्राय'च्या शिफारसीनुसार, सॅटकॉम सेवेसाठी



स्पेक्ट्रमचे वाटप हे पाच वर्षांसाठी केले जावे, ज्याची मुदत आणखी दोन वर्षांसाठी वाढवता येईल. प्रति मेगाहर्ट्झ किमान वार्षिक स्पेक्ट्रम शुल्क ३,५०० रुपये आकारले जाईल.या शिफारशी जाहीर करताना, 'ट्राय'चे अध्यक्ष अनिल कुमार लाहोटी म्हणाले, सॅटकॉम सेवा उपलब्ध झाल्यानंतर दूरसंचाराचे जाळे उपलब्ध नसलेल्या वंचित भागाला सेवा जाळ्यात आणण्यात त्या महत्त्वाची भूमिका बजावू शकतील. कोणत्याही आपत्तीच्या प्रसंगात, बचाव आणि मदत कार्याच्या अंगाने ही बाब महत्त्वाची ठरेल.'ट्राय'च्या या शिफारशींवर आधारित, केंद्रीय दूरसंचार विभाग आता उपग्रह स्पेक्ट्रमच्या किंमतीसाठी कॅबिनेटपुढे प्रस्ताव ठेवेल. हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर भारतात सेवा देऊ इच्छिणारी कोणतीही 'सॅटकॉम' सेवा ही परवान्यासाठी अर्ज सादर करू शकेल.आठवड्याच्या सुरुवातीला स्टारलिंकला त्यांच्या सेवा सुरू करण्यासाठी इरादापत्र दिले गेले आहे. आता भारतात सेवा सुरू करण्यापूर्वी त्यांना परवाना घ्यावा लागेल. एलॉन मस्क यांच्या नेतृत्वाखालील स्टारलिंकने त्यांच्या ब्रॉडबँड इंटरनेट सेवा भारतात आणण्यासाठी रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेलशी आधीच करार केला आहे.गेल्या काही महिन्यांपूर्वीपर्यंत जिओ आणि एअरटेल या स्टारलिंकच्या प्रतिस्पर्धी कंपन्या म्हणून भूमिका बजावत होत्या आणि भारतात उपग्रह-आधारीत इंटरनेट सेवा अर्थात 'सॅटकॉम'साठी स्पेक्ट्रम हे सध्याप्रमाणे सरकारद्वारे वाटप केले जाण्याऐवजी, त्यासाठी स्पर्धात्मक लिलावाची पद्धत योजली जाण्याच्या मागणीसाठी त्या एकत्र आल्या होत्या. दुसरीकडे, एलॉन मस्क यांनी आंतरराष्ट्रीय नियमांनुसार प्रशासकीय वाटपासाठी मोर्चेबांधणी केली होती. सरकारने प्रशासकीय मार्गाने पूर्व-निर्धारित किमतीत स्पेक्ट्रम वाटपाला मान्यता दिल्यानंतर, स्टारलिंकच्या प्रवेशाचा मार्ग खुला झाला आणि जिओ-एअरटेलने भूमिका बदलत मस्क यांच्याशी संधानही बांधले.

# बाजारात सलग दुसऱ्या दिवशी घसरण; सेन्सेक्स ८८० अंकांनी घसरला

नवी दिल्ली : दि.१० प्रतिनिधी

जागतिक बाजारातून सकारात्मक संकेत असताना, भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या भू-राजकीय तणावाचा परिणाम गुंतवणूकदारांच्या भावनेवर झाला. परिणामी, शुक्रवारी भारतीय बेंचमार्क निर्देशांक प्रत्येकी १ टक्के घसरले. विशेष म्हणजे सलग दुसऱ्या दिवशी शेअर बाजारात आज विक्रीचा दबाव राहिला. बीएसई सेन्सेक्स ८८० अंकांनी (-१.१ टक्के) घसरून ७९,४५४ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक (-१.१ टक्के) २६५ अंकांच्या घसरणीसह २४,००८ वर बंद झाला.बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ९ मे रोजी १.८९ लाख कोटी रुपयांनी कमी होऊन ते ४१६.६१ लाख कोटी रुपयांवर आले. ८ मे रोजी बाजार भांडवल ४१८.५० लाख कोटी रुपये होते. त्यात आज घट झाली.बाजारातील भयसूचकांक इंडिया निर्देशांक आज सुमारे ३ टक्के वाढला. जो गुंतवणूकदारांमधील वाढत्या सावधगिरीचे संकेत देतो.

आजच्या सत्रात रियल्टी, बँकिंग, फायनान्सियल शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण दिसून आली. रियल्टी निर्देशांक २.३ टक्के आणि प्रायव्हेट बँक निर्देशांक १.३ टक्के खाली आला. तर कॅपिटल गुड्स शेअर्समध्ये खरेदी दिसून आली. बीएसई मिडकॅप सपाट पातळीवर बंद झाला. तर स्मॉलकॅप ०.३ टक्के घसरला.सेन्सेक्सवर आयसीआयसीआय बँकेचा शेअर्स ३ टक्के घसरून टॉप लूजर ठरला. त्याचबरोबर पॉवर ग्रिड, अल्ट्राटेक सिमेंट, बजाज फायनान्स, एचडीएफसी बँक, रिलायन्स हे हेवीवेट शेअर्स २ ते ३ टक्क्यांपर्यंत घसरले. बजाज फिनसर्व्ह, अदानी पोर्ट्स, एम अँड एम, एनटीपीसी, आयटीसी, ॲक्सिस बँक, सन फार्मा, भारती एअरटेल, इटर्नल हे शेअर्सही प्रत्येकी १ टक्के घसरले. तर दुसरीकडे टायटन, टाटा मोटर्स, एलटी, एसबीआय हे शेअर्स टॉप गेनर्स राहिले.गुरुवारी रात्री पाकिस्तानने केलेले अनेक ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले भारताने हाणून पाडले. यादरम्यान, जम्मूमध्ये अनेक स्फोट झाल्याची माहिती पुढे आली.

## थोडक्यात

### आरटीईच्या तृतीय फेरीच्या प्रवेशास मुदतवाढ

**नागपूर :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार दरवर्षीप्रमाणे २५ टक्के प्रवेशप्रक्रिया संपूर्ण राज्यात ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. त्यानुसार सन २०२५-२६ या वर्षाचे आरटीई प्रवेशांतर्गत प्रतिक्षाधीन यादीतील तृतीय फेरीच्या प्रवेशाचा कालावधी २८ एप्रिल ते ७ मेपर्यंत देण्यात आला होता. सुधारित वेळापत्रकानुसार हा कालावधी ८ मे ते १४ मेपर्यंत राहणार आहे. आरटीई प्रवेशांतर्गत प्रतिक्षाधीन यादीतील तृतीय फेरीच्या प्रवेशाच्या मुदतवाढीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी केले आहे. प्रतिक्षाधीन यादीतील तृतीय फेरीचे प्रवेशासाठी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता संकेतस्थळास भेट द्यावी, असेही आवाहन केले आहे.

### 'आयसीएआय'ने परीक्षा पुढे ढकलल्या

**नागपूर :** देशाच्या सीमाभागात सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउन्टट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) या संस्थेने आपल्या काही परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. आजपासून येत्या १४ मेपर्यंत नियोजित असलेल्या सीए फायनल, इंटरमिडिएट, पोस्ट क्वालिफिकेशन कोर्स आणि सेल्फ पेस्ड ऑनलाईन मोड्युल या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या असून, लवकरच नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, असे संस्थेने आपल्या अधिकृत पत्रकाद्वारे कळवले आहे.

### हत्तीनाला पुलाच्या बांधकामासाठी डाव्या बाजूने वाहतूक बंद

**नागपूर:** शहरातील प्रभाग क्रमांक १८ अंतर्गत असलेल्या गंगाबाई घाट भागातील हत्ती नाल्यावरील पुलाच्या बांधकामासाठी पुलाच्या डाव्या बाजूने वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी आदेश जारी केले आहे. सदर रस्त्यावरील वाहतूक आता उजव्या बाजूने वळविण्यात आली आहे. या रस्त्यावरून वाहतूक करणा०यांना अडचणीचे होऊ नये, यासाठी याठिकाणी वळणमार्गासाठी (डायव्हर्शन) सूचना फलक रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी लावण्यात यावे, संबंधित काम कालमर्यादेत पूर्ण करून रस्ता पूर्ववत सुरू करावा, असेही आदेशात म्हटले आहे. संबंधित आदेश १६ मार्च २०२६ पर्यंत अंमलात राहणार आहेत.

### विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**नागपूर :** सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या वतीने वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना राबविण्यात येतात. जास्तीत जास्त उमेदवारांनी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा समन्वयक प्रियंका कपाले यांनी केले आहे. उमेदवार राष्ट्रीयकृत, खाजगी व सहकारी बँकेतून व्यवसायिक कर्ज घेऊ शकतात. व्याज परतावा योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गाकरीताच आहे.

## 'एक्सपिरियन्स सेंटर' ची निर्मिती

### नागपूर केंद्रस्थानी कसे आले, याबाबतचा इतिहास अनुभवता येणार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १० :** नागपूर शहर देशाच्या केंद्रस्थानी कसे आले, याबाबतचा इतिहास आता अनुभवता येणार आहे 'झिरो माईल स्टोन' परिसरात 'एक्सपिरियन्स सेंटर' तयार होणार असून, यासंदर्भातील आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यासोबतच अखंड भारताचा केंद्रबिंदू असलेले 'झिरो माईल' हे पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरावे, अशा पद्धतीने सदर परिसराचा विकास करण्याची सूचनाही त्यांनी केली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर महानगरपालिका आणि महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाशी संबंधित कामांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक पार पडली. नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सर्व संबंधित विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, तसेच संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नागपूर शहर आणि अखंड भारताच्या केंद्रस्थानी असलेले 'झिरो माईल स्टोन' येथे सध्या पर्यटक येतात, तथापि तेथे त्यांनी थांबावे यासाठी परिसराचा विकास होणे आवश्यक आहे. यादृष्टीने नागपूर महानगरपालिकेच्या वतीने प्रस्ताव तयार करण्यात आला असून, या प्रस्तावास मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली. या परिसरातील जागा राज्य शासनाच्या अखत्यारित असून येथे अखंड भारत कसा होता ? तत्कालिन सर्वेक्षणानुसार नागपूर केंद्रस्थानी कसे आले, याबाबतचा इतिहास दर्शविणारे 'एक्सपिरियन्स सेंटर' तयार करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

एकूण ४५ कोटींच्या प्रस्तावित प्रकल्पात नैसर्गिक प्रकाशाचा वापर करून संग्रहालय, आवश्यक सोयी सुविधा आणि वाहनतळ तयार करण्यात येईल. तसेच, भविष्यात महानगरपालिकेमार्फत येथील देखभाल-दुरुस्ती केली जाईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

यासोबतच कॉटन मार्केट विकास, फुल मार्केट, मध्यवर्ती कारागृह स्थलांतरण यादृष्टीने संबंधित यंत्रणांनी प्रस्तावित कामे सुद्धा तत्काळ सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

## नवा 'हॉट मिक्स प्लान्ट' सज्ज

### नव्या तंत्रज्ञानामुळे होणार इंधनाची बचत

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १० :** नागपूर महानगरपालिकेने शहर खड्डेमुक्त व्हावे तसेच रस्त्यांच्या डांबरीकरणाची प्रक्रिया त्वरित करण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून 'हॉट मिक्स प्लान्ट'चे आधुनिकीकरण केले आहे. यामुळे शहर खड्डेमुक्त करण्याचे लक्ष्य लवकर साध्य होण्यास मदत होणार आहे.

महानगरपालिकाचा 'हॉट मिक्स प्लान्ट' ४० वर्षांपासून हिंगणा एमआयडीसी परिसरातील ६.७३ एकरांत पसरलेला आहे. शहरातील खराब झालेले रस्ते दुरुस्त करणे, डांबरीकरण करण्यासाठी तसेच पॅच वर्क करण्यासाठी त्याचा उपयोग केला जात आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशावरून 'प्लान्ट'चे आधुनिकीकरण करण्याचे काम पूर्णत्वास गेले आहे. यात काऊंटर फ्लो तंत्रज्ञानाचा वापर होणार असून, इंधनाची बचत होईल. याशिवाय क्षमता ६० ते ९० टन प्रतितास इतकी वाढली आहे. सोबत खर्चात सुद्धा कपात होणार आहे. मनपाच्या कारखाना विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका०यांनी संयुक्तपणे नव्या हॉटमिक्स प्लान्टचे निरीक्षण केले. अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता राजेश गुरमुले, कार्यकारी अभियंता अजय डहाके, उपअभियंता उज्वल लांजेवार, उपअभियंता योगेश लुंगे उपस्थित होते.




हॉटमिक्स प्लान्टचा कार्यभार पाहण्याकरीता कार्यकारी अभियंता यांचे अधिनस्त एकूण २२ अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. शहराअंतर्गत वाढते क्षेत्रफळ, कामाचा व्याप व रस्त्यांवरील खड्डे दुरुस्तीची तसेच रस्त्यांचे संपूर्ण डांबरीकरणाची झोननिहाय कामांची मागणी लक्षात घेता नवीन काउंटर 'फ्लो ड्रम मिक्स प्लान्ट'ची उभारणी केली आहे. शिवाय पाच नवीन टिप्पर आणि पावेर,रोलर आणि नविन प्लान्टची मशिनरीज सुद्धा खरेदी करण्यात आली आहे. यात लाईट डिझेल ऑईल इंधनाचा वापर होणार असल्याने प्रदूषण कमी होणार असून, वाहनांना धुण्यासाठी रॅम्प तयार केले आहे.

**परिसर हिरवेगार**

- गेल्या काही वर्षांत परिसरातील टाकाऊ ड्रमचा वापर करून पाच हजार रोपटे लावण्यात आले आहे. त्याचबरोबर नवीन शेड तयार केले गेले आहे. तसेच, जुन्या प्लान्टमधील साहित्याचा वापर करून आकर्षक प्रवेशद्वार सुद्धा तयार करण्यात आले आहे.

## बसस्थानकाची स्वच्छता निरीक्षण समितीतर्फे पाहणी



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**बुटीबोरी, दि. १० :** नागपूर शहरानजीकच्या बुटीबोरी बसस्थानक येथे महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर अभियानाअंतर्गत निरीक्षण समितीच्या वतीने बसस्थानक इमारत आणि परिसराची पाहणी करण्यात आली

बुटीबोरी हे नागपूर-कन्याकुमारी राष्ट्रीय महामार्ग आणि बोरी-तुळजापूर राज्यमार्गावर वसलेले नगरपालिकाचे शहर आहे याठिकाणी बसस्थानक उभारण्यात आले असून, १४ जून २०२३ रोजी त्याचे लोकार्पण पार पडले.

मागील शुक्रवारी अमरावती येथील कामगार अधिकारी श्री. गोळे, विभागीय वाहतूक अधिकारी श्री. ठाकरे यांच्या नेतृत्वातील समितीने बुटीबोरी बसस्थानकाची पाहणी केली तसेच, स्वच्छता आणि देखरेखीबाबत समाधान व्यक्त केले यावेळी मान्यवरांसोबतच स्वच्छता महिला कर्मचा०याचे स्वागत आणि अभिनंदन करण्यात आले. वर्धमाननगर आगारचे वाहतूक निरीक्षक उमेश कांबळे, वाहतूक नियंत्रक नितेश डेहनकर, प्रवासी मित्र सचिन आतिलकर, समाजकार्यकर्ते सतीश चावजी, पत्रकार संजय मुंदलकर उपस्थित होते.

## विधानभवनाची विस्तारीकरण प्रक्रिया प्रगतीपथावर, अंतिम स्वरुप लवकरच

### शासकीय जागांचे हस्तांतरण करणार : पालकमंत्री

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १० :** शासकीय मुद्रणालयाच्या आणि शहर पुरवठा कार्यालयाची काही जागा नागपूर विधानसभेच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असून, दोन्ही कार्यालयांनी पर्यायी जागा शोधून प्रस्ताव सादर करावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने त्याला अंतिम स्वरूप दिले जाणार आहे, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली

मुंबईत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात महत्त्वाची बैठक पार पडली. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, महसूल उपसचिव अश्विनी यमगर, एमएसआयडीसीचे मुख्य अभियंता रणजीत हांडे, उद्योग विभागाचे सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, एमएसआयडीसीच्या कार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम, एमएसआयडीसीचे व्यवस्थापक ब्रजेश दीक्षित आदी उपस्थित होते.

शासकीय मुद्रणालय आणि पुरवठा विभागाला नवीन जागा उपलब्ध करून देण्यात येईल. त्यांनी जागांचा शोध घेऊन त्याबाबत प्रस्ताव सादर करावेत. शासकीय जागा असल्या तरी या गोडाऊनमधून शहरातील लोकांना कमीत कमी वेळेत धान्य पुरवठा होईल अशा पद्धतीची जागा उपलब्ध करून देण्यात येईल. नवीन जागा पाहून त्या ठिकाणी बांधकाम करून दिल्यानंतरच संबंधित जागा ताब्यात घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत बैठक घेऊन त्यावर शिक्कामोर्तब करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

**'झिरो माईल्स'चाही विकास**

शासकीय मुद्रणालयाची काही जागा शिल्लक आहे. ही जागा विधानभवनासाठी आवश्यक आहे. तसेच, शहर पुरवठा विभागाच्या उर्वरित जागेमध्ये देखील बांधकाम करणे आवश्यक असल्याने या दोन्ही जागा शासनास देण्यात याव्यात, असे निश्चित करण्यात आले. या दोन्ही जागा ताब्यात घेतल्यानंतर विधानभवनाच्या विस्तारीकरणामध्ये कोणतीही अडचणी येणार नाही. याच परिसरात असलेला 'झिरो माईल्स'ही विकसित करण्यात येणार आहे.

## तेली समाजाचे प्रथमच शेगावात आज अधिवेशन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १० :** श्री संताजी नवयुवक मंडळ महाराष्ट्र यांच्या वतीने ११ मे रोजी पश्चिम विदर्भात संत गजानन नगरी शेगाव येथील अग्रसेन भवन रेल्वे स्टेशनजवळ शेगाव (बुलढाणा) पावनभूमीत संघटनेचे प्रथम अधिवेशन व समाजातील मान्यवर मंडळीचा सन्मान सोहळा आयोजित केला आहे.

हा सोहळा रविवारी सकाळी १० वाजता पार पडणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे करतील अध्यक्षस्थानी अखिल भारतीय तैलिक साहू महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष जयदत्त क्षीरसागर राहणार आहेत. केंद्रीय राज्यमंत्री तोखणजी साहू, छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री अरुण साव प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. विशेष असे की, नेपाळ देशातील आमदार भरत साव, माजी खासदार प्रमोद साव, महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचीही उपस्थिती असेल. महाराष्ट्रातून सर्व जिल्ह्यातील संघटन कार्यकारिणी, पदाधिकारी, सदस्यांसह हजारोंच्या संख्येने तेली समाजबांधव व माता भगिनी उपस्थित राहणार आहे समाजाच्या बळकटीसाठी समाजातील मान्यवरांच्या सत्कार समारंभाच्या निमित्ताने गुणगौरव सोहळ्यासाठी सर्वांनी एकत्रित यावे, असे आवाहन सुभाष घाटे यांनी केले आहे.

**CAPTION** धोका असाही...



नागपूर : नागपुरात सर्वांत लांब अर्थात ९ किमी अंतराचा फ्लायओव्हर तयार होत आहे पूर्व ते उत्तर नागपूर जोडणा०या या पुलामुळे मध्य भागातीलही वाहतूक समस्या सुटणार आहे अशोक चौकात गोलाकार वळण रस्त्याचे विभाजन होत आहे. यापैकी बसस्थानकाच्या दिशेने जाणा०या रस्त्यावर 'प्लास्टिक बॅरीकेड्स' अशा धोकादायक स्थितीत पडलेले दिसून आले.

## मतिमंद मुलीच्या सांभाळावरून भावाभावांत वाद

**नागपूर, दि. १० :** जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील धापेवाडा येथे क्षुल्लक कारणाहून मोठ्या भावाला पक्षी मारण्याच्या भ्रमार छऱ्याच्या बंदुकीने छातीत गोळी मारून कुटुंबीयांसमोरच ठार मारल्याची घटना घडली. इंद्रजितसिंग छगनसिंग भोंड (३८, धापेवाडा, कळमेश्वर) असे मृतकाचे नाव आहे. तर जगजीतसिंग उर्फ जग्गु छगनसिंग भौड (३५, धापेवाडा, कळमेश्वर ) असे दारुड्या लहान भावाचे नाव आहे. तथा प्रोत्साहन देणारी आई बिशनकौर भौड असे आरोपीचे नाव आहे. दोन्ही भावात क्षुल्लक करणाहून शाब्दिक चकमक झाली. आणि रागाच्या भरात दारुड्या भावाने गोळी मारली. त्यांच्यात नेहमी भांडणे व्हायचे.

## तब्बल १२ लाख वेल्डरची कमतरता ; आज विचारमंथन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १० :** तब्बल १२ लाख वेल्डरची कमतरता आढळून आली असून, उद्या रविवारी नागपुरात 'बीडब्ल्यूयू वेल्ड कनेक्ट' परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विस्तारत चाललेल्या औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक, बॉयलर निर्माते, तंत्रज्ञ आणि महाराष्ट्र शासनाचे बाष्पके संचालनालय यांनी संयुक्तपणे आयोजन केले आहे.

परिषदेचे उद्घाटन कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते होणार आहे. राज्यमंत्री आशीष जयस्वाल, बाष्पके संचालनालयाचे संचालक धवल प्रकाश अंतापूरकर, महानिर्मितीचे संचालक संजय मारूडकर यांची प्रमुख उपस्थिती राहील.

औद्यागिक क्षेत्रातील प्रगतीमुळे विविध उद्योगांसमवेत अधिक तंत्रकुशल कर्मचा०यांची कमतरता मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. सुमारे १२ लाख वेल्डरची कमतरता असल्याचे एका अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. या संधीवर राज्यातील युवकांना स्वार होता यावे, त्यांना या क्षेत्रातील प्रगतीचे नवे मार्ग मिळावे, विविध समस्या,आव्हानांवर चर्चा व्हावी याउद्देशाने ११ मे रोजी हॉटेल सेंटर पाइंट येथे एक दिवसीय 'बीडब्ल्यूयू वेल्ड कनेक्ट' परिषदेचे आयोजन केले आहे.

औद्योगिक क्षेत्राच्या नवनवीन विस्तारामध्ये बाष्पक (बॉयलर ) क्षेत्रही अधिक व्यापक होत आहे. बाष्पके क्षेत्रातील सुरक्षितता, तांत्रिक प्रगती, वेल्डिंग क्षेत्रातील तंत्रकुशलता, आवश्यक रोजगार व संधी बॉयलर बाबतचे प्रमाणिकरण, डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, ऊर्जा क्षेत्रातील आव्हाने आदी विषयांवर जागतिक पातळीवरचे तज्ज्ञ यांच्यात विचार मंथन होणार आहे. राज्यभरातील बाष्पक क्षेत्रातील वापरकर्ते व निर्मात्यांना परिषदेतील विचारमंथनांचा लाभ होईल, असे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले.

## 'दुसरे महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर' साठी रसिकांची गर्दी

### खाली बसून नाटकाचा घेतला आस्वाद, प्रेक्षकांनी दिली अभियानाला दाद

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १० :** युद्ध हे कोणत्याही समस्येचे अंतिम उत्तर नव्हे. अनेकांची कुटुंबे उद्ध्वस्त होतात तर माणुसकी धोक्यात येते. त्यामुळे या जगात युद्ध नव्हे तर बुद्ध हवा असा संदेश देणारे 'दुसरे महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर' हे नाटक साई सभागृहात सादर झाले. रसिकांची खचाखच गर्दी हे नाटकाला लाभलेले मोठे यश असल्याचे समीक्षण नाट्यविश्लेषकांनी नोंदविले आहे.

'दुसरे महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर'नाटक विख्यात नाटककार प्रभाकर दुपारे यांनी लिहिले असून, प्रमोद भुसारी यांनी दिग्दर्शित केले. तर,



'बानाई' संस्थेची निर्मिती होती. दुस०या महायुद्धात नाझी, हिटलरने निर्माण केलेला साम्राज्यवाद आणि भारताला निर्माण झालेला धोका ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रजांना महायुद्धात साथ दिली. या मध्यवर्ती संकल्पनेला धरून ॲड. विमलसूर्य चिमणकर यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा आधार घेत प्रभाकर दुपारे यांनी नाट्यलिखाण केले. वेगवान कथानक आणि प्रभावी संवाद असलेल्या या नाटकाला प्रमोद भुसारी यांनी कल्पक दिग्दर्शनातून साकार केले.

याच नाटकाला नागपूरकर प्रेक्षकांनी मनापासून आणि भरभरून दाद दिली. प्रेक्षकगृहात जागा न मिळाल्याने शेकडो प्रेक्षकांनी खाली बसून नाटकाचा आस्वाद घेतला.

**कलावंत असे :** प्रथमेश वलीवकर, अनिल पालकर, मुकुंद वसुले, अतुल भुसारी, विनोद तुंबडे, अशोक गवळी, मोहन पांडे, सारनाथ रामटेके, मीना देशपांडे, सीमा गोडबोले, राकेश खाडे, भास्कर मेशराम, बिस्मार्क भिवगडे, शीतल दोडके, अजय वेखंडे, अशोक वाचनेकर, उषा वाचनेकर, उमेश मरडवार, राजेश चवडे, रश्मी लांडे, समीर खंडाळे, अजय तायवाडे, चंद्रकांत साळुंखे, अनंत घुलक्षे, वैभव कट्यारमल, स्वराज बावनकर, आर्यन लांजेवार, अर्चना खरे, डॉ. रविंद्र भुसारी, अशलेश मेश्राम, चित्तरंजन कावरे, गुणधना बोरकर, प्रीती चव्हाण, साधना बोरकर, सुनिल मोहदीवाले.

तसेच, नेपथ्य प्रमोद भुसारींचे होते. वेशभूषा डॉ. सुचित्रा भुसारी, सहाय्यक दिग्दर्शन अशोक गवळी, प्रकाश शिवशंकर माळोदे, रंगभूषा बाबा खिरेकर यांचे होते. संगीत चारुदत्त जिचकार, स्पेशल ईफेक्ट जनाई एन्टरटेन यांचे होते.

सुरुवातीला रणजीत मेश्राम, विलास गजघाटे, 'बानाई'चे अध्यक्ष अरविंद गेडाम, सचिव जयवंत इंगळे व मान्यवरांनी दीप प्रज्वलन केले. सदर नाटकाचे महाराष्ट्रभर १०० प्रयोग करण्याचा मानस गेडाम यांनी यावेळी बोलून दाखविला.

## नागपूर पोलिसांनी सुरू केले 'युट्यूब चॅनल'

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १० :** पोलिस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंगल यांच्या संकल्पनेतून नागपूर शहर पोलिस दलाने नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी आणि पोलिस दलाच्या कार्यपद्धती अधिक पारदर्शकपणे मांडण्याच्या उद्देशाने 'युट्युब चॅनल' सुरू केले आहे.

चॅनलच्या माध्यमातून नागपूरकर नागरिकांना पोलिस दलाच्या कार्याची कर्तृत्वाची आणि जनहितकारी उपक्रमांची माहिती डिजिटल स्वरूपात सुलभपणे उपलब्ध होणार आहे. चॅनलद्वारे चांगली कामगिरी करणारे अधिकारी व अंमलदारांतर्फे कारवाई, त्यामागची प्रेरणा आणि त्यांची वैयक्तिक ओळख, पोलिस दलाच्या वतीने करण्यात येणारे जनहितकारी उपक्रम, समाज सेवाभावी संस्था, नागरिक आणि त्यांच्या योगदानाचे समाजाशी जोडणारे सादरीकरण, क्राईम स्टोरीज आणि तपासामागील कार्यप्रणाली, शिताफीने पार पाडलेली कारवाई, तपास यंत्रणा आणि समर्पण, बंदोबस्ताचे नियोजन व वाहतूक मार्गदर्शक सूचना, सण, मिरवणूक, आंदोलने अशावेळी करण्यात आलेली प्रभावी व्यवस्था व नागरिकांनी घ्यावयाची काळजी, प्रसारमाध्यमांनी घेतलेली दखल, वर्तमानपत्रातील बातम्यांच्या माध्यमातून यशाचे प्रतिनिधित्व, विविध सामाजिक विषयांवरील जनजागृती मोहिमा, सायबर सुरक्षेपासून ते महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेपर्यंत विविध विषयांवरील प्रबोधन आदींचे सादरीकरण करण्यात येणार आहे. याशिवाय थेट पोलीस आयुक्तांशी संवादाचा नवा मार्ग मिळणार असून, नागरिक आता पोलीस दलाशी केवळ प्रेक्षक म्हणून नाही तर एक भागीदार म्हणून जोडले जाणार आहे.




अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, रविवार, दि. ११ मे २०२५




# ‘एकला चलो रे’ ची भूमिका तारणार का?

## भाजपा भक्कम, काँग्रेस मजबूत, शिवसेना शिंदे व उद्धव गट ताकद आजमावणार

। रवी देशमुख ।

**अकोला, दि. १० : चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिला आहे. त्यामुळे राजकीय पक्ष निवडणुकीच्या अनुषंगाने कामाला लागले असून, इच्छुकांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत; परंतु आतापर्यंतची पक्षांची निवडणूक पूर्व तयारी पाहता ‘एकला चलो रे’ ची स्थिती दिसत आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुती व महाविकास आघाडी एकत्र लढतील, असे चित्र सद्यातरी दिसत नाही.**

जिल्ह्यातील महापालिका, जिल्हा परिषद, नगर परिषद, नगर पंचायत यांवर प्रशासक बसविण्यात आले आहेत. अकोला महापालिकेची निवडणूक तीन वर्षांपासून रखडली आहे. जिल्हा परिषद व नगर परिषदाही प्रशासनाच्या हाती आहेत. त्यामुळे एकूणच स्थिती पाहता स्थानिक स्वराज्य संस्था राजकीय पक्षांच्या हाती नसल्याने पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये मरगळ आली आहे. इच्छुकांचा हिरमोड होत आहे. लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडी एकत्र लढले असले, तरी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीने सर्वच पक्षांची ‘एकला चलो रे’ची भूमिका दिसत आहे. जिल्ह्यात भाजपाची स्थिती भक्कम आहे. एक खासदार, तीन आमदार अशी मोठी ताकद पाठीशी आहे. काँग्रेस व उद्धव गटाचा एक आमदार आहे; मात्र शिंदे गट, शरद पवार व अजित पवार गटाची स्थिती त्या तुलनेत कमकुवत आहे. तरी पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थेत आपली ताकद आजमावण्यासाठी ‘एकला चलो रे’ ची भूमिका घेत आहेत. राज्यात महायुतीचे सरकार असल्याचे बळ भाजप, शिंदे सेना, अजित पवार गट यांच्या पाठीशी असले तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर याचा परिणाम होणार काय? हा मुद्दा आहे. अकोला जिल्हा परिषदेवर वंचित बहुजन आघाडीचे वर्चस्व असून, अकोला महापालिकेवर भाजपा एक हाती सत्ता मिळविण्यात गत निवडणुकीत यशस्वी झाली आहे. अकोला पूर्वमध्ये भाजपा तर अकोला पश्चिममध्ये काँग्रेस निवडून आली आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीत याचा प्रभाव पडणार आहे. पूर्वी या दोन्ही मतदारसंघात भाजपा निवडून आली होती. त्यामुळे आपुसकच भाजपाला याचा फायदा मिळाला होता; पण यावेळी राजकीय समीकरण बदलले आहे. सर्वच पक्ष एकटे लढण्याच्या तयारीत असल्याचे चित्र सद्यस्थितीत दिसून येत आहे. निवडणुका जाहीर झाल्यावर काय स्थिती राहील, हे पुढे दिसून येईलच; पण आता पक्षांची स्थिती ‘हम किसीसे कम नही’, अशी आहे.

### भाजपाची ताकद कमी झाली

गत निवडणुकीत भाजपाने महापालिकेवर एक हाती सत्ता मिळवली होती. त्यावेळी अकोला पूर्व व पश्चिममध्ये दोन्ही आमदार भाजपाचे होते. आता मात्र एक मतदार संघ भाजपाच्या हातून गेला आहे; परंतु भाजपाचे स्थानिक पक्ष संघटन, आ. सावरकर यांचे राजकीय वजन आणि मोजक्या नेत्यांची अजूनही असलेली चलती पाहता या पक्षातील अंतर्गत धुसफूस बाहेर येत नाही. परिणामी, इच्छुक व माजी नगरसेवक एक दिलाने काम करताना दिसून येतात; मात्र दुसरीकडे या पक्षात अनेक इच्छुक असल्याने बंडाळी होण्याची शक्यता अधिक दिसून येत आहे.

### २०१७ मधील पक्षीय बलाबल

- भाजप - ४८
- शिवसेना - ८
- काँग्रेस - १३
- राष्ट्रवादी - ५
- इतर - ६

अजिंक्य भारत SUNDAY स्पेशल



### दोन्ही राष्ट्रवादीसाठी निवडणूक कठीण

राष्ट्रवादीमध्ये दोन गट पडले असून, शरद पवार गट व अजित पवार गट अशी फूट पडली आहे. महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शरद पवार यांच्या राष्ट्रवादीपेक्षा अजित पवार गट अधिक मजबूत दिसत आहे. दोन्ही राष्ट्रवादीचा एकही आमदार जिल्ह्यात नसल्याने दोन्ही पक्षांची बाजू कमकुवत आहे. अकोला शहरात विजय देशमुख यांच्या नेतृत्वात अजित पवार गट एक दिलाने काम करताना दिसत आहे; परंतु एकला चलोचे आव्हान अजित पवार गटा समोरही आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे महायुतीत असलेले वर्चस्व महापालिका निवडणुकीत किती कामी येईल, हे दिसून येईल.

### आघाडीसोबत जुळवून घेणार का?

उद्धव ठाकरे गटाचा एकमेव आमदार असल्याने पक्ष संघटन मजबूत आहे. उद्धव सेना व शिंदे सेना अशी फूट पडल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत याचा परिणाम दिसून येईल. महापालिका निवडणुकीचा विचार करता आ. देशमुख यांच्या नेतृत्वात पक्ष एकजूट दिसत आहे. पक्षात उभी फूट पडल्यावर त्यावेळी जे पक्षातून निघून गेले, त्यानंतर पक्षाला फार काही गळती लागली नाही. त्यामुळे उद्धव गट काँग्रेस आणि शरद पवार गटासोबत किती जुळवून घेतो, यावर बरंच काही अवलंबून राहील.

### काँग्रेसला बळ मिळणार

अकोला पश्चिममध्ये काँग्रेसचे साजीद खान पठाण निवडून आल्याने महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेसला आणखी बळ मिळाले आहे. आमदार असल्याचा फायदा हा की, पक्ष संघटन मजबूत अन् एकदिलाने काम करण्याची उर्मी कार्यकर्त्यांमध्ये दिसेल. महापालिकेत नगरसेवक म्हणून आपली राजकीय कारकीर्द सुरू करणारा नेता आता आमदार झाला आहे. याचे भक्कम पाठबळ काँग्रेसला मिळणार आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीसाठी या पक्षाला चांगले दिवस आल्याचे दिसून येत आहे.

### शिंदे सेनेत दोन गट

शिंदे सेनेत फार काही चांगली स्थिती नाही. माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया संपर्क नेते आहेत; परंतु या पक्षात दोन गट पडले आहेत. फारशी एकजूट दिसून येत नाही. या पक्षाचा एकही आमदार नसल्याने पक्षाची मोट बांधण्यात आतापर्यंत तरी अपयश आल्याचे दिसून येत आहे. पुढे पक्ष काय फेरबदल करणार, यावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे गणित अवलंबून आहे.

## चारा पाण्यासाठी जनावरांची भटकंती...



उन्हाळा म्हटले की सगळीकडे पाण्याची बोंबाबोंब असते व मोकाट जनावरांना चारासुद्धा मिळत नसते. जिल्ह्यातील पूर्णा नदीपात्रात जनावरे चारा व पाण्यासाठी भटकंती करताना दिसत आहेत... ( छाया. संजय ताथुरकर )

## पाणी टंचाईचे संकट : आठ लघु प्रकल्प पडले कोरडे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** जिल्ह्यातील २४ पैकी आठ लघु प्रकल्प कोरडे पडले आहेत. तर उर्वरित लघु प्रकल्पात अत्यल्प जलसाठा राहिला आहे; लघु प्रकल्प कोरडा पडल्याने ग्रामीण भागाला काही प्रमाणात पाणी टंचाईचा सामना करावा लागत असून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. अकोला पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत बार्शीटाकळी तालुक्यात ११, पातूर तालुक्यात चार, मूर्तिजापूर तालुक्यात दोन, अकोट तालुक्यात तीन तर बाळापूर तालुक्यात चार (दोन कोल्हापूरी बंधारे) असे एकुण २४ लघु प्रकल्प आहेत. या लघु प्रकल्पामुळे ९६.७२ दशलक्ष घनमिटर साठवण क्षमता निर्माण झाली आहे. या लघु प्रकल्पामुळे हजारो हेक्टर जमिन सिंचनाखाली आणली जाते. त्याच प्रमाणे लघु प्रकल्पाच्या संबंधित गावातील विहिरींना मुबलक पाणी उपलब्ध होते तर परिसरातील जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची सोय होते. मागील पावसाळ्यात जोरदार पाऊस झाल्याने लघु प्रकल्पात १०० टक्के जलसाठा उपलब्ध झाला होता. त्यामुळे रब्बी हंगामासाठी मुबलक पाणी देण्यात आले.



आता मात्र प्रकल्पातील पाण्याची पातळी आटत चालली आहे. बार्शीटाकळी तालुक्यातील पिंपळगाव चा., इसापूर, जनुना, झोडगा, मोहळ, हातोला. पातूर तालुक्यातील विश्वामित्री, बाळापूर तालुक्यातील कसुरा हे लघु प्रकल्प कोरडे पडले आहेत. तर बाळापूर तालुक्यातील कवठा बॅरेजमध्ये अद्याप पाणी साठवण्याची व्यवस्था नसल्याने हा बॅरेज सतत कोरडा असतो.

## रेल्वे स्टेशनवर दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मॉक ड्रिल

### पोलीस दलाची कार्यक्षमता ठसठशीतपणे अधोरेखित

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** ९ मे २०२५ रोजी अकोला येथील रेल्वे स्थानकावर दहशतवादी हल्ल्याच्या संभाव्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी दहशतवाद विरोधी शाखा, अकोला यांच्या वतीने एका भव्य मॉक ड्रिल (सराव अभ्यास) चे आयोजन करण्यात आले. सायंकाळी ५.०३ वाजता सुरू झालेला हा सराव ६.२१ वाजेपर्यंत प्रभावीपणे पार पडला.

या मॉक ड्रिलमध्ये, प्लॅटफॉर्म क्रमांक ६ वर अकोट ते अकोला येणाऱ्या रेल्वेगाडीत चार दहशतवाद्यांनी प्रवाशांना ओलीस धरल्याचा बनाव करण्यात आला होता. या काल्पनिक हल्ल्याला योग्य प्रतिसाद देताना, दहशतवाद विरोधी पथक, , , , स्थानिक पोलीस स्टेशनचे अधिकारी व रेल्वे पोलीस (/) यांनी आपल्या समन्वयातून तात्काळ कारवाई सुरू केली.



पथकाने झपाट्याने कृती करत एक दहशतवादी ठार केला, एकाला जखमी अवस्थेत ताब्यात घेतले तर दोन जणांना जिवंत पकडण्यात यश मिळवले. ओलीस ठेवलेले सर्व प्रवासी सुखरूप बाहेर काढण्यात आले. पथक व श्वान पथक रॅम्बो यांच्या सहाय्याने रेल्वे डब्यांची सखोल तपासणी करण्यात आली व दहशतवाद्यांकडील स्फोटक निष्प्रभावी करण्यात आले.

या मॉक ड्रिलमध्ये अकोला शहरातील १२ अधिकारी, ७६ पोलीस अंमलदार, तसेच रेल्वे पोलीस व रेल्वे सुरक्षा बलाचे ५ अधिकारी आणि २५ अंमलदार यांनी सहभाग घेतला.

या सराव अभ्यासात पोलीस अधीक्षक मा. श्री. बच्चन सिंह, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक मा. अनमोल मित्तल, व उप विभागीय पोलीस अधिकारी मा. श्री. सतीष कुलकर्णी यांनी स्वतः उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

याशिवाय सपोनि श्रीमती अर्चना गाढवे, प्रभारी अधिकारी रेल्वे पो.स्टे. अकोला आणि ग्रा. पो.उपनिरीक्षक श्री. विशाल पांडेय व त्यांच्या पथकाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

सदर सरावामागचा प्रमुख उद्देश म्हणजे दहशतवादी घटनांबाबत नागरीकांमध्ये जनजागृती निर्माण करणे, तसेच संशयास्पद हालचालींवर नागरिकांनी सतर्क राहून पोलिसांना सहकार्य करणे हा होता.या सरावामुळे पोलीस दलाची तत्परता, सुसूत्रता व दहशतवादाचा मुकाबला करण्याची तयारी सिद्ध झाली असून, भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी हे एक महत्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

## गळफास घेऊन १८ वर्षीय तरुणाची आत्महत्या

अकोला: मोठी उमरी येथील एका १८ वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मृताचे नाव अर्णव नागेश देबाजे (वय १८, रा. मोठी उमरी, अकोला) असे असून, सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात या प्रकरणी मर्ग क्र. ३२/२५ अन्वये भा.दं.सं. १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. फिर्याद डॉक्टर शेख फैजान यांच्यामार्फत वॉर्ड बॉय भारत पहुरकर व पोलीस कर्मचारी शुभम जाधव यांनी दिली. फिर्यादीनुसार, ९ मे २०२५ रोजी सायंकाळी ९ वाजून ४० मिनिटांच्या सुमारास अर्णवला गळफास घेतलेल्या अवस्थेत नातेवाइकांनी उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले; मात्र ड्युटीवरील डॉक्टरांनी तपासणीअंती रात्री ९:४५ वाजता त्याला मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी शवगृहात हलविण्यात आला असून, पोलीस कॉन्स्टेबल २९७ भानुसे यांना लास्ट हिफाजत कामासाठी रवाना करण्यात आले आहे. इनक्वेस्ट व पंचनामा कार्यवाहीची तजवीज करण्यात आली असून, पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) राजेश जाधव करीत आहेत. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. पोलिसांचा तपास सुरु आहे.

## पोलिसांची आकस्मिक नाकाबंदी मोहीम; ५०७ वाहनांवर कारवाई

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंग यांच्या आदेशान्वये ९ मे २०२५ रोजी सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत अकोला शहरासह जिल्ह्यातील विविध ठिकाणी आकस्मिक नाकाबंदी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचा उद्देश वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आणि शिस्तीचा संदेश देणे हा होता.



नाकाबंदी दरम्यान जिल्ह्यातील तालुका स्तरावरील पोलीस स्टेशन हद्दीत २ ठिकाणी व इतर पोलीस स्टेशन परिसरात १ ठिकाणी प्रभावी बॅरिकेडिंग करून पोलीस अधिकारी, अंमलदार व वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे कारवाई केली. अकोला शहर वाहतूक नियंत्रण शाखा तसेच सर्व पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी यात सक्रिय सहभाग घेतला.

या कारवाईत एकूण १ हजार ११६ वाहने तपासण्यात आली. यामध्ये ७७८ दुचाकी आणि ३३८ चारचाकी वाहनांचा समावेश होता. तपासणीदरम्यान ट्रिपल सिटिंग, विना नंबर प्लेट, सिग्नल जंपिंग, परवाना जवळ न ठेवणे, वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे, फॅन्सी नंबर प्लेट, विना सीट बेल्ट, काळ्या काचा अशा विविध नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकूण ५०७ वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ३ लक्ष २२ हजार ७५० रुपयांचा दंड आकारण्यात आला असून त्यापैकी १५ हजार १०० रुपयांचा दंड तत्काळ वसूल करण्यात आला आहे.

अकोला पोलीस दलाने वाहनधारकांना आवाहन केले आहे की, त्यांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, वाहन चालवताना आवश्यक कागदपत्रे सोबत बाळगावीत, तसेच आपल्या वाहनावर पेंडिंग दंड असल्यास तो लवकरात लवकर वाहतूक पोलीस अथवा शहर वाहतूक कार्यालयात जाऊन भरावा.अशा आकस्मिक नाकाबंदी मोहिमा भविष्यातही राबविल्या जाणार असून, नियम तोडणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अकोला पोलीस दलाने दिला आहे.



अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा



बुलढाणा, रविवार ११ मे २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### ३२ वर्षीय विधवा महिलेवर अत्याचार

**मेहकर :** मानसिक संतुलन बिघडलेल्या ३२ वर्षीय महिलेसोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आला. ही धक्कादायक घटना डोणगाव पोलिस स्टेशन हद्दीतील एका गावात घडली. या प्रकरणी महादेव गोविंदा मोरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार, तिची विवाहित मुलगी गेल्या काही वर्षांपासून मानसिक आजाराने ग्रस्त आहे. तिच्यावर उपचार सुरू आहेत. पतीच्या निधनानंतर ती माहेरी राहत होती. दरम्यान, ८ मे रोजी गावातील काही नागरिकांनी पीडितेच्या कुटुंबीयांना तिच्यावर अत्याचार झाल्याची माहिती दिली. यानंतर महिलेच्या आईने तिला विश्वासात घेऊन विचारणा केली असता, पीडितेने महादेव मोरे याने तिच्यावर अत्याचार केला असल्याचे सांगितले. पीडितेच्या जबाबानुसार, आरोपीने तिला जबरदस्तीने एका खोलीत नेऊन शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीच्या आधारे डोणगाव पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध बलात्काराचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### मलकापूर येथे महिलेच्या गळ्यातील पोथ हिसकावली

**मलकापूर :** वृंदावन नगरातील राधापीठ गिरणीजवळ काल रात्री ८.३० वाजताच्या सुमारास सौ. सोनल तुषार माहेश्वरी ही महिला त्याच्या मुलीला रोडवर खेळवित असतांना दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात आरोपींनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची ३५ हजार रुपये किंमती सोन्याची चैन हिसकावून दुचाकीवर धुम ठोकली. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

### सामाजिक कार्यासाठी जयश्री देशमुख पुरस्काराने सन्मानित



**खामगाव :** दर्पण पत्रकार व संपादक फाऊंडेशन, रेल यात्री एकता मजदूर संघ, मानवाधिकार माहितीच्या वतीने चंद्रपुरात महाराष्ट्र राज्य पुरस्कार वितरणाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. खामगाव येथील जय श्री देशमुख यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जयश्री देशमुख यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १८२५-२२७६ |
| गहु | २३००-२६०० |
| मका | १७८०-२००० |
| मोहरी | ५३००-५३०० |
| मलाई चना | ८२००-८४०० |
| तुर | ६३५०-७३७५ |
| हरभरा | ५४००-५८५० |
| भुईमुग | ४३००-५१५० |
| सोयाबीन | ३७५०-४३८० |

# सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी जिल्ह्यात तिरंगा रॅली

## मेहकर येथील तिरंगा रॅलीत केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव होणार सहभागी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा , दि.१०

**भारत मातेच्या रक्षणासाठी देशाच्या सीमेवर लढणाऱ्या सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी शिवसेना पक्षाच्यावतीने ११ मे रोजी तिरंगा रॅलीचे आयोजन संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात आले आहे. या रॅलीमध्ये नागरिकांसह शिवसैनिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेनेचे नेते तथा केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केल आहे .**




भारतातील जम्मू कश्मीर राज्यामध्ये पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांवर पहलगाम येथे २२ एप्रील रोजी पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्यामध्ये २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना धडा शिकविण्याच्या तिन्ही सैन्य दलाला सूट दिली. भारतीय सैन्य दलाने सिंदूर ऑपरेशन राबविले यामध्ये अनेक दहशतवादी ठार झाले. दहशतवाद्यांना सदैव पाठीशी घालणाऱ्या पाकिस्तानने भारतावर हल्ला सुरु केला आहे. या हल्लाला भारतीय सैनिक मोठ्या शुरतेने प्रत्युत्तर देत आहेत. देशाच्या सीमेवर डोळ्यात तेल घालून भारत मातेचे रक्षण करणाऱ्या या शूर सैनिकांचं मनोधैर्य वाढविण्याच्या दृष्टिकोनातून संपूर्ण राज्यांमध्ये शिवसेनेच्या वतीने ११ मे रोजी तिरंगा रॅली काढण्याची आदेश शिवसेनेचे मुख्यनेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यानुसार संपूर्ण राज्यामध्ये तिरंगा रॅलीचे आयोजित करण्यात आले आहे. या तिरंगा रॅलीमध्ये देशभक्तीपर गीते , तिरंगाचा सन्मान आणि सैनिकांना मानवंदना देण्यात येणार आहे या तिरंगा रॅलीमध्ये नागरिकांसह शिवसैनिकांनी सहभागी व्हावे आणि भारतीय सैनिकांचे मनोधैर्य वाढवावे असे आवाहन शिवसेनेचे नेते तथा केंद्रीय आयुष आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे.

**मेहकर येथील तिरंगा रॅलीत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव होणार सहभागी**

बुलढाणा जिल्ह्यातील गावा गावत शहर आणि तालुक्याच्या ठिकाणी शिवसेनेच्यावतीने तिरंगा मोटरसायकल रॅली काढण्यत देणार आहे. मेहकर येथे सकाळी नऊ वाजता शासकीय विश्रामगृह येथून मोटरसायकल तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीमध्ये केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव माजी आमदार संजय रायमुलकर यांच्यासह नागरीक शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक सहभागी होणार आहेत.

# आर्थिक व्यवहार ठप्प झाल्याने ठेवीदाराची आत्महत्या

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
दे.मही दि.१०

सरोज महिला अर्बनचे व्यवहार ठप्प झाल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या ठेवीदाराने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना ९ मे रोजी सकाळी पावणेआठच्या सुमारास घडली. विजय वसंत शिंगणे (४५) असे मृत ठेवीदाराचे नाव आहे. शिंगणे हे गेल्या वीस वर्षांपासून टेलरिंगचा व्यवसाय करत होते. या व्यवसायावरच कुटुंबीयांचे पालनपोषण करीत होते. मुलांचे शिक्षण आणि लग्नासाठी काही पैसा मागे टाकता येईल म्हणून शिंगणे यांनी घराशेजारीच असलेल्या सरोज महिला ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेमध्ये जवळपास साडेचार लाख रुपयांची गुंतवणूक केली होती. मात्र या पतसंस्थेमध्ये आर्थिक अनियमितता झाल्याचा ठपका ठेवण्यात आला. काही दिवसांपासून आर्थिक व्यवहार ठप्प झाले. ठेवीची रक्कम मिळण्यासाठी विजय शिंगणे यांनी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा केला. जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक, लोकप्रतिनिधी, संचालक मंडळाकडे विनवण्या केल्या. काहीच उपयोग होत नसल्याने अखेर हतबल झालेल्या विजय यांनी ९ मे रोजी शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. लहान मुलगा शेतात बघण्यासाठी आला असताना त्याला हृदय पिळवटून टाकणारे दृश्य दिसले. त्याने काकाला माहिती दिली. मृतकाचे भाऊ रामेश्वर शिंगणे यांनी पोलिसांत तक्रार दिली. शोकाकुल वातावरणात अंत्यासंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पती, मुलगा, भाऊ, असा परिवार आहे.

# धार्मिक सोहळे, कार्यक्रम देशातील ऐक्याचा संदेश देण्यासाठीच- महामंडलेश्वर महाराज

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मलकापूर दि.१०

देशावर सध्या परकीय आक्रमणांचे सावट आहे, ज्याचा जनजीवनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. अशा कठीण परिस्थितीत देशातील एकतेचा संदेश पोहोचवण्यासाठी धार्मिक सोहळे व कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, असे मत प. पू. महामंडलेश्वर जनार्दन हरी महाराज यांनी व्यक्त केले. जिजाऊ बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित श्रीराम कथा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व संकीर्तन हरिनाम सप्ताहाचे आयोजन व्ही. एस. रायपुरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात केले आहे त्याचाच एक भाग म्हणून दि. ८ मे रोजी संतसंमेलन व धर्म सोहळा पार पडला. यावेळी हभप जयंत महाराज गोसावी, चोपदार बाळासाहेब, रवींद्र महाराज हरणे, योगेश महाराज, विठ्ठल महाराज नामदास, श्रीहरी महाराज, प्रसाद महाराज देवकर, रमेश महाराज आडविहीरकर, पुंजाजी महाराज रायपुरे, विश्वंभर महाराज तिजारे, दत्त संप्रदायाचे स्वामी रूपानंदजी, हभप पांडुरंग महाराज, कृषी कीर्तनकार महादेवराव भुईभार (अकोला), महानुभाव पंथाचे मानेकर महाराज शास्त्री (सावदा) उपस्थित होते. जिजाऊ बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष संतोषराव रायपुरे व धोपेश्वर संस्थानचे विश्वस्त तेजराव रायपुरे यांच्या हस्ते संत पूजन व सत्कार करण्यात आला. संचालन हभप नितीन महाराज अहिर यांनी केले. संतसंमेलनाच्या दुपारच्या सत्रात जिजाऊ बहुउद्देशीय संस्था हरसोडा व मानस फाऊंडेशन बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने एकल महिलांचा सामूहिक विवाह सोहळा पार पडला. त्या निमित्ताने पाच जोडप्यांना संसारोपयोगी साहित्य प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांच्या नातेवाईकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सोहळयासाठी परिसरातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नेतृत्व करणाऱ्यांनी हजेरी लावली. त्यात माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, नरेश शेळके, ॲड. साहेबराव मोरे, माजी नगराध्यक्ष श्यामकुमार राठी, मानस फाऊंडेशन बुलडाण्याचे अध्यक्ष डी. एस. लहाने आदींचा सहभाग होता.

# राष्ट्रीय कुडो स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांची निवड

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.१०

येथील तालुका क्रीडा संकुल व अंबिका क्रीडा मंडळाच्या कुडो विद्यार्थ्यांची पुणे येथे नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल येथे १६ ते २१ मे पर्यंत होणाऱ्या राष्ट्रीय कूडो मार्शल आर्ट प्रशिक्षण शिबिरासाठी व ३ री राष्ट्रीय कुडो स्पर्धेकरिता खामगावच्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. त्यामध्ये अभय कुंदाराम, सुखराज चव्हाण, गौरव नागरे, स्त्रा चिंचोलकर, विरेन मोठे, मोहम्मद फरहान, सूर्या माळवांदे, ओम देवकते, शिवांश कॉकटवार, हर्ष खुटे, नेहा नटकुट, विराज पाटेखेडे, वैभवी वरुळकर, प्रज्वल शेळके, विश्वजीत शर्मा, साहील जोहो, ऋतुराज लबडे, आरव रावनकर, मोहम्मद शमी देशमुख, कुणाल सोनले, राहुल गीते, पंकज शेळके हे विद्यार्थी खामगाव येथून १५ मे ला रवाना होणार आहे. या प्रशिक्षण शिचिरामध्ये कुडो मार्शल आर्टचे धडे शिकवल्या जातील. कुडो या खेळाला भारत सरकार ची मान्यता असून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्पर्धेमध्ये विजेत्यांना स्पोर्ट कोट्यामध्ये नोकऱ्या सुद्धा लागत आहे.

# गोविंददेव गिरीजी महाराज यांची ना.ॲड.फुंडकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.१०

श्रीराम जन्मभूमी तिर्थक्षेत्र न्यास अयोध्याचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांचे आज खामगांव येथे आगमन झाले. या प्रसंगी त्यांनी खामगांव विधानसभा मतदार संघाचे आमदार ॲड आकाशदादा फुंडकर यांचे वसुंधरा, निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. जगभरातील तमाम हिंदुचे आराध्य प्रभू श्रीराम यांचे जन्मभूमी श्री राम लल्ला मंदीराचे स्वप्न ५०० वर्षानंतर पुर्ण झाले या जगभरातील प्रसिध्द अशा प्रभु श्रीराम जन्मभूमी तिर्थक्षेत्र न्यास अयोध्याचे कोषाध्यक्ष प.पू.स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांनी खामगांव आगमन प्रसंगी ना ॲड आकाश फुंडकर यांच्या वसुंधरा निवास स्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी आगमन प्रसंगी सागर फुंडकर यांनी पुष्पहार घालून व चरणस्पर्श करुन आशिर्वाद घेतले. यानंतर प.पू.स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांनी लोकनेते स्व.भाऊसाहेब फुंडकर यांचे प्रतिमेस माल्यार्पण करुन प्रभु श्रीराम नामाची शाल देखील अर्पण केली.



वसुंधरा निवासस्थानी ना आकाश फुंडकरांनी प.पू. स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांना पुष्पहार घालून व चरण स्पर्श करुन आशिर्वाद घेतले. धार्मिक विषयावर ना.ॲड आकाशदादा फुंडकर यांच्याशी चर्चा केली. राम जन्मभूमी न्यासाबददल चर्चा करण्यात आली व सदैव धार्मिक कार्यात अग्रेसर राहण्याबाबत संदेश प.पू.स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांनी यावेळी दिल्या.

# प्रधानमंत्री पीकविमा पूर्वी प्रमाणे सुरु ठेवण्यात यावा: शेतकऱ्यांची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
जळगाव जा. दि.१०

राज्य सरकारने यंदाच्या खरिप हंगामापासून एक रुपयात दिली जाणारी पीक विमा योजना बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत शेतकऱ्यांना फक्त एक रुपया भरून पीक विम्याचा लाभ घेता येत होता. परंतु आता या निर्णयामुळे शेतकऱ्यांना स्वताचा वाटा पूर्णपणे भरावा लागणार आहे. जे शेतकरी स्वताचा हिस्सा भरणार नाहीत, त्यांना विम्याचा लाभ मिळणार नाही. विशेषता लहान आणि सीमित शेतकऱ्यांसाठी हा निर्णय आर्थिक बोजा वाढवणारा ठरू शकतो. त्यामुळे ही योजना पूर्वी प्रमाणेच राबवावी. अशी मागणी शेतकऱ्यानी एका निवेदनाद्वारे राज्यपाल यांच्याकडे उपविभगिय अधिकारी यांच्या मार्फत केली आहे.

विशेषता आर्थिकदष्ट्या दुर्बल असलेल्या शेतकऱ्यांना विमा हप्त्याचा भार उचलणे कठीण जाणार आहे. त्यामुळे हंगामात नैसर्गिक आपत्ती आल्यास अनेक शेतकरी संकटात सापडू शकतात. सरकारच्या या निर्णयावर शेतकरी नाराजी व्यक्त करीत आहेत. त्यामुळे विम्याच्या हप्त्याचा बोजा अगोदरच संकटात असलेल्या शेतकऱ्यांवर पडणार आहे. हा निर्णय विशेष करून गरीब आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी समस्या निर्माण करणारा ठरू शकतो. पीक विमा योजनेचे महत्व शेतकऱ्यासाठी अनन्यसाधारण आहे. वातावरणातील बदलांमुळे अनिश्चित झालेल्या शेती व्यवसायात विमा हे एक महत्वाचे साधन आहे. शासनाने जरी आर्थिक कारणांमुळे हा निर्णय घेतला असला, तरी शेतकऱ्यांच्या हितासाठी योग्य पर्याय शोधणे गरजेचे आहे. असेही निवेदनात नमूद केले आहे. निवेदन देतांना शेतकरी प्रकाश भिसे, तुकाराम पदमने पाटील, कार्तिक राऊत, गुलाबराव आठवले, प्रशांत पारवे, ज्ञानेश्वर शेळकर यांच्यासह असंख्य शेतकरी उपस्थित होते.

# शंभर दिवस कृती आराखड्यात चिखली तहसील जिल्ह्यात टॉप वन

## विभागीय आयुक्तांसमोर सादरीकरण; तहसीलदारांच्या प्रभावी अंमलबजावणीची दखल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
चिखली दि.१०

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार शासनाने सुरू केलेल्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्यात चिखली तहसील कार्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत बुलढाणा जिल्ह्यात अव्वल स्थान पटकाविले आहे. तहसीलदार संतोष काकडे यांच्या नेतृत्वाखाली आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. याची जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी दखल घेतली. उल्लेखनीय, उत्कृष्ट कामाचे सादरीकरण विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्यासमोर तहसीलदार संतोष काकडे यांनी ८ मे रोजी अमरावती येथे केले. या कृती आराखड्यांतर्गत चिखली तहसील कार्यालयाने नागरिकांच्या सोयीसाठी आणि प्रशासकीय कार्यक्षमतेसाठी अनेक महत्वपूर्ण उपक्रम यशस्वीपणे राबविले. यामध्ये कार्यालयाचे अद्ययावत संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. ज्यामुळे नागरिकांना घरबसल्या अनेक प्रकारची माहिती उपलब्ध झाली आहे. तसेच, नागरिकांचे जीवनमान सुकर व्हावे यासाठी तालुक्यातील अतिक्रमित पादंण रस्ते खुले करण्यात आले आहेत. ज्यामुळे वाहतूक आणि दळणवळण अधिक सुलभ झाले आहे. सामंजस्य आणि सलोखा वाढवण्यासाठी सलोखा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांसाठी ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी नोंदणी शिबिरे आयोजित करून त्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली. समाजातील दुर्बळ घटक जसे की वृद्ध, अपंग आणि निराधार यांना विशेष सहाय्य पुरवण्यात आले आणि शिधापत्रिकांसंबंधीच्या तक्रारींचे निवारण गावपातळीवरच करण्यात आले. आपले सरकार आणि पीजी पोर्टलवरील सर्व प्रलंबित तक्रारी निकाली काढण्यात आल्यामुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. कार्यालयीन सोयी, सुविधांमध्ये वाढ करताना कर्मचारी आणि अभ्यागतांसाठी स्वच्छ प्रसाधनगृहे, सुसज्ज प्रतीक्षालाय आणि सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आली आहेत. यामुळे प्रयेकाला चांगली सुविधा मिळत आहे.

क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन कामकाजाची पाहणी करण्यात आली, ज्यात बोरगाव वसू, उत्रादा, मंगरूळ नवघरे आणि भानखेड येथील ग्रामपंचायती व बचत गटांचा समावेश आहे. यासाठी २८ अधिकारी, कर्मचारी, ६३ तलाठी, ११ मंडळ अधिकारी आणि ६४ कोतवाल यांच्या सेवापुस्तकांचे स्कॅनिंग करून सॉफ्ट कॉपी तयार करण्यात आली आहे. तसेच, ज्या कर्मचाऱ्यांनी नामनिर्देशन पत्रभरले नव्हते, त्यांच्याकडून ते अद्ययावत भरून घेण्यात आले आहेत. परिसरातील गुंतवणूकदार व उद्योजकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी तहसील कार्यालयात विशेष बैठक आयोजित करण्यात आली. करणे यांसारख्या महत्वाच्या विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.

चिखली तहसील कार्यालयाच्या या सर्वसमावेशक आणि प्रभावी कामगिरीमुळे बुलढाणा जिल्ह्यात अव्वल स्थान प्राप्त झाले आहे. तहसीलदार संतोष काकडे यांच्या कुशल नेतृत्वाखालील टीमने केलेल्या या उत्कृष्ट कार्याचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# साखरखेर्डा तालुक्याच्या निर्मितीचा प्रश्न धसास लावणार - बच्चू कडू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
साखरखेर्डा दि.१०



राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेबांचे जन्मस्थान असलेल्या मातृतिर्थ सिंदखेडराजा या तालुक्यातील साखरखेर्डा हे शहर तालुक्यापासून जवळपास पन्नास किलोमीटर दूर आहे. साखरखेर्डा पंचक्रोशीतील जनतेची गेल्या कित्येक वर्षांपासूनची साखरखेर्डा तालुक्याची मागणी सरकार दरबारी प्रलंबीत आहे. या परिसरातील जनतेला तालुक्याला जाऊन एखादे काम करायचे असल्यास अंतराच्या कारणामुळे संपूर्ण दिवस गमवावा लागतो.

सिंदखेडराजा येथील तहसील कार्यालय , पंचायत समिती, भूमी अभिलेख कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी ,तालुका कृषी अधिकारी कार्यालय , इत्यादी सर्व कार्यालये साखरखेर्डा पासून ५० ते ६० कि.मी. अंतरावर आहेत. त्यामुळे साखरखेर्डा परिसरातील सर्वसामान्य जनता शासनाच्या विविध योजनांपासून अनेक वेळा वंचित राहते. साखरखेर्डा परिसरातील सर्वसामान्य माणूस सहजासहजी तालुक्याला जाऊ शकत नाही. साखरखेर्डा परिसरातील सर्व सामान्य माणसाला सिंदखेडराजाला जाण्यासाठी खूप कष्ट सोसावे लागतात. एका फेरीमध्ये कोणतेच काम होत नाही. ये-जा करण्यासाठी पुरेशा वाहनांची सोय उपलब्ध नसते. त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये असलेले दलाल साखरखेर्डा परिसरातील लोकांना आपल्या जाळ्यात ओढून त्यांची लूटमार करतात. तालुक्याच्या ठिकाणी जायचे असल्यास साखरखेर्डा भागातील लोकांना भरपूर अडथळे पार पाडावे लागतात. सकाळी सिंदखेडराजा ला गेलेला माणूस रात्री उशिरा घरी पोहोचतो. गेल्या कित्येक वर्षांपासून या भागातील लोक तालुक्याअभावी अनेक प्रकारच्या यातना सहन करीत आहेत. आई जेवू घालेना आणि बाप भीक मागू देईना अशी अवस्था तालुक्याअभावी या भागातील जनतेची झालेली आहे, ही मागणी आपण लवकरच पुर्णत्वास नेऊ असे आश्वासन माजी मंत्री बच्चू कडू यांनी दिले.

## थोडक्यात

### पीएसआय सुषमा पाटील दुचाकी स्लिप झाल्याने गंभीर जखमी

**बुलडाणा :** शहर पोलिस स्टेशन मध्ये कार्यस्त पीएसआय सुषमा पाटील ह्या आज १० मे २५ रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास बुलडाणा येथून खामगावकडे दुचाकीने येत होत्याा. दरम्यान दिवठाणा फाट्याजवळ त्याांची दुचाकी स्लिप झाल्याने त्याा गंभीर जखमी झाल्या होत्याा. यावेळी घटनास्थळावर उपस्थित राम कवळे व ओम जवंजाळ यांनी रोहणा प्राथमिक आरोग्य केंद्राची रुग्णवाहिका बोलायली. यावेळी रुग्णवाहिकेतील डॉ. सज्जाद यांनी प्रथमोचार करून सुषमा पाटील यांना सामान्य रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच शहर पोस्टेचे ठाणेदार रामकृष्ण पवार व सहकारी यांनी रुग्णालयात जावून सुषमा पाटील यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

### पोलिसांसोबत गैरवर्तणूक करणाऱ्या तिघांविरूध्द गुन्हा

खामगाव : स्थानिक बसस्थानकासमोरील रस्त्यावर देविदास नारायण काळणे (वय ५६ वर्ष, रा.जोशी नगर), रामेश्वर प्रल्हाद सरोदे (वर्ष ५७वर्ष, रा. चिंतामणी मंदिराजवळ) व गोपाल शिंगाडे (वय ३५ वर्ष, रा. चांदमारी) हे तिघे काल ९ मे २५ रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास मद्यपान करून आपसात हाणामारी करीत होते. यावेळी पोलिसांनी त्यांना आवरण्याचा प्रयत के ला असता पोलिसांसोबत असभ्य भाषेत बोलले व मारहाण केली. यानंतर तिघांना शहर पोस्टेला आणण्यात आले होते. यावेळी रामेश्वर प्रल्हाद सरोदे याने ठाणेदार पवार यांना शिवीगाळ करून मोबाईलसह हात गालावर मारला तसेच अश्लिल शिवीगाळ करून धमकी दिली. या प्रकरणी पोकों अंकुश गुरूदेव यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फियांदीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त तिघांविरुध्द कलम १३२, १२१ (१), १९४ (२), ३५२, ३५१ (२), २९६, ३ च (५) मान्यासं २०२३. सहकलम ७ किमीनल लॉ न अमेंडमेंट ॲक्ट १९३२, सहकलम ८५ (१) मदाका नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास एपीआय मुळीक करीत आहेत.

### महाराणा प्रतापसिंह यांची ४८५ वी जयंती साजरी




**मंगळूर नवघरे :** ही भूमी शूरवीरांची स्वाभिमान इथला माना मातृभूमीच्या रक्षणास्तव इथे झुंजले महाराणा वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची ४८५ व्या जयंती निमित्त चिखली तालुका होमगार्ड समादेशक कार्यालय येथे प्रतिमेचे पूजन करण्यात आले याप्रसंगी तालुका होमगार्ड समादेशक श्री शिवाजी राजपूत फलटण नाईक विजय खेडेकर समाधान भांदर्गे .अंशकालीन लिपिक आत्माराम वखरे, अनयुक्त अधिकारी संदीप राऊत समाधान सोनारे तसेच जीटी साळवे पिराजी पडघान , राजेंद्र नरवाडे. रतन बोर्डे तसेच माळी सेना संस्थापक अध्यक्ष कैलास भाऊ सपकाळ यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले याप्रसंगी वरील कर्मचारी वृंद हजर होते.

# किडनी प्रत्यारोपण आरोग्य शिबीराचे आयोजन

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव करणार उद्घाटन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१०





केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या भुमिपुत्र वैद्यकीय कक्षेच्यावतीने मोफत किडनी प्रत्यारोपन (किडनी ट्रान्सप्लाट) आरोग्य शिवीराच आयोजन ११ मे रोजी मेहकर येथे करण्यात आले आहे

बुलढाणा जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा केंद्रीय आयुष , आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी लोकांच्या आरोग्य सुविधेसाठी बुलढाणा येथील जनसंपर्क कार्यालयात भूमिपुत्र वैद्यकीय आरोग्य कक्ष स्थापन करण्यात आहे. या कक्षाच्या मार्फत रुग्णांना वैद्यकीय मदत केल्या जात आहे. आतापर्यंत भूमिपुत्र वैद्यकीय कक्षेच्यावतीने मोफत वैद्यकीय शिबिर , नेत्र तपासणी आणि मोफत चष्मे वाटप शिबीरांच आयोजन करण्यात आले. गरजूंना वैद्यकीय सेवा आणि मार्गदर्शन देण्याचं काम केल्या जात आहे. शिवाय ग्रामीण भागातील नागरिकांना महानगरात एम्स रुग्णलयातही आरोग्य विषयक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात येत आहे. येणाऱ्या काळामध्ये भूमिपुत्र वैद्यकीय कक्षेच्यावतीने मोफत किडनी प्रत्यारोपन (किडनी ट्रान्सप्लाट ) शस्त्रक्रिया करण्यासंदर्भात नियोजन करण्यात आले आहे. या रुग्णाची नाव नोदणी करण्यात आली असून मुत्रपिंड प्रत्यारोपन (किडनी ट्रान्सप्लाट ) संदर्भात आरोग्य शिबिर ११ मे रोजी मेहकर येथील राजश्री आयुर्वेदिक महाविद्यालय येथे आयोजीत करण्यात आले आहे.या शिबिराचा उद्घाटन केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील, जिल्हाचिकित्सक डॉ भागवत भुसारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमोल गीते , माजी आमदार डॉ संजय रायमुलकर, युवासेना प्रदेश सहसचिव तथा जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव उपस्थित राहणार आहे. तर छत्रपती संभाजी नगर येथील किडनी ट्रान्सप्लाट संदर्भातील तज्ञ डॉक्टर्स समीर महाजन , कमल नयन बजाज येथील निखिल इंगळे, जॉर्ज फर्नांडिस, डॉ अजय रोपे उपस्थित राहून रुग्णांची आरोग्य तपासणी करणार आहे. त्यानंतर त्याांची मोफत मुत्रपिंड प्रत्यारोपन (किडनी ट्रान्सप्लाट) शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. गरजूंनी या मोफत मुत्रपिंड प्रत्याारोपन (किडनी ट्रान्सप्लाट) शरत्रक्रिया आरोग्य शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन भूमिपुत्र वैद्यकीय कक्षेच्यावतीने करण्यात आले आहे.

# सूत्रसंचालन करणाऱ्यांविषयी लग्नामध्ये होतोय संताप व्यक्त

अजिंक्य भारत / प्रतिनिधी
डोणगाव दि.१०

सध्या लग्नाचा मौसम सुरू आहे अशातच लग्नांना होणारा उशीर व सुत्रसंचालन करणारांचा झालेला उपद्व्याप व वेळ खाऊ पणा यामुळे लग्नांमध्ये सुत्रसंचालन करणारांविषयी भर लग्नात मागून संताप व्यक्त होताना दिसत आहे.

लग्न समारंभ म्हटला की वऱ्हाडी मंडळी व आप्तेष्ट हे दिवसभर वेळ काढुन लग्न समारंभात हजर असतात व लग्नाच्या वेळी सुत्रसंचालन करणारे आपल्या मर्जीतील लोकांची नावे घेऊन व मुळ वऱ्हाडी यांना दुर ठेऊन माईक हातात आला की लग्नाची वेळ पाळीत नाही,त्यामुळे सुत्रसंचालन करणारांविषयी भर लग्नात मागून संताप व्यक्त होत आहे. याची प्रचिती काल दि. ९ मे२०२५ रोजी एका विवाह सोहळ्यात आली. विवाह सोहळ्यास आधीच दोन तास उशीर झाला असताना सुत्रसंचालन करणारांनी माईक वर ताबा मिळविला व नंतर त्याांना मिस कॉल करुन जो नाव सांगेल त्यांची व त्यांच्या मर्जीतील लोकांची नावे घेणे सुरू झाले यावरच सुत्रसंचालन करणारांनी वेळेचे भान न पाळता शेरोशायरी व चित्रपट गीता गाऊन वेळ केला हे पाहून लग्नात मागे बसलेल्या वऱ्हाडी मंडळी यांनी आता तरी बस करुन लग्न लावा म्हणून जोरजोराने सुत्रसंचालन करणारांचा समाचार घेतला.

त्यामुळे लग्नात एकच हशा पिकला व संताप ही व्यक्त झाला त्यामुळे आता तरी सुत्रसंचालन करणारांनी जनतेचा आवाज व मुड ओळखून आपले माईक प्रेम कमी करुन वेळेत लग्न लावावे अशी चर्चा ऐकायला मिळत होती. व मर्जीतील लोकांची नावे टाळून शब्द सुमनांनी सर्व वऱ्हाडी मंडळींचा सत्कार करावा.

# कल्याणकर कुटुंब लग्नप्रसंगी कन्यादान म्हणून वधूपित्यास करणार मदत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१०



लग्न म्हटले की मोठा खर्च येतो. वधू पिता लग्नात कर्ज बाजरी देखील होतात.अशा वेळी गरज असते ती सामाजिक मदतीची.ही बाब हेरून कल्याणकर कुटुंबाने व्धुपित्याास मदत करण्याचा संकल्प केला आहे.

तालुक्यातील लहान व मोठ्या दोन्ही टुनकी गावातील प्रत्येक लग्नप्रसंगी मुलीला लग्नभेट म्हणून २१०० रुपये देण्याचा संकल्प विठ्ठल रामदास कल्याणकर, व शारदाताई विठ्ठल कल्याणकर यांनी केला आहे. तालुक्यातील टुनकी बु. व खुर्द अशा दोन गावातील मुलीच्या विवाहात कोणाचेही घरी लग्न असल्यास कन्यादान संकल्पनेतुन २१०० रुपये देण्याचे कल्याणकर जोडप्याने ठरवले आहे. महाराष्ट्र दिनी कन्यादान रुपी रककम देऊन सुरुवात देखील करण्यात आली.

सामाजिक जिवनात आपण उपयोगी पडावे व आर्थिक मदत व्हावी हा या मागील त्यांचा उद्देश आहे. मुलीचे लग्न म्हटले की खर्च आलेच या वधुपित्याच्या खर्चात खारीचा वाटा म्हणुन कन्यादान भेट संकल्प करत सामाजिक बांधिलकी जोपसण्याचे कामच या माध्यमातुन कल्याणकर परिवाराचे हाताने होत आहे. टुनकी बु. व खुर्द या दोन्ही गावात कोणाचेही घरी मुलीचे लग्न असल्यास त्याची माहिती देण्याचे सुद्धा आवाहन कल्याणकर कुटुंबाने केले आहे तसेच कन्यादान म्हणून टुनकी बु खुर्द या दोन गावातील मुलींच्या लग्नाला २१००रुपये देणार आहे. आतापर्यंत चार मुलींच्या लग्नाला मदत केली आहे. जोपर्यंत होईल तोपर्यंत आर्थिक मदत करणार आहे असल्याचे विठ्ठल रामदास कल्याणकर यांनी म्हटले आहे.

# अवैध दारू विक्री विरोधात शहापूरवासियांचा ठिय्या

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.१०

तालुक्यातील शहापूर येथे अवैध दारू विक्रीचे प्रमाण वाढले असून ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात वारंवार प्रशासनाकडे तक्रार करूनही गावातील दारू विक्री बंद झाली नाही. यामुळे, संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात धडक देवून बुधवारी ठिय्या आंदोलन केले. महिला, पुरुष, अबाल- वृद्ध मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

शहापूर येथे देशी, विदेशी व गावठी दारूची खुलेआम विक्री करण्यात येत आहे. त्याामुळे गावात रोज वादविवाद, भांडणे व अशांतता निर्माण झाली आहे. महिलांना घराबाहेर पडताना भीती वाटते. तर तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे ओढली जात आहे. दारूमुळे गावामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अतिशय गंभीर बनत चालला आहे. शाळकरी मुला-मुलींपासून ते वृद्धांपर्यंत सर्वच नागरिकांना दारू विक्रीचा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा स्थानिक नागरिकांनी तक्रार करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही, असा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. दारू विक्रेत्याांचे समर्थन करणाऱ्या काही लोकांमुळे गावातील शांतता भंग होते आहे, असेही ग्रामस्थांनी स्पष्ट केले. यावेळी महिलांनी गावात दारू नको, अशा घोषणा देत संताप व्यक्त केला. पोलिस प्रशासनाने तत्काळ कारवाई करून दारू विक्री बंद करावी, अन्यथा यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात धडक देत ग्रामस्थांनी ठिय्या आंदोलन केले. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन प्रभारी ठाणेदार विजयकुमार चव्हाण तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाला देण्यात आले. निवेदनावर शीलवंत गवई, विवेक तिडके, प्रमोद शिरसाठ, वच्छला शिरसाट, शोभा सुरवाडे, प्रवीण तिडके, रामू अंभोरे, कमलकिशोर तिडके, सुमेध इंगळे, लक्ष्मीबाई तिडके, श्यामसुंदर तिडके, सुरज तिडके, प्रतिभा तिडके, रिना शिरसाट, बेबी तिडके, नितेश तिडके, सचिन तिडके, आनंद तिडके, ज्योती तिडके, सिंधुबाई नितनवरे, संगीता नितनवरे यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्हा स्पोर्ट कराटे असोसिएशनद्वारा नि:शुल्क कराटे प्रशिक्षण शिबिर आयोजित

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
चिखली दि.१०

तालुका क्रीडा संकुल समिती यांच्या सहकाऱ्याने बुलढाणा जिल्हा स्पोर्ट कराटे असोसिएशन द्वारा नि:शुल्क कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दिनांक १० मे ते २० मे तालुका क्रीडा संकुल चिखली येथे सकाळी ६.३० ते ८ वाजेच्या वेळेस करण्यात आले असून, या प्रशिक्षणामध्ये सेल्फ डिफेन्स फॉर लेडिस, कराटे, लाठी- काठी आणि स्केटिंग या क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण नि:शुल्क देण्यात येणार आहे.

सदर प्रशिक्षण हे चिखली तालुका क्रीडा संकुल आणि अशोक वाटिका जयस्तंभ चौक चिखली येथे होणार आहे. तसेच या प्रशिक्षण शिबिरात मुली व महिलांसाठी स्वतंत्रा बॅच आणि महिला प्रशिक्षकांची व्यवस्था करण्यात आली आहे.

सदर प्रशिक्षण मुख्य प्रशिक्षक सेन्साई फाईम सौदागर यांच्या नेतृत्वाखाली होत असून रोहित सोनारे, शुभम जाधव यांच्यासह सह प्रशिक्षक म्हणून महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी नॅशनल गोल्ड मेडलिस्ट म हेरफात नुरी तसेच अनुराधा बकाल, समृद्धी गवारे हे प्रशिक्षण शिबिरात आपले प्रशिक्षकाचे म हत्वपूर्ण कार्य करणार आहे.

# वादळी वारा आणि पावसालाही हरविले वधूपित्याचा निश्चय; मापारी कुटुंबाचा विवाह सोहळा थाटात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
लोणार दि.१०



संकटे आली, आव्हाने आली, पण संतोष शेषराव मापारी यांच्या दृढ निश्चयासमोर निसर्गही हरला! त्यांच्या कन्या डॉ. दीपाली आणि मेहकर येथील संजय गायकवाड यांचे सुपुत्र अंशुमन यांचा विवाह सोहळा बुधवारी, ७ मे रोजी सायंकाळी ९.३० वाजता मोठ्या थाटात पार पडला.

मापारी कुटुंबाने आपल्या एकुलत्या एक मुलीच्या लग्नासाठी गेल्या आठ दिवसांपासून भव्य नियोजन केले होते. सुमारे तीन एकर जागेत भव्य मांडव, देखावे, रोषणाई आणि पाहुण्यांच्या सोयीसाठी उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. परंतु, गेल्या तीन-चार दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे आणि वादळी वाऱ्यामुळे मांडव तीन वेळा कोसळला. तरीही संतोष मापारी यांनी संयम सोडला नाही. दुपारी ४ वाजता पुन्हा एकदा चौथ्यांदा वादळ वाऱ्याने जेवणासाठी टाकलेला मांडव पुर्णपणे कोसळला आणि उपस्थित वऱ्हाडी, पाहुणे, मान्यवर यांच्यात गोंधळाची आणि पळापळीची स्थिती झाली. पण मुलीच्या लग्नाची हौस पूर्ण करण्याचा निर्धार मापारी यांनी सोडला नाही. कमी वेळेत पुन्हा मांडव उभारला गेला आणि सगळ्या पाहुण्यांना आश्चर्यचकित करत विवाहसोहळा थाटात पार पडला.

यावेळी खेडेकर, विठ्ठल रुख्मिनी संस्थान पंढरपूर चे विश्वस्त तथा वारकरी महामंडळाचे अध्यक्ष हभप प्रकाशबुवा जवंजाळ,जालना जिल्हाप्रमुख आसाराम पाटील बोराडे, अंकुशराव पडघान सतिषजी गुप्त, आमदार अमित झनक, आमदार मनोज कायंदे, आमदार सिद्धार्थ खरात, माजी आमदार संजय रायमूलकर, कॉंग्रेसचे जेष्ठ नेते श्याम उमाळकर, माधवराव जाधव, ऋषी जाधव, प्रा सचीन जाधव, जयचंद भाटिया, राजेश मापारी, प्रा बळीराम मापारी, सह माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, आमदार, नगराध्यक्ष, प्राचार्य, उद्योजक, विविध संस्थांचे पदाधिकारी यांचा समावेश होता.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी रस्त्यावर उतरणार - बच्चू कडू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
साखरखेर्डा दि.१०




आजचे राजकारण हे जात, धर्म या चार भिंतीच्या आत चालू आहे. शेतकऱ्यांना जात नसते त्यांना धर्म नसतो तो जगाचा पोशिंदा आहे. पण तोच उपाशी असेल तर त्यांच्यासाठी कोण लढणार ! त्यांना कर्ज माफी कोण देणार! यासाठी आपण रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचा इशारा प्रहार जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष माजीमंत्री बच्छू कडू यांनी दरेगाव येथील शेतकरी मेळाव्यात दिला .

कैलास नागरे हा लढता लढता मेला नाही तर तो शहीद झाला आहे. तो कोणत्या जातीचा आहे हे लक्षात न ठेवता तो १४ गावातल्या शेतकऱ्यांना हक्काचे खडकपूर्णा धरणाचे पाणी मिळावे म्हणून लढला. आपण त्याचे एकाही गावात शहीद कैलास नागरे यांचे बलिदानाचा बॅनर लावले नाही. ही आपली शोकांतिका आहे. आपण जात, धर्म यातच गुरफटून गेलो. शेतकरी सर्व जातीत जन्माला आला आहे. त्याला जात नाही. म्हणून कोणी विचारत नाही. शेतकरी अक्रमक झाला तर एका दिवसात सत्ता पालट करण्याची ताकद त्यांच्यात आहे. बटेंगे तो कटेंगे यावर आपले मत गेलं. आणि शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्याचे आश्वासन ज्यांनी दिलं ते गुपचूप झाले. अजित पवार म्हणतात मी बोललो नाही . मग शेतकऱ्यांना कर्ज माफी मागावी कोणाकडे !

घरकुल योजना आली, सव्वा लाखांत घर कसं बांधायचं, आमदार यांचे पगार ५० हजारावरुन २लाख ५० हजार झाले . शिक्षक जुनी पेन्शन योजना लागू करावी म्हणून लढतात , संघटीत होऊन त्यांनी रंजीत पाटील यांना पाडलं, लिंगाडे यांना निवडून आनलं. आपण संघटीत झालो तर शेतकरी जगेल यासाठी लढा द्यायचा आहे.

प्रत्येक मंत्र्याच्या बंगल्यासमोर जाऊन संपूर्ण कर्ज माफीचे आंदोलन करायचे आहे. त्यासाठी आपला हा लढा आहे. मातृतीर्थ सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातून शेतकरी प्रहार संघटनेच्या माध्यमातून ८ मे रोजी दरेगाव येथे कर्जमाफी आंदोलनासाठी प्रहार जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष माजीमंत्री बच्छू कडू यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला शेतकरी योध्दा बालाजी सोसे, ज्ञानेश्वर खरात पाटील, गजानन जायभाये, प्रहार जनशक्ती संघटनेचे नेते गजानन लोखंडकार, शेतकरी संघटनेचे अमोल तुपकर , प्रहार जनशक्ती संघटनेचे तालुकाध्यक्ष अदित्या तिवारी, हरिश जैस्वाल उपस्थित होते.

यावेळी ज्ञानेश्वर खरात आणि बालू सोसे यांनी आपली आंदोलनाची दिशा स्पष्ट केली. ६ जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर येथील बंगल्यासमोर आंदोलन करण्यासाठी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन आत्माराम गाडे आणि शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केले होते.

# तालुका प्रमुख बघे यांच्या पाठपुराव्याने खामगाव पिंपळगाव राजा एसटी बस सुरू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.१०



रस्ता नादुरुस्त असल्यामुळे बंद असलेली बस काळेगाव भालेगाव मार्गे सुरू करण्यात आली असून खामगाव पिंपळगाव राजा नियोजन शून्य सुरू असलेले रस्त्याचे काम त्याच कारणाने एसटी महामंडळ बसचा झालेला अपघात रस्ता नादुरुस्त असल्यामुळे बंद झालेली बस सेवा पूर्ववत सुरू करण्यासाठी शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे व शिवसेना उप तालुका प्रमुख गोपालजी भील यांनी डेपो मॅनेजर अकोट साहेब यांची भेट घेऊन दि.०६मे २०२५ रोजी निवेदन दिले होते. व पर्यायी मार्ग काळेगाव भालेगाव मार्गे बस सुरू करावे असा आग्रह धरला होता.

त्यानंतर दिनांक ०९ मे२०२५ रोजी रोहना मार्गे काळेगाव,भालेगाव, पिंपळगाव राजा बस सुरू करण्यात आली त्यानिमित्ताने बस स्थानक खामगाव येथे शिवसेना तालुकाप्रमुख व उप तालुकाप्रमुख यांनी चालक वाहक यांचा सत्कार करून पहिली फेरी पाठवली व त्याच बस फेरीचे काळेगाव वासियांनी सुद्धा स्वागत केले.

यावेळी अनिल मुंढे,अनंता वाकुडकार, ज्ञानेश्वर पाटील उपसरपंच,दिवठाणा साठे बुवा काळेगाव रुतीक राणा प्रतीक वाकुडकार राजू गोडे आधी उपस्थित होते. बस फेरी सुरू झाल्याने विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक यांची होणारी गैरसोय टळली असल्याकारणाने आनंदाचे वातावरण ज्येष्ठ विद्यार्थ्यांमध्ये पाहण्यास मिळाले.

## थोडक्यात

### वरोली येथील जि.प. शाळेत समर कॅम्पचा समारोप



**मानोरा :** जि.प.शाळा वरोली येथे ५ ते ९ मे दरम्यान पाच दिवसीय निपुण भारत कार्यक्रमावर आधारित समर कॅम्प आयोजित करण्यात आला होता.
या शिबिराचा समारोपीय कार्यक्रम ९ मे रोजी करण्यात आला. विषय शिक्षक दिलीप डोळस, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य जगन्नाथ पाटील यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध कृती, योगा अभ्यास, व्यायाम,आनंददायी शिक्षण आधारित कृती, कार्यानुभव आधारित व्यावसायिक कौशल्ये, कला, चित्रे, रंगभरण प्रात्यक्षिक, टाकाऊ ते टिकाऊ वस्तूची निर्मिती आणि वापर,विविध खेळ व मनोरंजन आदी कृती घेण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता पुंडलिक कबाडे, जगन्नाथ सांगळे यांनी परिश्रम घेतले. संचालन शिक्षक अमोल ठोंबरे यांनी तर आभार संस्कृती शेखर गवई या विद्यार्थिनीने केले.

### बोरव्हा हातना येथील किराणा दुकानातून देशी दारू जप्त



**मानोरा :** मानोरा हद्दीत पेट्रोलींग दरम्यान तीन किराणा दुकानांवर छापे टाकून देशी दारू जप्त करण्यात आली. ही घटना ९ मे रोजी उघडकीस आली.
बोरव्हा येथील अविनाश सिताराम राठोड, हातना येथील शिवकुमार पांडुरंग पवार आणि किरण तारासिंग पवार यांच्या किराणा दुकानातून ७६ नग देशी दारु टॅंगो पंच कंपनीचे ९० मिलीचे बॉटल किंमत २६२५ रुपयेचा माल आरोपीकडून जप्त करण्यात आला. तिन्ही आरोपी विरुद्ध कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद केला. सदर कारवाई पोलिस निरीक्षक प्रविण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथक पोउपनि सुभाष महाजन, सफौ रवींद्र राजगुरे, पोहवा मदन पुणेवार, पोशी मनिष अगलदरे, रोहण तायडे यांनी केली.

### गिर्डा येथील कोमलची विद्युत सहायक पदासाठी नियुक्ती



**मानोरा :** मानोरा तालुक्यातील गिर्डा येथील दयाराम एकनाथ सोनोने (पोलीस पाटील) यांची मुलगी कोमल दयाराम सोनोने हिची विद्युत सहायकपदी निवड झाली. त्याबद्दल समस्त गावकरी मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती प्रेमसिंग राठोड, अविनाश राठोड, किशोर नाईक, सुभाष बेलखडे, अवधुत मनवर, शोभा बेलखडे, दयाराम भगत यांच्यासह गावकरी मंडळी उपस्थित होती.

### रामेश्वर विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**रिसोड :** दरवर्षीप्रमाणे यंदाही तालुक्यातील मोठेगाव येथील रामेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता बारावीचा १००% निकाल लागला आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे एकूण ७८ विद्यार्थी परीक्षेसाठी पात्र होते. त्यापैकी२१ विद्यार्थी हे प्राविण्य श्रेणीमध्ये तर ३२ विद्यार्थी प्रथम श्रेणी मध्ये २५ विद्यार्थी द्वितीय श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले आहेत. संस्थेतून प्रथम क्रमांक शेख आयशा फातिमा अक्रम,द्वितीय क्रमांक आलीजा तंजील शेख अजीम, तृतीय क्रमांक शिवम प्रवीण दुबे या विद्यार्थ्यांनी प्राप्त केला आहे. सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.चंद्रशेखर देशमुख, मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून स्वागत करण्यात आले.

### रोहिला वाचविण्याच्या प्रयत्नात ट्रक पलटी



**मानोरा :** दिग्रस रोडवरील बेलोरा गावानजीक रोही आडवा आल्याने त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात किराणा मालाचा ट्रक पलटी झाल्याची घटना ९ मे रोजी रात्री ९.३० च्या सुमारास घडली. सविस्तर असे की, पुसद वरून किराणा मालने भरून येणारा ट्रक मानोरा - दिग्रस रोडवरील बेलोरा गावानजीक रोही आडवा आल्याने त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात पलटी झाला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही.

# दोनशे रुपयात तलाव भिंतीजवळच्या गाळाची विक्री

## चिखली साठवण तलावातील प्रकार: अवैध गाळ उपसा कोण थांबविणार?

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. १० :** तालुक्यातील चिखली साठवण तलावाच्या भिंतीला लागून विनापरवाना गाळ उपसा सुरू असल्याचे शुक्रवार (दि.९ मे ) रोजी पाहावयास मिळाले. विशेष म्हणजे यासाठी प्रती ट्रॅक्टर ट्रॉली १५० ते २०० रुपये मोजावे लागत आहेत.
साधारणतः चार वर्षांपूर्वी राज्याच्या जलसंधारण विभागाकडून चिखली येथे साठवण तलावाची निर्मिती करण्यात आली. यासाठी परिसरातील शेतकऱ्यांकडून जमिनी संपादीत करण्यात आल्या. चार वर्षानंतर यंदा या तलावातून गाळ उपसा करण्यासाठी लाभक्षेत्रातील शेतकरी उत्सूक होते. काही जणांनी जलसंधारण विभागाकडून परवानगीदेखील घेतली; मात्र भूसंपादनानंतरही काही जण साठवण तलावातील जमिनीवर मालकी हक्क दाखवून चक्क गाळ विकत असल्याची चर्चा आहे. तलावाच्या भिंतीपासून काही अंतरावरून विनापरवाना गाळ उपसा होत असल्याने, भिंतीला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे महसूल प्रशासन व जलसंधारण विभागाने लक्ष देणे अपेक्षित ठरत आहे.
परजिल्हयातही गाळाची अवैध वाहतूक..! चिखली येथील साठवण तलावातील गाळ परगावातील, परजिल्ह्यातील शेतकऱ्यांना विक्री केला जात असल्याची चर्चा आहे. याबाबत जलसंधारण उपविभागाला माहिती देवूनही कार्यवाही नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. या प्रकरणात महसूल प्रशासनाने लक्ष घालून मोका पाहणी करावी, अवैध गाळ उपसा थांबवावा, अशी मागणी होत आहे.

> कार्यालयातील कनिष्ठ अभियंता यांना चिखली येथील साठवण तलावावर पाठवून त्या भागाची पाहणी करण्यात येणार, तसेच जे नागरिक भिंतीजवळील अवैध गाळाचा उपसा करीत आहेत. त्यांना सूचना देऊन रितसर परवानगी घेण्याचा सूचना देऊन भिंतीपासून विशिष्ट हद्द सोडून गाळ उपसा करण्यास सांगण्यात येईल.
>
> **- प्रेम शिंदे**
> उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण उपविभाग,रिसोड.

## एकीकडे लग्नसराईची धूम, दुसरीकडे बंद घरात चोऱ्या

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. १० :** सध्या सर्वत्र लग्न सराईची धुम सुरू असून अशातच दिवसागणिक वाढत चाललेल्या चोऱ्याचा अनुषंगाने ठाणेदार रामेश्वर चव्हाण यां नागरिकांनी घ्यावयाचा काळजी संदर्भात आवाहन केले आहे. रिसोड शहरात दिवसें दिवस चो-यांचे प्रमाण वाढत चालले आहे.यापुर्वी झालेल्या चोरीत स्थानिक चोर राहायचे परंतु आता जिल्ह्याबाहेरील आणि राज्या बाहेरचे लोक सुद्धा या भागात येवुन चो-या करत आहेत.गावात ग्राम सुरक्षा दल स्थापन करून दररोज ७ ते ८ युवकानी गावात रात्रगस्त घालावी.काही संशयीत माहीती किंवा व्यक्ती आढळुन आल्यास कायदा हातात न घेता तात्काळ ११२ या नंबरवर महिती द्यावी.बस स्टैन्ड वर लग्नसराई मुळे सध्या भरपुर प्रमाणात गर्दी आहे. बस मध्ये चढ़ताना किंवा उतरत असतांना आपले दागीणे, पर्स, बटवा, पाकीट सांभाळुन सुरुक्षित ठेवावे. गर्दीत कोणी धक्का मारत असेल तर जागरुक रहावे.वाहनांना जीपीएस बसवुन घ्यावी.जेणेकरुन वाहने चोरी गेल्यास तात्काळ शोध घेता येईल. नागरिकांनी बाहेरगावी जातांना घरातील मौल्यवान वस्तु बॅंकेच्या लॉकरमध्ये ठेवावेत. बाहेरगावी जातांना शेजारी किंवा पोलीसांना माहीती द्यावी. घरासमोर सीसीटीव्ही कॅमेरा लावा. व्यापारी यांनी दुकानात व बाहेर सर्व बाजु सीसीटीव्ही कॅमेरा बसवावेत.काही व्यक्ती,आरोपी पुढे दंगल झाली,मर्डर झाला,तुमच्या जवळ गांजा आहे. तुमची झडती घेणे आहे,आम्ही पोलीस आहोत अशी बतावनी करुन तुमच्या जवळील रक्कम दागीने हातचलाखी करुन काढुन घेतात. अशा आरोपी पासुन सावधानता बाळगावी. याशिवाय काहीही संशयीत माहीती असल्यास निसंकोच पोलीसांना द्यावी. असे आवाहन पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी केले आहे.

## अन्यायग्रस्त महिलेला मिळाला न्याय: नुकसान भरपाईचा आदेश

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. १० :** जवळच असलेल्या हराळ येथील महिला प्रसुती करिता रिसोड येथील इंगोले बाल रुग्णालय व प्रसूतीगृह डॉ. नीलिमा गोपाल इंगोले यांचे खाजगी दवाखाण्यामध्ये नियमित तपासणी व प्रसूतीपूर्व उपचार घेतले होते. डॉक्टर यांनी सांगीतल्याप्रमाणे औषधोपचार घेतले व त्यांनी सांगितलेल्या सूचनेचे काटेकोरपणे पालन केले. प्रसूतीच्या वेळेपर्यंत महिलेच्या पोटातील बाळ चांगले होते. जेव्हा महिलेची प्रसूतीची वेळ आली तेव्हा सदर महिला डॉ.नीलिमा गोपाल इंगोले यांचे दवाखान्यामध्ये भरती झाली परंतु त्यांनी चुकीचा उपचार केल्यामुळे व प्रसूतीच्या वेळेस हलगर्जीपणामुळे प्रसुतीच्या दरम्यान महिलेच्या पोटातील बाळ दवाखान्यामध्ये दगावले होते.
सदर बाब डॉ.नीलिमा इंगोले यांचे लक्ष्यात आल्यानंतर त्यांनी जबाबदारी टाळण्याकरिता सदर महिलेला वाशीम येथील जिल्हा सामान्य रुग्णालय येथे प्रसूती करिता जाण्यास सांगितले तेव्हा जिल्हा सामान्य रुग्णालय येथील डॉक्टरानी बाळ पोटात दगावल्याचे सांगितले.
सदर महिलेवर डॉ.नीलिमा गोपाल इंगोले यांनी चुकीचा उपचार करून व प्रसूती दरम्यान हलगर्जीपणा केल्यामुळे पोटातील बाळ दगावल्यामुळे अन्याग्रस्त महिलेने डॉ.नीलिमा इंगोले यांचे विरुद्ध वि.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचेकडे ॲड. सर्वजीत आ.गोरे यांचे मार्फत तक्रार दाखल केली व त्यांनी प्रकरणात अन्यायग्रस्त महिलेची बाजु प्रभावीपणे मांडली.
वि.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग वाशिम यांनी दोन्ही बाजूचा बचाव व युक्तिवाद ऐकुन व प्रकरणातील कागदपत्रे,परिस्थिती लक्ष्यात घेऊन अन्यायग्रस्त तक्रारकर्तीच्या अर्ज मंजूर करून डॉ. नीलिमा इंगोले यांनी तक्रारकर्ता यांना तत्परसेवा देण्यास कसुर केल्यामुळे व त्यांनी अनुचित व्यापार पद्धतीचा अवलंब केल्यामुळे व तक्रारकर्ती यांना झालेल्या शारीरिक, मानसिक त्रासापोटी रक्कम ५,००,०००/- (पाच लाख) रुपये ४५ दिवसाच्या आत देणे बाबत आदेश पारित केला आहे. सदर रक्कम ८% व्याजसह देण्याबाबत तक्रारकर्त्याला देणे बाबत आदेशित केले आहे.
तसेच तक्रारकर्तीला तक्रारखर्च रक्कम १०,०००/- (दहा हजार) रुपये देणे बाबतचा आदेश वि.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष श्रीमती.वैशाली गावंडे, नागेश उबाळे यांनी दिले आहे.

## जलतारा उपक्रमात समता फाउंडेशनचा पुढाकार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. १० :** राज्य शासनाचा जलसंधारणाचा महत्वाकांशी उपक्रम असेलल्या जलतारा योजेनेत समता फाउंडेशनने सक्रिय सहभाग नोंदविला आहे .. राज्यातील शेती पाणीदार करण्यासाठी पाण्याची उपलब्धता करणे अत्यावश्यक आहे. शेती व शेतकरी समृध्द झाला तरच खऱ्या अर्थाने विकास होवू शकतो, त्यासाठी जिल्ह्यात प्रत्येक शेतर्कयांनी जलतारा प्रकल्प योजना १ मार्च पासून शेतात राबविण्याची सुरूवात झाली आहे. रिसोड तालुक्यातील काही गावांमध्ये शेतकऱ्यांना मोफत जलतारा प्रकल्पातील गड्डे खोदून देण्याची जबाबदारी घेतली. त्या अंतर्गत तालुक्यातील मांडवा, कुऱ्हा, घोटा,वाकद,मोप,मोठेगाव, अगरवाडी आदी गावात शेतकऱ्यांना मोफत गड्डे खोदून देत आहे. ८ मार्च पर्यंत अधिकृत आकडेवारी नुसार रिसोड तालुक्यात एकूण १२१० गड्डे खोदण्यात आले.त्यापैकी ६२० गड्डे समता फाउंडेशनने खोदून दिले हे विशेष.
वाशिम जिल्ह्यामध्ये कारंजा १४६३, वाशीम १५६८, रिसोड १२१०, मानोरा ४२७ व मालेगाव ६९७ जलताराचे गड्डे खोदण्यात आलेले आहेत. समता फाउंडेशनचा जलतारा प्रकल्पामध्ये असलेल्या सक्रिय सहभाग पाहता रिसोड तालुका जिल्ह्यामध्ये लवकरच पहिल्या क्रमांकावर येईल असे दिसते.
तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी शासनाचा महत्त्वकांक्षी जलतारा प्रकल्पामध्ये सहभागी होऊन समता फाउंडेशन तर्फे आपल्या शेतामध्ये जालताराचे मोफत गड्डे खोदून घ्यावेत असे आवाहन समता फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'फार्मर आयडी'साठी शेवटचे तीन दिवस

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**वाशिम, दि. १० :** शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ जलद, पारदर्शक पद्धतीने मिळण्यासाठी 'ॲग्रिस्टॅक' प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्याअनुषंगाने १५ एप्रिलपासून 'फार्मर आयडी' अनिवार्य करण्यात आले असून, यापुढे कोणतीही शासकीय कृषी योजना या ओळख क्रमांकाविना मंजूर केली जाणार नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी १३ मेपूर्वी 'फार्मर आयडी' तयार करून घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.
'ॲग्रिस्टॅक' प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांचा ७/१२ उतारा, गाव नकाशे, आधार क्रमांक, मोबाइल आणि भू-संदर्भीय माहिती एकत्र करून एक विशेष डिजिटल ओळख निर्माण केली जात आहे. हा 'फार्मर आयडी' शेतकऱ्याचा अधिकृत डिजिटल डेटा असणार असून, त्याच्याच आधारे पुढे सर्व योजनांचा लाभदिला जाणार आहे.
प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीकविमा योजना, पीककर्ज, बाजारभाव माहिती, खरेदी सत्रातील किमान आधारभूत किमतीवरील नोंदणी अशा अनेक योजनांचा लाभ घेणे शेतकऱ्यांसाठी अधिक सोपे होणार आहे. याशिवाय संबंधित जमिनीच्या मालकी व शेतीसंबंधी तपशील डिजिटल स्वरूपात उपलब्ध होणार आहे.

## श्री संत गजानन महाराज संगीतमय चरित्र भावकथेला भव्य प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १० :** श्री गजानन महाराज मंदीर लाखाळा व श्री कथा सेवा समिती, श्रीभक्त सेवाधारी मंडळ यांच्यावतीने लाखाळा येथील चांडक लेआऊटमध्ये हभप जयमहाराज सरनाईक यांच्या अमृतवाणीतून श्री संत गजानन महाराज संगीतमय चरित्र भावकथा कार्यक्रम १ मे ते ८ मे पर्यंत पार पडला. ७ मे रोजी बावन्नी रचते सुरेशआबा शेवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ११ हजार १११ भक्तांनी बावन्नी पठण केले आहे..
स्थानिक चांडक लेआऊट येथील भव्य प्रांगणात आयोजित श्री संत गजानन महाराज चरित्र भावकथेमध्ये हभप जयमहाराज सरनाईक यांनी संत गजानन महाराज यांच्या विविध कथा व चरित्राचे पठण करून विस्तृत माहिती दिली. वैज्ञानिक, धार्मिक, अध्यात्मीक विषयाच्या सांगड या कथेच्या माध्यमातून करण्यात आली. सदर कथेमध्ये वाशीम मंगरूळपीर विधानसभा आमदार श्याम खोडे, कारंजा मतदार संघ आ. श्रीमती सईताई डहाके, भाजपाचे राजु पाटील राजे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी, ॲड. भारती सोमाणी, डॉ. हरिष बाहेती, माजी न.प. सभापती राजकुमार लाहोटी समवेत मान्यवरांचा हभप जय महाराज यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. कथेच्या सांगता सोहळयाला दिवंगत आमदार प्रकाशदादा डहाके सभामंचावर प्रमुख उपस्थिती म्हणून संत गजानन महाराज पुस्तकाचे बावन्नी रचते सुरेशआबा शेवडे प्रामुख्याने उपस्थित हाते. मंचावर आ. श्रीमती सईताई डहाके, हभप जय महाराज सरनाईक देऊळगावकर, बालयोगी प.पू. गोपालनाथ महाराज रतनगड, स्वामी ज्ञानानंद सरस्वती वांगी, उद्योजक देवेंद्र खडसे पाटील, विद्यावाचस्पती दिलीप जोशी, उद्योजक गिरधारीलाल सारडा, डॉ. हरिष बाहेती, जयेश लड्ढा, राजकुमार लाहोटी, दामोदर चांडक, दिलीप देशमुख, पवन वर्मा, भाष्करराव देशमुख, आशिष वर्मा, सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमाणी, सौ. भारती सोमाणी, माजी नराध्यक्ष अशोक हेडा, राहुल तुपसांडे, वसंतराव धाडवे, ॲड. सुरेश टेकाळे, वृषाली टेकाळे, मनीष मंत्री,संयोजक शिवशंकर भोयर, ग्रामीण पाणी पुरवठा अभियंता अजिंक्य वानखेडे, उपकार्यकारी अभियंता महेश कान्हेरकर, उपविभागीय अभियंता मनिषा चौधरी, व्यासकॉस व नॅपकॉश कंपनीचे सर्व अभियंते, रेनसांस पर्टो पेम कंपनी प्रा.लि. मुंबईचे पदाधिकारी आदिंची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमात हभप जय महाराज समवेत सुरेशआबा शेवडे यांनी उपस्थितांना संत गजानन महाराज यांचे महात्म कथन केले. सदर कार्यकमाला आर्गन हभप ज्ञानेश्वर महाराज माळी, गायक हभप सागर महाराज राऊत दानापूर, हभप ऋषीकेश महाराज निवघा, तबलावादक हभप आशिष महाराज देवठाणा, हभप सोहम चुंबळे मुंबई, पखवाज हभप काशिनाथ महाराज पौळ, निवेदक हभप गणेश महाराज सरनाईक, चोपदार हभप अशोक महाराज जाधव यांनी साथसंगत दिली.

# 'आपलं गाव स्वच्छ ठेवू' अभियानाला जिल्ह्यात प्रारंभ

## स्वच्छताविषयक वर्तवणुकीत बदल घडविण्याचा प्रयत्न

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १० :** स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत वाशिम जिल्ह्यात 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू' या विशेष मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला आहे. या उपक्रमाचा उद्देश गावपातळीवर ओला व सुका कचरा वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रियायुक्त करून कंपोस्ट खतात रूपांतरित करणे आहे.
गावाची स्वच्छता करण्याबरोबरच ग्रामीण भागातील गावांना स्वच्छतेचा अपेक्षित दर्जा मिळवून देण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेच्या स्वच्छताविषयक वर्तवणुकीत बदल घडवून आणण्यासाठी या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.
गावातील ओल्या व सुक्या कचऱ्याचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन करून सार्वजनिक स्वच्छताविषयक बाबींची लोकांमध्ये जाणीव जागृती करणे, घनकचऱ्याचा पुनर्वापर करणे, पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यासाठी १३८ दिवसांचे हे विशेष अभियान जिल्ह्यातील ६ तालुक्यांत राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शुभारंभ जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने करण्यात आला आहे.
अभियानाच्या पूर्व तयारीसाठी गावपातळीवर दवंडी देणे, ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडीसह गावातील दर्शनी भागात नोटीस लावून याबाबत माहिती देणे, घरगुती व सार्वजनिक स्तरावरील ओला व सुका कचरा संकलित करून ठेवणे, आदी कामे केले जाणार आहे.

**प्रत्येक गाव स्वच्छ अनब सुंदर बनवायचंय!**
कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू या मोहिमेतून जिल्ह्यातील प्रत्येक गाव स्वच्छ ठेवण्यात येणार आहे. काडीकचऱ्याचे खत बनणार, पैसा वाचणार. ओला व सुका कचरा तसेच पालापाचोळा एका खड्ड्यात टाकून खत बनविण्यात येणार आहे.

## 'त्या' परिसरात चार महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णतः विस्कळीत

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १० :** शहरातील शंकरबाबा रोड, चांडक लेआऊट, दत्त नगर परिसरात गत चार महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णतः विस्कळीत झाला आहे. यामुळे नागरिक हैराण झाले असून, नगर परिषदेच्या भूमिकेविरोधात रोष व्यक्त केला.
यासंदर्भात संतप्त नागरिकांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे ९ मे रोजी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, गेल्या काही महिन्यांपासून दत्त नगर परिसरात नळाद्वारे होणारा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. सकाळच्या सुमारास 'ओव्हरफ्लो'मधून काही प्रमाणात पाणी मिळायचे; परंतु तेही एप्रिल महिन्यापासून बंद झाले आहे. या भागातील मुख्य पाइपलाइनवर नळांची संख्या वाढल्याने पाणी दाब कमी होतो आणि अखेरच्या घरांपर्यंत पाणी पोहोचत नाही. त्यामुळे समस्या अधिकच गंभीर झाल्याचे निवेदनात नमूद आहे.

**मुख्य जलवाहिनी टाकण्यात यावी!'**
पाणीटंचाईच्या समस्येवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी दत्तनगर परिसरात समांतर मुख्य पाइपलाइन टाकण्यात यावी, नवीन वॉल बसवून त्याद्वारे पाणी वितरण नियमन करण्यात यावे आणि भविष्यात पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन नवीन जलकुंभ प्रस्तावित करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली.

अजिंक्य भारत

# आपला जिल्हा

अकोला, रविवार, दि. ११ मे २०२५



## थोडक्यात

### संजय अग्रवाल खरवडवाले यांचे देहदान



**अकोट :** येथील रहिवासी संजय सवरमलजी अग्रवाल खरवडवाले यांचे ७ मे रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर परिवाराने त्यांचे देहदान करण्याचा निर्णय घेतला. या माध्यमातून त्यांनी देहदान करण्याकरिता प्रेरित करणारा संदेश दिला. संजय अग्रवाल यांचे आजारामुळे निधन झाले. त्यानंतर त्यांच्या पत्नी नंदा संजय अग्रवाल, मुलगा ऋषी, मुलगी खुशी यांनी जगतगुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य नाणीजधाम रत्नागिरी यांच्या प्रेरणेने त्यांचे देह शासकीय विद्यालय अकोला येथे दान केले. देहदान करून त्यांनी समाजासमोर एक उत्कृष्ट आणि प्रेरणादायी आदर्श ठेवला आहे. या निर्णयात त्यांची आई रामप्यारी अग्रवाल, भाऊ सतीश (बापू), दिलीप, सुरेश यांनी त्यांना साथ दिली आहे.

### रेल्वे भूखंड मुक्त करण्यासाठी भुसावळ विभागाची मोठी कारवाई



**अकोला :** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाने अकोला रेल्वे स्थानकाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण हटविण्याची मोहीम यशस्वीपणे पार पाडली. ९ मे २०२५ रोजी, अकोला येथील गौतमवाडी, आपातापा रोड आणि चिखलपुरा, खरप रोड या भागांत सुमारे ८६ अतिक्रमण हटवून जवळपास ४०,००० चौ.मी. क्षेत्रफळाचे रेल्वेचे जमीनमुक्त करण्यात आले. सदर जमिनीची अंदाजे किंमत १० कोटी रुपये इतकी आहे.

ही कारवाई रेल्वे अभियांत्रिकी विभाग व रेल्वे सुरक्षा बल यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली पार पडली, तसेच अकोला शहर पोलीस दल आणि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचे या कारवाईस मोलाचे सहकार्य लाभले. गेल्या २५ वर्षांपासून अतिक्रमित असलेली ही जमीन आता पूर्णपणे रेल्वेच्या ताब्यात आली आहे. ही कारवाई रेल्वेच्या भविष्यातील विविध पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असून, त्यामुळे अकोला परिसरात रेल्वेच्या विविध योजना राबविण्यास मार्ग मोकळा झाला आहे.

### अतिवृष्टी व संत्रा फळगड नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर

**अकोट:** तालुक्यातील उमरा महसूल मंडळातील शेतकऱ्यांनी सन २०२४-२५ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती नुकसानाबाबत व संत्रा बागेतील फळगड (ड्रॉपिंग) नुकसानाच्या मदतीसाठी जिल्हाधिकारी अकोला यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याशिवाय चालू वर्षात संत्रा बागांमध्ये देठसुखी रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला. परिणामी झाडांवरची फळे वेळेपूर्वी गळून पडली. या दुहेरी संकटामुळे शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडले असून, अजूनपर्यंत कोणतीही शासकीय मदत मिळालेली नाही. या संदर्भात महसूल विभाग, कृषी विभाग तसेच डॉ. पं. दे. कृ. विद्यापीठाचे अधिकारी सर्वेक्षणासाठी आले होते; मात्र मदतीसंदर्भात अद्याप ठोस निर्णय झाला नाही.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन त्वरित मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे, तसेच या निवेदनाची प्रत कृषी मंत्री, कृषी आयुक्त व कृषी अधीक्षक यांनाही देण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी शासनाकडे वेळेवर आर्थिक मदत जाहीर करून दिलासा देण्याची मागणी केली आहे, अन्यथा आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे, तसेच अकोट तालुक्यातील उमरा महसूल मंडळातील शेतकऱ्यांनी संत्रा मृग बहार (सन २०२४-२५) विम्याची मंजूर रक्कम अद्याप त्यांच्या खात्यावर जमा न झाल्याने नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी अकोला व जिल्हा कृषी अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले. शासनाच्या अधिसूचनेनुसार वेळेत संत्रा पीक विमा भरला होता. विमा मंजूरही झाला असून, रक्कम मंजुरीच्या स्थितीत आहे.

## निधन वार्ता

### बाबूलाल गुरुखुद्दे



**अकोला :** जिल्ह्यातील अहिर गवळी समाजातील प्रख्यात व्यक्तिमत्त्व प्रदीप गुरुखुद्दे यांचे वडील, स्व.बाबूलालजी हिरामणजी गुरुखुद्दे यांचे १० मे २०२५ रोजी निधन झाले. त्यांचा अंत्यविधी ११ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या निवासस्थान विठ्ठल मंदिराच्या मागे, जुने शहर, अकोला येथून निघेल.

# जादा पैसे मोजूनही मिळेना शेणखत

## शेणखताला आले सुगीचे दिवस; खरिपाच्या तोंडावर वाढली मागणी!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**टाकळी बु., दि. १० :**रासायनिक खतांच्या सातत्यपूर्ण वापरामुळे जमिनीचा पोत आणि सुपीकता कमी होऊ लागल्याने विदर्भातील अनेक शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळताना दिसत आहेत. यामुळे शेणखताची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून, मागणीच्या तुलनेत उपलब्धता कमी झाल्याने जादा पैसे मोजूनही शेणखत मिळत नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

ग्रामीण भागात आगामी खरीप हंगामाची तयारी सुरू असून, खताची मागणी वाढली आहे. शेणखत हे पारंपरिक सेंद्रिय खत असून, शेतकऱ्यांचा आजही या खताकडे कल आहे; परंतु गुरांची संख्या कमी झाल्याने शेणखताचे प्रमाणही कमी झाल्याचे दिसून येत आहे. पेरणीपूर्व मशागतीचे दिवस जवळ आले आल्याने शेतात शेणखत टाकण्याची लगबग सुरू आहे. पूर्वी शेतीसोबतच पशुपालन केले जात असे. त्यामुळे शेणखत सहजपणे मिळत होते. यांत्रिकीकरणाच्या वाढत्या वापरामुळे गाय, म्हैस, बैल, शेळ्या, मेंढ्या अशा पशुधनाची संख्या घटली आहे. शेणखताचे अनेक फायदे आहेत. जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते, जमिनीतील गांडुळाचा वावर वाढतो, पांढऱ्या मुळींची वाढ होऊन पीक हंगामात निरोगी राहते, शेणखताचा वापर केल्यास उत्पादन चांगले येऊन उत्पादनात वाढ होते. यामुळे शेतकऱ्यांना शेणखताचे महत्त्व आहे. खरीप हंगाम काही दिवसांवर येऊन ठेपल्याने शेतकऱ्यांनी शेती मशागतीच्या कामाकडे आपला मोर्चा वळविला आहे. रासायनिक खतामुळे जमिनीचा पोत खालावल्याने शेतकऱ्यांनी शेणखताचा वापर वाढविला आहे. शेतकऱ्यांकडे पशुधन कमी झाल्याने शेणखताचा तुटवडा निर्माण झाला आहे.

> **शेणखत वापर, शेतकऱ्यांसाठी उपयुक्त!**
>
> **कधी वापरावे ? :** पेरणीपूर्व मशागती दरम्यान शेणखत वापरणे सर्वांत उपयुक्त. जमिनीत खत नीट मिसळून द्यावे. किती वापरावे? एका एकरासाठी सरासरी ७ ते १० ट्रॉली शेणखत आवश्यक (जमिनीचा प्रकार व पिकानुसार बदलू शकते). स्थानिक पशुपालक, कृषी सहकारी संस्था, सेंद्रिय शेती करणाऱ्या उत्पादक गटांकडून गुणवत्तेची तपासणी कशी करावी? शेण सडलेले, ओलसर आणि गंधविरहित असावे. जास्त कचरा व अर्धवट कुजलेले खत टाळावे.

## श्री क्षेत्र श्रद्धासागर येथील विद्यार्थ्याने दिला बाल संस्काराचा आदर्श

### ७० हजारांची अंगठी परत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. १० :** कुळी कन्या पुत्र होती जे सात्विक तयाचा हरिख वाटे देवा, या जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांच्या अभंगानुसार समाजामध्ये अनेक सुसंस्काराकरिता कन्या-पुत्रांचे दर्शन घडत असते.

किंबहुना या लहान बालकांना सुसंस्कारित करणारी केंद्रे महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. अशीच एक घटना श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे सुरू असलेल्या श्री संत वासुदेव महाराज सर्वांगीण विकास बालसंस्कार शिबिरामध्ये घडली. श्री गुरु मंदिरामध्ये श्रींचे सेवाधारी भक्त मधुकरराव पुंडकर पहाटे अभिषेकाकरिता आले होते. अभिषेक महाआरती पूर्ण करून ते आपल्या स्वगृही परतले. बऱ्याच वेळानंतर त्यांना त्यांची सात ग्रॅमची अंगठी हरविली असल्याचे लक्षात आले. पुष्कळ शोधा-शोध घेतल्यानंतर ती सापडत नव्हती. तेव्हा श्रीक्षेत्र श्रद्धासागर येथे श्री पुंडकर माघारी परतले. त्यांनी तिथे सुद्धा पुष्कळ शोध घेतला. शेवटी कार्यालयाकडे धाव घेतली. त्या ठिकाणी त्यांना फार मोठा आश्चर्याचा धक्का बसला. त्यांची हरविलेली अंगठी कार्यालयात जमा झाल्याचे कळले. ही ७० हजार रुपये किमतीची अंगठी येथे शिबिरार्थी म्हणून आलेला विद्यार्थी चि. शिवराज सुरेंद्र चिकटे, रा. माळेगाव बाजार ता. तेल्हारा जि. अकोला यास सापडली होती. तेव्हा या विद्यार्थ्याने प्रामाणिकपणाचे उत्तम दर्शन देत ही अंगठी आपल्या गुरुजनांकडे सुपूर्द केली. गुरुजनांनी ही मौल्यवान अंगठी कार्यालयामध्ये जमा केली. कार्यालयामध्ये या बाबीची तातडीने दखल घेत ही अंगठी रीतसर जमा करून घेतली होती. काही वेळानंतर या अंगठीचे यजमान श्री मधुकरराव पुंडकर आले असता, त्यांना ही अंगठी चि. शिवराजच्या हस्ते सुपूर्द करण्यात आली.

## निपून महाराष्ट्र अभियानांतर्गत उन्हाळी शिबिराचा प्रारंभ

### गावातील युवती व माता आहेत स्वयंसेवक मार्गदर्शक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. १० :** महाराष्ट्र निपून कृती कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे माहे मे व जून महिन्यात ६ आठवड्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शिबिराचा प्रारंभ नुकताच पी. एम. श्री आंतरराष्ट्रीय जि. प. सेमी इंग्रजी शाळेत मोठ्या उत्साहाने मान्यवरांच्या उपस्थितीत झाला.

राज्यातील इयत्ता दुसरी ते पाचवीच्या वर्गातील शालेय विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी निपून महाराष्ट्र अभियान व त्या अंतर्गत कृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. शालेय वेळा व्यतिरिक्त वेळ वापरून सुट्टी कालावधीचा सदुपयोग करून विद्यार्थ्यांना अपेक्षित अध्ययन क्षमता प्राप्त करून त्यांना प्राविण्य स्तरापर्यंत आणण्यासाठी गाव व शाळा पातळीवर या उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये सातत्य राखणे, त्यांच्या कौशल्यांचा विकास करणे व पुढील इयत्तांच्या करिता आवश्यक तयारी करून घेणे हा आहे. या शिबिरादरम्यान वाचन, लेखन गणिती क्रिया तसेच खेळ व क्रीडा स्पर्धा, योगा इत्यादी कृतींचा उपयोग करण्यात येत आहे. या उन्हाळी शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे आयोजन शाळेमार्फत स्थानिक युवक-युवती व लीडरमाता यांच्या मदतीने स्वयंस्फूर्तीने करण्यात आले आहे व याकरिता त्यांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीकरिता शाळा व समाज एकत्र झाल्यास उत्तम विद्यार्थी घडू शकतात, हे या कृतीतून निदर्शनास येत आहे. शाळेतील मु.अ. व सर्व शिक्षक याकरीता कार्यरत आहेत.

## शेतकऱ्यांनी ॲग्रिस्टेक योजनेत ओळख क्रमांक मिळवावा

**अकोला :** राज्य शासनाकडून ॲग्रिस्टेक योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेत शेतकऱ्यांना 'शेतकरी ओळख क्रमांक' तयार करणे अनिवार्य आहे. ही प्रक्रिया शेतकरी बांधवांना योजनांचा लाभ घेण्यासाठी उपयुक्त असून, त्यांनी तत्काळ ओळख क्रमांक मिळवावा, असे आवाहन अपर आयुक्त अजय लहाने यांनी केले आहे. ॲग्रिस्टेक योजनेचे ओळख क्रमांक हे शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. शेतकरी ओळख क्रमांकाच्या माध्यमातून पीएम किसान योजनेचा लाभ, पीक कर्ज, किसान क्रेडिट कार्ड, कृषी पायाभूत सुविधा निधी, शेती विकासासाठी इतर कर्ज, पीक विमा, नैसर्गिक आपती नुकसान भरपाई, किमान आधारभूत किमतीवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नोंदणीकरण, कृषी कर्ज, दीर्घ मुदती कर्ज, खते, कीटकनाशके, बी-बियाणे, कृषी अवजारे आदी योजनांचा लाभ सुलभरीत्या, पारदर्शकपणे व जलदगतीने शेतकऱ्यांना प्राप्त करता येईल.

## मी निवडणूक लढवावी ही प्राध्यापक, शिक्षक मंडळींची इच्छा-बच्चू कडू



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १० :** मी गेल्या २५ वर्षांपासून शेतकरी, दिव्यांग तसेच तळागाळातील लोकांच्या प्रश्न व समस्यांबद्दल सरकारसोबत तळमळीने लढून लोकांना न्याय मिळवून देत आहे. मी शालेय शिक्षण मंत्री म्हणून काम केल्यामुळे शिक्षणासारख्या पावन क्षेत्रात काय काय बरं-वाईट सुरू आहे, याची मला जाणीव आहे. शिक्षणाचे क्षेत्र वाचविण्यासाठी बच्चू कडू यांनी शिक्षक मतदार संघाची निवडणूक लढली पाहिजे, अशी थेट इच्छा प्राध्यापक, शिक्षक मंडळींनी माझ्याजवळ व्यक्त केली आहे, असे माजी मंत्री तथा प्रहार संघटनेचे संस्थापक बच्चू कडू यांनी सांगितले. बच्चू कडू यांनी अकोटमधील शिक्षक मंडळीसोबत नुकतीच वसुंधरा ज्ञानपीठ अकोट येथे शिक्षण विभागातील प्रश्न व समस्यांबाबत चर्चा केली. यावेळी संस्थापक अध्यक्ष विठ्ठल कुलट, श्री.शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील पांडे, मुख्याध्यापक अनंत कुलट, प्राचार्य शिवचरण नारे, शिवा सांगुनवेढे, सुधाकर गीते, डॉ.अभिषेक गावंडे, श्रीकांत सरोदे तसेच वसुंधरा ज्ञानपीठमधील शिक्षक व शिक्षकेतर मंडळी उपस्थित होती. यावेळी अकोट शहरात आठ ते दहा ठिकाणी कॉर्नर मीटिंग घेऊन शिक्षक यांच्या सोबत संवाद साधून त्यांच्या सास्या जाणून घेतल्या या वेळी शिक्षकांचा चांगला प्रतिसाद अकोट मधुन मिळाला यावेळी उपस्थीत प्रहारचे जिल्हा अध्यक्ष कुलदीप पाटील वसु, प्रहार युवक जिल्हा प्रमुख सुशील पुंडकर, प्रहार तालुका संघटक शुभम नारे, प्रहार शहर कार्याध्यक्ष अचल बेलसरे, बल्ली राजा जमादार तसेच अनेक कार्यकर्ते व शिक्षक कर्मचारी वर्ग उपस्थीत होते.

## अकोट येथे वंचित बहुजन युवक आघाडीच्यावतीने रक्तदान शिबिर

### बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोट, दि. १० :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज १० मे रोजी, वंचित बहुजन युवक आघाडीच्या वतीने, अकोट येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये रक्तदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रकाश आंबेडकर यांनी त्यांच्या होणाऱ्या १० मे रोजी वाढदिवसानिमित्त कुणीही केक कापू नये, फटाके फोडू नये, त्या ऐवजी भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्याकरिता तिरंगा रॅलीचे आयोजन करावे व रक्तदानाचा कार्यक्रम आयोजित करावा, असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी कार्यकर्त्यांना केले होते. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशान्वये आज वंचित बहुजन युवक आघाडीच्यावतीने ग्रामीण रुग्णालय अकोट येथे रक्तदानाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले. या उपक्रमाचा सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. रक्तदानाच्या कार्यक्रमाकरिता भारिप बहुजन महासंघाचे माजी जिल्हाध्यक्ष प्रदीप वानखडे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अकोट वंचित बहुजन युवक आघाडीच्या वतीने करण्यात आले. यावेळी अमन गवई,उमेश लबडे,विकी धांडे,नंदू मापारी,सचिन सरकटे, नितीन पळसपगार,मिथुन भारसाकडे, अक्षय तेलगोटे,हिरा सरकटे, सचिन उमाळे,पवन बनसोड,राजपाल बडगे, सचिन सुपासे,प्रवीण सुलताने,सागर गहले,उल्हास तेलगोटे,निलेश तेलगोटे,रणजीत सरकटे,भूषण मोहोड,रितिक तेलगोटे, सुनील घनबहादुर,प्रमोद सोनोने, स्वप्नील सरकटे यांचे सहित वंचित बहुजन युवक आघाडीचे पदाधिकारी, वंचित बहुजन आघाडी, महिला आघाडी, समता सैनिक दलाचे प्रतिनिधी, विद्वत्त सभा यांचे सहित वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखेर बोर्डी,रामापूर येथील घरकुल बांधकाम योजनेच्या चौकशीचे आदेश

## भ्रष्टाचारास दोषी असलेल्याविरुद्ध होणार कडक कारवाई

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अजिंक्य भारत इम्पॅक्ट**

**अकोट, दि. १० :**सर्वांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने विविध योजना लागू केल्या आहेत. मात्र ग्रामपंचायत स्तरावर अधिकारी, कर्मचारी, रोजगार सेवक हे संगणमत करून खोटे लाभार्थी दाखवून शासनाच्या निधीचा दुरुपयोग करीत असल्याच्या तक्रारी होत आहेत.अशीच एक बाब समोर आली असून, ग्रामपंचायत बोर्डी व गट ग्रामपंचायत रामापूर येथील मंजूर असलेल्या घरकुल यादीतील घरकुलधारक लाभार्थ्यांच्या खात्यात शासनाकडून पहिला टप्पा १५००० हजार रुपये जमा करण्यात आला आहे.याबाबत दै. अजिंक्य भारतने वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची दखल घेऊन अखेर बोर्डी, रामापूर येथील घरकुल बांधकाम योजनेच्या चौकशीचे आदेश निघाले आहेत.

काही लोकांनी अजूनही घरकुलाचे बांधकाम सुरू केलेले नाही व मंजूर असलेल्या यादीपैकी काही लोकांची घरे ही पक्की असून स्वतः बांधलेले आहेत. अशा लोकांच्या नावाचा यादीमध्ये समावेश करून त्यांच्या नावावर सुद्धा पहिला टप्पा १५००० हजार रुपये जमा करण्यात आला आहे व रोजगार हमी योजनेमार्फत रोजगार सेवक जे मस्टर मजुरांच्या नावे ऑनलाइन करत आहे. ते मजूर कामाला आहेत की नाही.की स्वतः:च्या मर्जीतील लोकांच्या नावे मस्टर भरून ऑनलाईन करण्यात येत आहेत, याची चौकशी होणे गरजेचे आहे. मंजूर असलेल्या यादीतील घरकुल धारक ज्या लाभार्थ्यांच्या खात्यात पहिला टप्पा म्हणून १५००० हजार रुपये टाकण्यात आले आहे त्यांच्या घराची व बांधकामाची पाहणी करण्यात यावी व जेणेकरून ज्या लोकांचे घर पक्के बांधलेले आहेत आणि यादीमध्ये त्या लोकांचा सुद्धा नावांचा समावेश आहे, अशा घरकुल लाभार्थ्यांची चौकशी करून दुसरा टप्पा थांबवण्यात यावा व जो शासनामार्फत पहिला टप्पा म्हणून १५००० हजार रुपये खात्यात टाकण्यात आला आहे, त्याची तत्काळ वसुली करण्यात यावी व ज्या घरकुल धारक लाभार्थ्यांनी पहिला टप्पा खात्यात जमा होऊन अजूनही बांधकाम सुरू करण्यात आले नाही त्यांना बांधकाम सुरू करण्याबाबत नोटिसेस देऊन बांधकाम सुरू करण्याच्या सूचना द्याव्या व सुरू असलेला भ्रष्टाचार थांबून या भ्रष्टाचारास कारणीभूत असलेले अधिकारी,कर्मचारी,रोजगार सेवक,घरकुल धारक लाभार्थी,यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई करण्यात यावी.याबाबत दिनांक ११/४/२०२५ रोजी गट विकास अधिकारी अकोट यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली होती.

सदर तक्रार अर्जाची दखल घेऊन गटविकास अधिकारी अकोट यांनी सरपंच,सचिव,पालक तांत्रिक अधिकारी मग्रारोहयो पंचायत समिती अकोट,ग्रामीण गृहनिर्माण अभियंता पंचायत समिती अकोट,यांना लेखी पत्र देऊन चौकशी करून वस्तुनिष्ठ प्राथमिक अहवाल तात्काळ सादर करावा असे लेखी पत्राद्वारे आदेश दिले आहेत.त्यामुळे खोट्या लाभार्थ्यांच्या विरुध्द चौकशी होऊन कारवाई होणार हे निश्चित झाले आहे.

> ग्राम पंचायत बोर्डी व गट ग्राम पंचायत रामापूर येथील घरकुल योजनेच्या बांधकामाची पाहणी व चौकशीचे करून अहवाल सादर करा याबाबत आदेश दिले आहेत.
>
> **मनोज जाधव**
> मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. अकोला.

> बोर्डी व रामापूर येथील घरकुल योजनेच्या बांधकामाबद्दल लेखी तक्रार प्राप्त झाली आहे.त्याची चौकशीसाठी लेखी पत्र दिले आहे.
>
> **माया वानखडे**
> गटविकास अधिकारी पंचायत समिती, अकोट.

अजिंक्य भारत

आपलं अमरावती

रविवार, दि. ११ मे २०२५

## थोडक्यात

### ११ मे रोजी दर्यापुरात तिरंगा रॅली



**दर्यापूर :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त अमरावती जिल्ह्यातील व दर्यापूर तालुक्यातील सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशान्वये भारतीय सैन्यांचे मनोबल वाढविण्यासाठी रविवार दिनांक ११ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता दर्यापूर शहरातील महात्मा गांधी चौक येथून तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले आहे. तरी वंचित बहुजन आघाडी. महिला आघाडी, युवा आघाडी, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, सम्यक विद्यार्थी आंदोलन, तसेच राजगृहावर प्रेम करणाऱ्या सर्वांनी तसेच सर्व भारतीय बंधू-भगिनींनी सहभागी व्हावे. असे आवाहन संजय चोरपगार जिल्हाप्रमुख वंचित बहुजन आघाडी अमरावती पश्चिम यांनी एका प्रसिद्धी पत्रका द्वारे केले आहे.

### श्री संत परमहंस परशराम महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम



**पिंपळोद :** श्री क्षेत्र जलकुंड झिरा पिंपळोद येथे दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा श्री संत परशराम महाराज जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. महोत्सवाची सुरुवात समाज प्रबोधन पर होणार आहे याकरिता आदर्श सरपंच श्री भास्करराव पेरे पाटील यांचे व्याख्यान झाले आहे तसेच दुसऱ्या दिवशी पिंपळोद भजन मंडळी आणि अंतरगाव भजन मंडळी यांचा भजन संध्या कार्यक्रम आयोजित केला आहे सोमवार दि १२ /०५/ २०२५ ला सकाळी ठीक आठ वाजता अभिषेक व नंतर आठ ते दोन पर्यंत परशराम महाराज महिमा ग्रंथ पारायण आयोजित केलेले आहे, संध्याकाळच्या ह .भ. प .हरीश महाराज पाटील यांचे काल्याचे किर्तन आयोजित केले असून. त्यानंतर पंचकोशीतील भाविक भक्तांकरिता महाप्रसाद आयोजित केला आहे सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या तीन दिवसाच्या महोत्सवात सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन पंचक्रोशीतील विश्वस्त मंडळ जलकुंड जिरा पिंपळोद यांनी केले आहे,

# नांदगाव पेठ येथे पाकिस्तानहून धमकीचा कॉल

## दिल्लीला बॉम्बस्फोटाची धमकी, युवकाच्या सतर्कतेमुळे पोलिस यंत्रणा अलर्टवर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** भारत-पाकिस्तान युद्धसदृश तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अमरावतीतील नांदगावपेठ येथे घडलेल्या घटनेने खळबळ उडवली आहे. १० मे रोजी एक धक्कादायक प्रकार समोर आला, जेव्हा डव हेरिटेज गारमेंट कंपनीत काम करणाऱ्या ओडिशातील युवकाला पाकिस्तानहून (+९२ कोड) धमकीचा व्हॉट्सअॅप कॉल आला. कॉल करणाऱ्याने स्वत:ला पाकिस्तानी सैन्यातील अधिकारी असल्याचे सांगून, दिल्लीतील चार ठिकाणी बॉम्बस्फोट घडविण्याची धमकी दिली.या कॉलमुळे प्रचंड घाबरलेल्या युवकाने तात्काळ नांदगावपेठ पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. संबंधित युवकाचे नाव प्रशांत पंचानन ठाकुर (वय ३०, रा. बलांगी, ओडिशा) असे असून, तो नांदगावपेठ एमआयडीसीतील डव गारमेंट कंपनीत टेलर म्हणून कार्यरत आहे.

सकाळी ११ वाजताच्या सुमारास कामावर असताना प्रशांतला व्हॉट्सअॅपवर आलेल्या कॉलमध्ये समोरच्या व्यक्तीने ''मी पाकिस्तान आर्मीमधून बोलत आहे, आम्ही दिल्लीतील चार ठिकाणी बॉम्बस्फोट घडवणार आहोत'' अशी धमकी दिली. घाबरून गेलेल्या प्रशांतने हा कॉल आपल्या मित्राकडे दिला. त्यांनी दोघांनी मिळून त्या व्यक्तीला उलट प्रत्युत्तर दिले आणि कॉल कट केला. मात्र त्यानंतर त्याच क्रमांकावरून सलग चार मिसकॉल आल्याने प्रशांत अधिकच घाबरला.त्याने तात्काळ ११२ वर संपर्क साधला. आपत्कालीन पथक घटनास्थळी दाखल होऊन त्याला पोलिस ठाण्यात घेऊन गेले. पोलिसांनी कॉलचे रेकॉर्डिंग ऐकून वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. काही वेळातच डीसीपी सागर



विशाल आनंद    नवीनचंद्र रेड्डी

पाटील, एसीपी कैलाश पुंडकर, गुन्हे शाखा प्रमुख पीआय बाबाराव अवचार, सीपी स्पेशल स्कॉड प्रमुख पीआय आसाराम चोरमले यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी पोहोचले.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता अकोला येथील एटीएस, तसेच पोलिस आयुक्तालयातील एटीसी व आयबीच्या अधिकाऱ्यांनीही तपासात सहभाग घेतला. सायबर पोलिसांनी कॉलचा स्त्रोत शोधण्याचे तांत्रिक काम सुरू केले असून, सीपी रेड्डी आणि त्यांच्या टीमने संपूर्ण अहवाल तयार करून तो राज्य गृहमंत्रालय व केंद्रीय गृहमंत्रालयाकडे पाठवला आहे.या प्रकारामुळे अमरावती शहर व परिसरात हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. सर्व पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करून त्यांना तात्काळ ड्युटीवर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### अफवांवर विश्वास ठेवू नका : सिपी

पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी नागरिकांना +९२ पासून सुरू होणाऱ्या क्रमांकावरून आलेल्या कॉलला प्रतिसाद देऊ नये, तसेच सोशल मीडियावर कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे. अफवा पसरवणाऱ्यांविरोधात सायबर सेलमधील विशेष मॉनिटरिंग टीम तात्काळ कारवाई करेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# विक्रम ज्वेलर्समध्ये चोरी

## एक कोटींच्यावर मुद्देमाल लंपास, तपासासाठी श्वानपथक दाखल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. १० :** बनोसा मार्गावर असलेल्या रमेश महादेवराव लोणकर यांच्या विक्रम ज्वेलर्स मध्ये अज्ञात चोरट्यांनी रात्री चारच्या सुमारास दुकाना पुढील संरक्षक कॅमेऱ्याची तोडफोड करून व मुख्य प्रवेश द्वाराचे लोखंडी टॉमीच्या साह्याने लॉक तोडून ज्वेलर्स मध्ये चोरट्याने प्रवेश केला. प्रतिष्ठानात विक्रीसाठी असलेले सोन्या चांदीचे मौल्यवान दागिने व ५ लाखांची रोक रक्कम लंपास केली आहे. चोरट्यांनी सीसीटीव्हीचा डीव्हीआर सुद्धा लंपास केला आहे. हि घटना गुरुवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास घडली आहे.




दुकान संचालकांच्या अंदाजानुसार सोने अंदाजे ७०० ग्रॅम व चांदी ४० ते ४५ किलो व ५ लाख रोख रक्कम चोरट्यांनी लंपास केली असल्याचा प्राथमीक अंदाज आहे. घटनेच्या वेळी चोरट्याने चारचाकी वाहनाने प्रतिष्ठानासमोर पोहोचत अंगामध्ये जॅकेट हातात लोखंडी सळई व चेहऱ्याला घट्ट बांधलेले असल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले आहे चोरट्यांच्या तपासासाठी अमरावती वरून विशेष पोलीस दल व श्वानपथक घटनास्थळी दाखल झाले असून घटनेचा कसून तपास करीत आहेत. ठसे तज्ञांनी प्रत्येक बारीक सारीक बाबींचे पुरावे पथकाने हस्तगत केले असून पुढील तपास अमरावती व दर्यापूरचे पोलीस करीत आहेत. या धाडसी चोरीच्या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली असून व्यवसायीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच पोलीसांनी रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी होत आहे. वृत्तलिहेस्तोवर गुन्हा दाखल झाला नव्हता.

## जि.प., मनपासह १४ पंचायत समित्या, १२ नगरपंचायतींच्या निवडणुका ऑक्टोबरमध्ये

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** जिल्ह्यात २०२२ पासून जिल्हा परिषद, महापालिका, पंचायत समित्या व नगरपालिका तसेच नगरपंचायतींची मुदत संपली आहे. त्यामुळे ह्या स्थानिक स्वराज्य संस्था गत चार वर्षांपासून निवडणुकांच्या प्रतिक्षेत असताना सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी सुनावणी घेत येत्या चार महिन्यांत निवडणुका लावण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे जिल्ह्यात सप्टेंबर ते ऑक्टोंबर या दरम्यान जिल्हा परिषद, महापालिका, १४ पंचायत समित्या, १० नगरपालिका व २ नगरपंचायतींच्या निवडणुका लागण्याचे संकेत आहे. जिल्हा परिषदेची मुदत २० मार्च २०२२ रोजी संपुष्टात आली. दरम्यान याच वर्षात ११ पंचायत समित्यांची देखील मुदत संपली तर २०२४ मध्ये यात तीन पंचायत समित्यांची भर पडली. त्यामुळे आता जिल्हा परिषदेसह १४ पंचायत समित्यांवर प्रशासक आहे. याशिवाय महापालिका आणि १० नगरपरिषदेवर देखील प्रशासक राज कायम आहे. चार नगरपंचायतींपैकी तिवसा आणि भातकुली येथे पदाधिकारी असल्याने त्या दोन नगरपंचायती वगळता २ नगरपंचायतींमध्ये निवडणुका लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने ४ महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिल्याने मे पासूनच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणुकांची लगीणघाई सुरू होणार आहे.१५ मे नंतर आरक्षण आणि प्रभाग रचना कार्यक्रम राबविण्याची शक्यता वर्तविली जात आहे. हा कार्यक्रम ३० जुन पर्यंत चालले. जुलै मध्ये मतदार यादी कार्यक्रम लागला तर तो ऑगस्ट पर्यंत चालेल. त्यामुळे सप्टेंबर किंवा ऑक्टोंबर मध्ये या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लागण्याची शक्यता आहे.

## जुनी पेन्शन मिळवून देण्यासाठी आज कार्यशाळा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** राज्य शिक्षक संघामार्फत आज राज्यातील विनाअनुदानित सेवेत १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ''मुख्य याचिका कर्ते प्रदीप महल्ले मार्गदर्शन करणार या घोषवाक्याने कार्यशाळेचा प्रारंभ झाला. या कार्यशाळेला जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष दिलीप कडू सरचिटणीस भोजराज काळे यांनी केले आहे. २००५ नंतर शासनाने नवीन अंशदायी पेन्शन योजना लागू केली, परंतु १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त होऊनही ज्यांची सेवा अनुदानित शाळांमध्ये होती, आणि ज्यांची सेवाही २००५ पूर्वीची होती, अशा कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू केली गेली नाही. ही बाब अन्यायकारक ठरली असल्याची भूमिका राज्य शिक्षक संघाने घेतली आहे. या संदर्भात महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवा नियमावलीतील १९७७ कलम ४ (५) राज्य शासनास खाजगी शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या किमान अर्हता, कर्तव्य, वेतन व भत्ते सेवानिवृत्तीनंतरचे लाभ आरक्षनाची टक्केवारी या संदर्भात नियम करण्याचा अधिकार आहे. अनुदानित शाळातील कर्मचाऱ्यांनी यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी याबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यामध्ये मुळ याचिका तर्फे अॅड. प्रदीप महल्ले असून सर्व संबंधितांना याबाबतची वस्तूस्थिती माहित व्हावी या करिता राज्य शिक्षक संघाच्या वतीने आरसीएन सभागृह राजापेठ पोलिस ठाण्याच्या मागे ११ मे रोजी सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेत प्रदीप महल्ले मार्गदर्शन करणार आहेत. सर्व संबंधितांनी सदर कार्यशाळेला उपस्थित राहावे असे आवाहन माजी सिनेट सदस्य तथा राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष दिलीप कडू, सरचिटणीस भोजराज काळे यांनी केले आहे.



**अमरावती :** सतीश प्रधान व सौ. संगीता सतीश प्रधान यांनी थायलँड येथून बोलविलेली भगवान गौतम बुद्धाची ४० किलो पितळीच्या धातूची साडेतीन फूटाची मूर्ती दिवंगत मायावती वासुदेवराव प्रधान स्मृती प्रित्यर्थ जेतवन बुद्ध विहार आष्टी येथे दान केली.

## शस्त्र घेऊन रिल बनविणाऱ्यांना अटक



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** गेल्या काही दिवसांपासून शस्त्रासह रिल बनविणारे सोशल मिडियावर प्रसारित करीत होते. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तिघांनी शनिवारी ऑक्सिजन पार्कजवळील गजानन विद्यालयासमोर शस्त्रासह रिल बनविताना ताब्यात घेतले. निहार सुनील डोंगरे, २६, रा. प्रभूत्व मंडल फ्रेजरपुरा, संकेत सुभाष एरकुडे, १९ रा. सिद्धार्थ मंडल, फ्रेजरपुरा,

प्रतिक गणेश माकोडे, २० रा. भगतसिंग चौक, फ्रेजरपुरा अशी आरोपीचे नावे आहे. तीन्ही आरोपी हे हातात चाकू तलवार घेऊन दहशत निर्माण करीत होते व रिल बनवून सोशल मिडियावर विवाद निर्माण करीत होते. ही बाब गुन्हे शाखेच्या पोलिसांच्या लक्षात येताच शस्त्रासह रिल बनवित असताना तिघांना ताब्यात घेतले. आरोपीविरुद्ध ४/२५ आर्म ॲक्ट कारवाई केली आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार, पोलिस निरीक्षक संजय वानखडे, बबलू येवतीकर, दीपक सुंदरकर, गजानन ढवले, मनोज ठोसर, संदीप खंडारे, मंगेश शिंदे, संग्रोम भोजने, चेतन कराळे, राजिक रायलीवाले, योगेश पवार, तुषार वागपांजर, चेतन शर्मा यांनी केली आहे.

# डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेवरील निर्बंध शिथिल

## ८ वर्षानंतर बँकेला मिळाला नफा, आरबीआयने घेतली दखल, नरेशचंद्र पाटील यांच्या नेतृत्वातील संचालक मंडळाची कामगिरी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** वर्धा येथील शाखेत झालेल्या घोटाळ्यानंतर तोट्यात गेलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेवर रिझर्व बँकेने निर्बंध घातले होते. दोन वर्षापूर्वी एकहाती सत्ता मिळालेल्या नरेशचंद्र पाटील यांच्या नेतृत्वातील संचालक मंडळाने भरीव कामगिरी करत ८ वर्षानंतर बँकेला नफा मिळवून दिला आहे. यासोबतच रिझर्व बँकेने बँकेवर घातलेले निर्बंध शिथिल करण्यात देखील संचालक मंडळाला यश मिळाले आहे. मोठ्या प्रमाणावर तोटा झाल्यानंतर डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेवर रिझर्व बँकेने अनेक निर्बंध घातले होते. यामध्ये वैयक्तिक कर्ज न देणे, ५० हजारावरील भांडवली खर्च न करणे, नवीन शाखा न उघडणे अशा अनेक महत्त्वपूर्ण बाबी समाविष्ट होत्या. त्यामुळे बँकेच्या विकासावर देखील मोठा परिणाम होत होता. परंतु नरेशचंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विराजमान झालेल्या संचालक मंडळाने गेल्या २ वर्षात बँकेचा अनेक बाबीवर होणारा खर्च कमी करून, कर्जाची वसुली करून तसेच बँकेच्या कारभारात सुधारणा करून बँकेला नफा मिळवून दिला आहे. ८ वर्षापासून तोट्यात असलेल्या बँकेला केवळ २ वर्षात नफ्यात आणून आरबिआयकडून घातलेले निर्बंध देखील शिथिल करून घेतले आहेत. मार्च २०२५ मध्ये बँकेचा नेट एनपीए देखील शून्यावर आला असून बँकेला ६.३९ कोटींचा नफा मागील आर्थिक वर्षात झाला आहे. विशेष म्हणजे बँकेवर निर्बंध असताना देखील संचालक मंडळाने अंजनगाव सुर्जी येथील शाखा, यवतमाळ येथील शाखा आणि व्हिमव्ही रोडवरील शाखा कमी भाडे असलेल्या तसेच जास्त व्यवसाय होणाऱ्या महत्वाच्या जागी स्थानांतरीत केल्या आहेत. यासाठी रिझर्व बँकेकडून विशेष




परवानगी मिळविण्यात देखील संचालक मंडळाची कामगिरी महत्वाची ठरली. संचालक मंडळाने घेतलेल्या प्रत्येक निर्णयात बँकेचे सर्व कामाचाऱ्यांनी देखील मागील २ वर्षात बँकेत जोमाने काम करून बँकेला पुन्हा एकदा नफ्याकडे नेण्यासाठी महत्वाचे योगदान दिले आहे. बँकेने केलेल्या कामगिरीत बँकेचे मार्गदर्शक तथा मॅनेजमेंट बोर्डाचे अध्यक्ष तथा बँकेचे माजी अध्यक्ष आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. बँकेने केलेल्या या महत्त्वपूर्ण कामगिरी बद्दल बँकेचे अध्यक्ष नरेशचंद्र पाटील, उपाध्यक्ष प्रशांत डवरे, संचालक राजेंद्र महल्ले, सुगंध बंड, अभय ढोबळे, डॉ.सुरेंद्र गावंडे, ओंकार बंड, अमोल बारब्दे, भैय्यासाहेब मेटकर, दिलीप देशमुख, यशपाल वरठे, जयंत वडते, अक्षय इंगोले, डॉ. अंजली ठाकरे, डॉ.पूनम चौधरी, मो. जफर कुरेशी, अॅड. अरुण ठाकरे या सर्व संचालकांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

### संघर्ष संपला, आता विकासाकडे वाटचाल



गेल्या ८ वर्षापासून बँक तोट्यात असल्याने बँकेला कोणताही नवा निर्णय घेता आला नाही. निर्बंध शिथिल करण्यासाठी मागील दोन वर्षात आमचे संपूर्ण संचालक मंडळ आणि कर्मचारी जोमाने काम करत होते. त्याचे श्रेय म्हणून मार्च २०२४ आणि २०२५ मध्ये बँक अखेर नफ्यात आणून बँकेचा नेट एनपीए आम्ही शून्य करून दाखवला आहे. अखेर बँकेचा हा संघर्ष आता संपला असून इथून पुढे बँकेची वाटचाल ही विकासाकडे असणार आहे. डिजिटल बँकिंगसोबतच नव्या कर्ज योजना आणि ग्राहकांना चांगली सेवा देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी बँक आता सक्षम झाली आहे.

**नरेशचंद्र पाटील**
अध्यक्ष, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को ऑपरेटिव्ह बँक अमरावती

### बँकेची वाटचाल विकासाकडे कायम



डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को ऑपरेटिव्ह बँक ही विदर्भातील मोठी आणि बहुजनांच्या कल्याणाचे काम करणारी संस्था आहे. बँकेला आलेला तोटा भरून काढत बँक नफ्यात आणण्याचे शिवधनुष्य या संचालक मंडळाने पेलून ते यशस्वी करून. दाखविले आहे. या कामगिरीमुळे बँकेचे सर्व ठेवीदार, ग्राहक आणि कर्मचारी या सर्वांचे हित जोपासण्याचे काम आम्ही केले आहे. बँकेची विकासाची ही वाटचाल आम्ही अशीच निरंतर सुरू ठेवू

**प्रशांत डवरे**
उपाध्यक्ष, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को ऑपरेटिव्ह बँक अमरावती

## थोडक्यात

### पूर्णानगर सेवा सहकारी सोसायटीची आज निवडणूक




**पूर्णानगर :** स्थानिक पूर्णानगर सेवा सहकारी संस्था मर्यादीत ता. भातकुली जि. अमरावती (र. न. १२९४) ची संचालक मंडळाची निवडणूक रविवार, ११ मे रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत होणार असून या प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या निवडणुकी कडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे. या निवडणुकीत शेतकरी पॅनलने एकूण १३ उमेदवार उभे केले असून यात ५ अविरोध निवडून आले आहेत. यात गंगुबाई तु. माकोडे, माधुरी वि. इंगोले, माणिकराव वाघमारे, रोहित ह. पाटेकर व सुबोध ह. खेकडे हे उमेदवार अविरोध निवडून आल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. या सोसायटीत जुन्या मतदार यादी नुसार एकूण ४७९ सभासदांची नोंद दर्शविली असली तरी प्रत्येकक्षात यात भरपूर सभासद कमी असल्याची श्यक्यता आहे.

### पुंडलिकबाबा नगरवासियांचे निवेदन




**अमरावती :** मनसे महिला जिल्हाअध्यक्ष शरयू स्वप्निल पाजणकर यांच्या नेतृत्वात आज कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यवस्थापन विभाग अमरावती यांना एकविरा विद्युत कॉलनी नवोदयविद्यालय नवसारी प्रकाश नगर रामचंद्र नगर पुंडलिकबाबा नगर या परिसरातील नळाद्वारे पाणीपुरवठाच्या वेळा बदल व पाणी गुणवत्ते बाबत तत्काळ उपाय योजना करण्याबाबत निवेदन देण्यात आले त्या वेळी महिला सेना जिल्हा अध्यक्षा शरयू स्वप्निल पाजणकर तसेच शहर अध्यक्ष धिरज तायडे, स्वप्निल पाजणकर, विजय सोनार, पल्लवी लकडे, वैशाली डाखोडे, लता देशमुख, छाया दिंडेकर, किरण धानोरकर, सुनीता कडू, दर्शना आवारे, नीता कांबे, प्रियांका गोंगे तसेच परिसरातील सर्व कॉलनीवासियांसह परिसरातील नागरिक सुद्धा उपस्थित होते.

### वैष्णवी काकडने मिळविला गावातून प्रथम डॉक्टर होण्याचा मान



**अंजनगावसूर्जी :** अंजनगाव तालुक्यातील शेलगाव येथील वैश्ष्णवी शरद काकड या विद्यार्थीनीने अत्यंत प्रतीकुल परीस्थीत आपले डॉक्टर बनण्याचे स्वप्न नुकतेच पूर्ण केले.शेलगाव सारख्या छोटाश्या गावखेड्यात राहुन डाक्टर बनन्याचे धैय्याने पछाडलेल्या वैष्णवीने मुंबई येथील राजीव गांधी मेडीकल कालेज येथुन एमबीबीस करत डाक्टर पदवी संपादन करीत शेलगाव गावातुन प्रथम डाक्टर होण्याचे निमीत्य शेलगाव ग्रामस्थांनी वैष्णवीचा परीवारासह सन्मान केला. मराठा सेवा संघ,जिजाऊ ब्रीगेड, संभाजी ब्रीगेडचे जडनघडणीत घडलेल्या व मा साहेब जिजाऊ, शिवराय, ज्योतीबा व सावीत्रीआई फुले,छ.शाहु, डा.बाबासाहेब आंबेडकर विचारांचे प्रभाव असलेल्या वैष्णवीने पुढे मेडीसीन मधे एमडी करण्याचे निश्चय केला असुन,तिने आपले यशाचे श्रेय मार्गदर्शक माजी वैद्यकिय अधीकारी डा.राजेंद्र कोकाटे व डा.विजया कोकाटे यांचे सह वडिल शरद काकड,आई कविता काकड, काका अरुण काकड ,आजी चंद्रकला व सर्व शिक्षकांना दिले आहे. शेलगाव सारख्या छोट्याश्या खेडेगावातून आलेल्या या मुलींने आपले डॉक्टर बनण्याचे स्वप्न साकार केल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. डॉक्टर झाल्याबद्दल शेलगाव ग्रामपंचायतचे सरपंच मच्छींद्र वाघ, सचीव प्रविन गिंहे, मदन गोंडाने, रमेश सावळे, विश्वासराव काकड, रतन राउत, प्रविन हाडोळे, ओमप्रकाश काकड, उमेश काकड आदींनी सन्मान सोहळ्या निमीत्य वैष्णवीचे अभिनंदन केले.

### धामणगावात श्री महाराणा प्रताप जयंती



**धामणगाव रेल्वे :** श्री महाराणा प्रताप यांच्या कार्याला आणि त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांना उजाळा देण्याचा उद्देश मिरवणुकीद्वारे शहरात साधला गेला. तसेच, त्यांच्या शौर्याची आणि देशभक्तीची आठवण यानिमित्ताने करण्यात आली. श्री महाराणा प्रताप जयंती निमित्ताने शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.येथील श्री महाराणा प्रताप चौकात प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात महाराणा प्रताप जयंती मिरवणूक उत्साहात संपन्न झाली.श्री महाराणा प्रताप यांच्या जयजयकाराने यावेळी शहर दुमदुमले होते.यावेळी हिंगणगाव येथील सरपंच दुर्गाबक्षसिह उर्फ बच्चू ठाकूर, गोकुल ठाकूर, नारायण ठाकूर, दिलीप चव्हाण, देवेंद्र ठाकूर,दिनेश खंडारकर,बाबा ठाकूर, कुंदन ठाकूर,ऋषभ ठाकूर, महेंद्र ठाकूर,नितीन मोरे, संजय भैसे,नितीन कदम, विशाल भैसे,सागर ठाकूर, ऋषी मोरे,श्याम खंडार, अजय यादव,प्रसाद सोलंकी,हरिण चव्हाण, नीरज ठाकूर,सचिन ठाकूर, मनोज चव्हाण,अक्षय ठाकूर,देवेंद्र भैसे,सूरज ठाकूर,रुपेश भीवरीकर, राजू ठाकूर,बंटी ठाकूर, राणा जाधव,सरोज तवर काजल ठाकूर,भावना ठाकूर,कीर्ती कदम,अर्चना ठाकूर,शितल ठाकूर व सर्व समाज बांधव उपस्थित होते.तसेच इतरही नागरिक उपस्थित होते.

## नवरीची घोड्यावरून वरात काढत दिला 'बेटी सन्मान'चा संदेश

### नवरीने हातात राष्ट्रध्वज घेऊन काढली वाजत-गाजत वरात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देऊन भारताने पाकिस्तानचे नापक मनसुबे उधळून लावणाऱ्या लेफ्टनंट कर्नल सोफिया कुरेशी विंग कमांडर योमिका सिंग या दोन्ही विरांगणांचे देशात कौतुक होत आहे अशातच आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या यशोदा नगर नंबर एक येथील भास्करराव सोनवणे या आदर्श शिक्षकांच्या कुटुंबातील नवरीने हातात राष्ट्रध्वज घेऊन शुक्रवार(ता.९) रोजी घोड्यावर बसून मोठ्या दिमाखात वाजत गाजत वरात काढण्यात आली. देश सन्मानासह स्त्री पुरुष समानता तसेच बेटी सन्मान चा वरातीतून सोनवणे कुटुंबांनी संदेश दिला आहे.

विवाह सोहळा भव्यदिव्य करण्याचा प्रत्येकाचे स्वप्न असते. तसेच विवाह सोहळा जरा हटके व आठवणीत कसा राहिल, यासाठी विविध शक्कल लढवली जाते. विवाह म्हटले की वरात आलीच. पण ही वरात नवरदेवाची असते. सहसा नवरीची वरात काढण्यात येत नाही. पण याला अमरावती शहरातील यशोदा नगर नंबर एक अपवाद ठरले आहे. यशोदा नंबर एक मध्ये नवरीची वाजत-गाजत घोड्यावरून वरात काढण्यात आली. यामधून स्त्री-पुरूष समानता, बेटी बचाव बेटी पढवचा संदेश देण्यात आला. त्यामुळे या विवाहाची चर्चा सगळीकडे होत आहे.

शहरातील यशोदा नगर नंबर एक नगरातील आदर्श शिक्षक भास्करराव सोनोने यांच्या कुटंबातील नवरीची घोड्यावरून मिरवणूक काढली. शहरातील प्रमुख रस्त्यावरून मिरवणूक काढून मुलगा-मुलगी समान, असा संदेश यावेळी देण्यात आला. त्यामुळे सोनोने कुटुंबाचे कौतुक होत आहे. तसेच बेटी बचाव बेटी पढाव या अभियानाला चालना मिळाली आहे.



विवाह सोहळ्याला नवरदेवाची मिरवणूक सगळीकडे काढण्यात येते. मिरवणूक रंगतदार करण्यासाठी घोडा, जीप , पालखी, तुतारी भालेदार, चौपदार याचा सोबत डीजे, आधुनिक तसेच पारंपरिक वाद्यांचा वापर केला जातो. आतिषबाजी केली जाते. पण हा सर्व आटापिटा नवरदेवाच्या मिरवणुकीसाठी असतो. मात्र, नवरीचे मिरवणूक सभागृहात पालखीतून काढण्यात येते. शहरातील यशोदा नगर नंबर एक या नगरात सिद्धार्थ सोनोने कुटुंब राहतात. त्यांचे वडील भास्करराव सोनोने हे शिक्षक होते. त्यांना महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांची नात व न्यायालयात लिपिक म्हणून सेवानिवृत्त झालेले सिद्धार्थ सोनोने यांची धाकटी मुलगी कोमल हिचा विवाह चि.क्रांती मनोहर यांच्याशी शनिवार (ता.१०) रोजी सायंकाळी ७.४५ वाजता द मिरा लौन, राजपूत धाब्याच्यामागे, रजनी मंगल कार्यालयासमोर, वलगाव रोड येथे आयोजित केला आहे. या लग्नाच्या पुर्वसंध्येला शुक्रवारी सायंकाळी वधू कोमल सिद्धार्थ सोनोने ची वरात वाजत गाजत काढण्यात आली. सिद्धार्थ भास्करराव सोनोने यांचे घर शहरातील यशोदा नगर नंबर एक या वस्तीत आहे. वधू कोमल यांची मिरवणूक यशोदा नगर नंबर एक, फ्रेझरपुरा सिद्धार्थ क्रीडा मंडळ, संजय गांधी नगर नंबर एक यासह प्रमुख मार्गांनी काढण्यात आली. बुद्ध विहार येथे वरातीची सांगता करण्यात आली. ही वरात शहरांत कुतूहल व कौतुकाचा विषय ठरला आहे, अशा प्रकारची नवरीची मिरवणूक सोनोने परिवाराने दुसऱ्यांदा काढली आहे. सिद्धार्थ सोनोने यांची थोरली मुलगी शितल हिचा विवाह २ फेब्रुवारी २०१८ मध्ये पार पडला त्यावेळी १ फेब्रुवारी २०१८ रोजी वधूची थोरली बहीण शीतल हिचीही वरात घोड्यावरून वाजत गाजत काढण्यात आली होती. वधूचे वडील सिद्धार्थ भास्करराव सोनोने यांना केवळ दोनच मुली आहेत. कोमल ही त्यांची धाकटी मुलगी आहे. यापूर्वी थोरल्या मुलीचीही त्यांनी अशाच प्रकारे घोड्यावरून वरात काढली होती. वधूचे काका राजेश सोनोने हे वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते असून त्यांची ही संकल्पना आहे. देशाप्रती असलेला आदर, फुले, शाहू, आंबेडकर विचारांचा त्यांच्यावर पगडा असल्याने त्यांनी ती प्रत्यक्ष दोन्ही मुलींच्या लग्नाच्या वेळी अमलात आणली आहे.

### बेटी बचाव बेटी पढाव...!

आत्ता पर्यंत नवरदेवाची घोड्यावरून वरात काढण्यात आलेली पाहिली होती. मुलगा व मुलगी आम्ही समान मानतो. यापूर्वीही वधूच्या थोरल्या बहिणीचे अशीच घोड्यावरून वरात काढली होती म्हणूनच धाकट्या मुलीचीही मिरवणूक काढून बेटी बचाव, बेटी पढाव या अभियानाला चालना मिळावी व जुन्या आठवणीला उजाळा मिळावा. यासाठी घोड्यावरून वरात काढण्यात आली, अशी भावना नवरीचे आजोबा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त भास्करराव सोनोने यांनी व्यक्त केली.

## मोखडला दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धेचा तालुकास्तरीय सोहळा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पापळ, दि. १० :** दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धेचा नांदगाव तालुकास्तरीय बक्षीस सोहळा नुकताच जि प शाळा मोखड येथे संपन्न झाला. या शानदार कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कल्पना वानखडे गटशिक्षणाधिकारी प.स. नांदगाव ह्या होत्या तर विलास बाबरे विस्तार अधिकारी शिक्षण, कमलाकर कदम मुख्याध्यापक, हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते तसेच तीलोत्तमा घोडेस्वार सरपंच मोखड आणि सुनील सिरभाते सामाजिक कार्यकर्ते बक्षीस वितरक म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज मंडे, प्रास्ताविक जितेंद्र यावले तर आभार प्रदर्शन प्रशांत भगेवार यांनी पार पाडले. अमरावती जील्ह्यामध्ये इतर तालुक्याचे तुलनेत नांदगाव मध्ये सर्वाधिक बक्षीस शिक्षकांनी मिळविल्याचे कल्पणाताई वानखेडे यांनी आपल्या मनोगत मध्ये सांगितले. व्हिडिओ निर्मिती स्पर्धे मधून खूप काही शिकायला मिळाले असे असे सुरज मंडे यांनी आपल्या मनोगतामधे व्यक्त केले. याप्रसंगी विष्णू आडे विजयी स्पर्धकांचे वतीने आपले मनोगत व्यक्त केले.



सूरज मंडे यांना ६ वी ते ८ वी सामाजिक शास्त्र प्रथम व द्वितीय, गट ९ वी ते १० वी सामाजिक शास्त्र मध्ये प्रथम आणि गट ३ री व ५ वी भाषा मध्ये द्वितीय क्रमांक असे एकूण चार बक्षीस मिळाले. विकास वानखडे गट ३ री व ५ वी भाषा मध्ये प्रथम, गट १ ली व २ री गणित मध्ये द्वितीय, आणि भाषा मध्ये द्वीतीय क्रमांक असे एकूण तीन बक्षिस मिळाले. छाया पोटेकर गट ६ वी ते ८ वी भाषा मध्ये प्रथम आणि गणित मध्ये प्रथम असे दोन बक्षीस मिळाले. संगीता सुरज मंडे द्वितीय क्रमांक असे दोन बक्षीस मिळाले. मेघना काळे गट ६ वी ते ८ वी विज्ञान मध्ये द्वितीय तर गट ३ री व ५ वी गणित मध्ये द्वितीय क्रमांक असे दोन बक्षीस मिळाले. पांडुरंग महादेवराव भगेवार गट १ ली व २ री भाषा मध्ये प्रथम क्रमांक संगिता किसनराव सोळंके यांना गट ३ री व ५ वी गणित मध्ये प्रथम क्रमांक, विष्णुदास नामदेवराव आडे गट १ ली व २ री इंग्रजी विषयामध्ये प्रथम क्रमांक, जगदिश वासुदेवराव माहुलकर यांना गट ६ वी ते ८ वी विज्ञान मध्ये प्रथम क्रमांक, किशोर खोब्रागडे यांना गट ६ वी ते ८ वी विज्ञान मध्ये तृतीय क्रमांक, अल्का वर्धे गट १ ली व २ री भाषा मध्ये द्वितीय क्रमांक, ज्योती वैद्य गट ६ वी ते ८ वी इंग्रजी मध्ये प्रथम क्रमांक, फकीर रज्जाक शेख यांना गट १ ली व २ री भाषा मध्ये तृतीय क्रमांक चे बक्षीस मिळाले. खाजगी संस्थेचे अरविंद राठोड यांना गट ९ वी ते १० वी इंग्रजी मध्ये प्रथम क्रमांक तर शशिकांत भास्कर राठोड यांना गट ६ वी ते ८ वी गणित मध्ये बक्षिस मीळाले. या पुरस्कार वितरण सोहळ्याकरिता सूरज मंडे, अंकुश गावंडे, विकास वानखडे, पी.एम.भगेवार, किशोर खोब्रागडे, विष्णू आडे, छाया पोटेकर, संगीता सुरज मंडे, अल्का वर्धे, मेघना काळे, संगिता सोळंके, जगदिश माहुलकर, ज्योती वैद्य, अरविंद राठोड, शशिकांत राठोड, कमलाकर कदम, जितेंद्र यावले, राजेंद्र देशमुख, धनाजी चव्हाण, किशोर गणवीर, स्वाती पोकळे,वैशाली दहिकर शेख फकीर अजय गावंडे यांचेसह, बहुसंख्य शिक्षक उपस्थित होते.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षिस वितरण



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मोर्शी, दि. १० :** मोर्शी येथून जवळच असलेल्या सातपुडा पर्वताच्या कुशीत वसलेल्या श्रीक्षेत्र पाळा येथील सातपुडा माध्यमिक विद्यालय येथे शैक्षणिक सत्र २०२४ ते २०२५ मधील इयत्ता पाचवी ते नववीच्या गुणवंत विद्यार्थ्यांकरिता बक्षीस वितरण व गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यानिमित्ताने माजी विद्यार्थी यांचा सुद्धा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सातपुडा वेल्फेअर सोसायटी सालबर्डीचे अध्यक्ष आनंद घोंगडे यांनी भूषविले यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सातपुडा विद्यालयाचे मुख्याध्यापक दिनेश घोंगडे,सातपुडा विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक फरतोडे, पत्रकार नरेंद्र सोनागोते, माजी विद्यार्थी प्रतीक राऊत, प्रवीण धोटे, पोलीस पाटील सागर साठे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन भागवत चव्हाण यांनी प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक दिनेश घोंगडे यांनी तर आभार प्रदर्शन अशोक भेंडे यांनी केले. या कार्यक्रमाला पाल्य गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पत्रकारांनी घेतले कृत्रिम बुध्दिमत्तेचे धडे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :**एमकेसील व अमरावती श्रमिक पत्रकार संघाच्यावतीने बुधवारी सकाळी आयोजित कार्यशाळेत शहरातल्या पत्रकारांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचे धडे घेतले. या स्वरूपाची कार्यशाळा दर तीन महिन्याने नव्याने येणाऱ्या माहितीसह घेण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. पत्रकारितेसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) उपयोगिता या विषयावर ही दोन तासांची निःशुल्क कार्यशाळा शेगाव नाका चौकातील मुराई मार्केटमध्ये असलेल्या नॅसकॉम कॉम्प्युटर्समध्ये घेण्यात आली. सर्वप्रथम माँ रसस्वती पूजन एमकेसीएलचें विभागीय समन्वयक देवेंद्र पाथरे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे, नॅसकॉमचे संचालक य जयेश मालविय, जयंत लोही, निकेश सोनी यांच्याहस्ते करण्यात आले. पत्रकार संघाचे इल उपाध्यक्ष अमोल इंगोले, सचिव रवींद्र लाखोडे, सहसचिव प्रदीप भाकरे, कृष्णा लोखंडे यांनी कृतज्ञता म्हणून एमकेसीएल व नॅसकॉमच्या अधिकाऱ्यांचा सत्कार केला.

## धामणगावात तीळ खरेदीचा शुभारंभ, नवीन तिळाला ९ हजार १५१ रूपये भाव

अजिंक्य भारत । अरुण डोंगरदिवे

**धामणगाव रेल्वे, दि. १० :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शुक्रवारी (ता.९) नवीन तीळ खरेदी शुभारंभ करण्यात आला या शुभारंभ प्रसंगी नवीन तिळाला ९ हजार १५१ रुपये भाव मिळाला. बाजार समितीमार्फत तीळ खरेदी सुरू झाल्याने उत्पादकांना दिलासा मिळालेला आहे. ही बाब लक्षात घेता बाजार समितीच्या सभापती कविता श्रीकांत गावंडे यांनी धामणगाव बाजार समितीमध्ये मागील वर्षीपासून तीळ खरेदी सुरू केल्याने याप्रसंगी आडते सुरेंद्र



जयस्वाल यांच्या अडत्यामध्ये तालुक्यातील शेतकरी सय्यद युसूफ या शेतकऱ्याच्या शेतमालाला ९ हजार १५१ रुपये राज ट्रेडर्स यांच्या खरेदीमध्ये भाव मिळाला तसेच अजय राऊत यांच्या तीळाला ८ हजार ८९५ भाव मिळाला.

देवगाव येथील शेतकरी दिनेश कोयते यांच्या तिळाला ९ हजार १०० रुपये भाव मिळाला. सर्वप्रथम या शुभारंभ प्रसंगी तीळ विक्री करिता आणणाऱ्या शेतकरी बंधूचा सभापती कविता गावंडे, उपसभापती संगीता गाडे संचालक संचालक डॉ. प्रमोद रोंघे विलास भिल, राधेश्याम चांडक, गिरीश भूतडा, विपीन ठाकरे यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाला खरेदीदार आबु अग्रवाल,संजय अग्रवाल, प्रदीप कुचेरिया, मनीष भट्टड, मनीष केला,

आयुष गंगन, शैलेश वसानी, सचिन राठी, आडते असोसिएनचे अध्यक्ष सुरेंद्र जयस्वाल, अशोक कांकरिया,राजेंद्र पनपालिया, राजेश गंगन पवन लाहोटी, देवराव कापसे,सचिन मुंदडा, संतोष लाहोटी, प्रदीप राठी जगदीश रॉय,अमोल रॉय, नंदलाल राठी, संतोष लाहोटी, मुकेश पनपालिया, बाजार समितीचे प्रभारी सचिव दिनेश गोमासे, यार्ड प्रमुख संजय तुपसुंदरे, राजेश तायडे, नितीन मांडवगणे व आदी उपस्थित होते.

## डी स्वामिनी महिला युनिटीचा 'भरारी' सोहळा

### नवी कार्यकारिणी घोषित; सांस्कृतिक कार्यक्रमांनी वाढविली शोभा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती दि. १० :** महिला सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या डि स्वामिनी महिला युनिटी या संस्थेचा स्नेहमिलन आणि पदग्रहण सोहळा 'संसिद्धी हॉल', एमबीडीएस हॉस्पिटल नवसारी येथे मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडला. 'उमंग'सहित नव्या स्वप्नांची 'भरारी' घेण्याच्या निर्धाराने पार पडलेल्या या कार्यक्रमाने स्त्रीशक्तीचा आत्मविश्वास अधिक दृढ केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वर्षा देशमुख (प्राचार्य, पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय)




होत्या, तर उद्घाटक म्हणून मुंबईतील प्रसिद्ध उद्योजिका अंजली मिलिंद देशमुख यांची उपस्थिती लाभली. प्रमुख अतिथी म्हणून माजी राज्यमंत्री वसुधा देशमुख, तसेच विशेष अतिथी म्हणून राजश्री देशमुख (अध्यक्ष, देशमुख महिला मंडळ), रेखा देशमुख (लेखिका, कवयित्री) व रश्मी देशमुख (अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग) या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. स्वरा देशमुख हिने गणेश वंदना सादर केली. यानंतर जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.कल्पना नितीन देशमुख यांनी प्रास्ताविक करत संस्थेच्या वर्षभरातील उपक्रमांचा आढावा घेतला. अहवाल वाचन शितल अनिल देशमुख यांनी केले. उद्घाटनपर भाषणात अंजली देशमुख यांनी सामाजिक भान जपत सेवाभावी वृत्तीने कार्य करण्याचा संदेश दिला. वसुधा देशमुख यांनी महिलांनी आपले अंतर्गत गुण ओळखून समाजात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करावी, असे सांगितले.

डॉ. वर्षा देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणात डि स्वामिनीच्या नव्या वेबसाईटचे उद्घाटन केले आणि महिलांनी आर्थिक स्वावलंबनाबरोबरच समानतेचा मार्ग अवलंबावा असे प्रतिपादन केले. मावळत्या अध्यक्ष कल्पना नितीन देशमुख यांनी नव्या अध्यक्षांचे पुष्पवृष्टीने स्वागत करत पदभार सुपूर्त केला. प्रीती दिलीप देशमुख यांनी आगामी वर्षात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची रूपरेषा मांडली. दुसऱ्या सत्रात पारंपरिक व समकालीन सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. महिलांचा भरभरून सहभाग व सादरीकरणाने उपस्थितांचे मन जिंकले. याप्रसंगी डि स्वामिनीच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. या कार्यक्रमाला डि स्वामिनीच्या कोअर कमिटी सदस्यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर व मोठ्या संख्येने महिलांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवली. डि स्वामिनीच्या भव्य सोहळ्याने महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय सुरू झाला आहे.

## घटना-घडामोडी



### शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदानावर कृषी साहित्याचे वाटप

**किन्ही जवादे :** येथील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जनवन विकास समितीच्या माध्यमातून गावातील शेतकरी व नागरिकांना शिलाई मशीन, स्प्रे पंप, लोखंडी डवरे व वखर ७५ टक्के अनुदानावर नुकतेच उपलब्ध करून देण्यात आले. तसेच, गावातील युवक-युवतींना चारचाकी वाहन चालविण्याचे मोफत प्रशिक्षण व मालवाहू वाहन चालविण्याचा परवानाही मोफत दिला जाणार आहे. खरीप हंगामापूर्वी कृषी साहित्य मिळाल्याने शेतक?यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती, राळेगावचे संचालक सुधीर पाटील जवादे, नरेश ठाकरे, राजू मोहुर्ले, किशोर गमे, पवन वाढई, मारुती विटाळे, दुर्गा वडते, हरिदास सराटे, मारुती वाढई, पवन खैरकार, आत्माराम गानफाडे, गोवर्धन ढेकणे, महादेव काळे व अनेक शेतकरी उपस्थित होतें.



### मातंग समाजाची येत्या सोमवारी राज्यस्तरीय परिषद

**उमरखेड :** अनुसूचित जाती आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करून मातंग समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्यासाठी आराखडा तयार करावा, या मागणीसाठी सोमवार (दि. १२) मे रोजी उमरखेड येथे सकल मातंग समाजाची राज्यस्तरीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत मंगळवार (दि. २०) मे रोजी मुंबईतील आझाद मैदानावर होणा?या महाआक्रोश मोर्चाची पूर्वतयारी केली जाईल, अशी माहिती माजी आमदार नामदेव ससाने यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२४ च्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी हे आंदोलन होत आहे. गुरुवारी (दि. ८) मे रोजी उपविभागीय अधिका?यांना निवेदन देण्यात आले. या परिषदेस व मुंबईतील मोर्चास मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित राहणार आहेत.



### प्रफुल्ल भोयर यांना जिल्हा युवा पुरस्कार

**यवतमाळ :** येथील स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा कॉलेज ऑफ लॉचा विद्यार्थी प्रफुल गणपत भोयर याला महाराष्ट्र शासनाचा सन २०२३-२४ चा जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र दिनी, गुरुवारी (दि. १) मे २०२५ रोजी समता मैदानावर झालेल्या शासकीय कार्यक्रमात पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते प्रफुल्लला प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. रक्तदान क्षेत्रातील बहुमोल कार्यासाठी त्याला हा बहुमान मिळाला. यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, पोलिस अधीक्षक कुमार चिंता उपस्थित होते. प्रफुल्लने निस्वार्थ भावनेने रक्तदान जनजागृती चळवळ उभी करून शेकडो रक्तदाते तयार केले आहेत. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



### दिव्या भलगट यांचा श्री भगवती दीक्षा सन्मान महोत्सव

**यवतमाळ :** वाढती हिंसा व पर्यावरणाचा ?हास रोखण्यासाठी भगवान महावीरांचे अहिंसा, सत्य व आंतरिक जागृतीचे विचार सर्वधर्मीयांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय सकल जैन समाजाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा यांनी केले. ते मंगळवारी (दि. ६) मे २०२५ रोजी लकडगंज येथील केसरिया भवनमध्ये वैराग्यवती दिव्या दिलीप भलगट (कलबुर्गी) यांच्या श्री भगवती दीक्षा सन्मान महोत्सवात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. दिव्या भलगट या ५ जून २०२५ रोजी जोधपूर येथे दीक्षा घेणार आहेत. डॉ. दर्डा यांनी दिव्या भलगट यांच्या त्यागभावाचे कौतुक केले. माजी आमदार कीर्ती गांधी यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते.

### दुचाकी बाजुला केल्यावरून वाद

**आर्णी :** दुचाकी बाजुला केल्यावरून वाद करण्यात आला. याप्रकरणी दुचाकी बाजुला केल्याच्या कारणावरून वाद करून शिविगाळ केली व थापडाबुक्याने मारून जखममी केले तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना ७ मेला घडली. याप्रकरणी ओम गोपिचंद राठोड यांच्या तक्रारीवरून विश्चजीत रामराव राठोड, रामराव नथ्थु राठोड विरूध्द गुन्हा नोंद केला.

# जिल्ह्यात खनिजाची खुलेआम लूट

## खाणमाफियांना अभय: महसूल बुडवून पर्यावरणाचा सौदा, शासकीय पाठबळाने उत्खनन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. १० :** शहराजवळील भारी शेतशिवारात, विनापरवाना खाणपट्ट्यांमधून दररोज हजारो ब्रास दगड, मुरुम, बोल्डरचे अवैध उत्खनन आणि ओव्हरलोड वाहतूक राजरोसपणे सुरू आहे. या गंभीर प्रकारामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असून, शेतजमिनी व पर्यावरणाचीही मोठी हानी होत आहे.

भारी परिसरातील सर्व्हे क्रमांक १८८ मध्ये एका कंपनीने गिट्टी क्रशरच्या आडून हा अवैध व्यवसाय थाटल्याची माहिती आहे. दररोज हजारो ब्रास मुरुम व बोल्डरचे उत्खनन करून ते थेट रेल्वेच्या भरावासाठी नियमबाह्य पद्धतीने पुरवले जात असल्याचा संशय व्यक्त होत आहे. यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमावलीलाही धाब्यावर बसवण्यात आले आहे. धक्कादायक म्हणजे, भरदिवसा जिलेटिनचा वापर करून स्फोट घडवत दगड काढले जात असून, या सर्व प्रकाराला काही शासकीय अधिकाऱ्यांचे पाठबळ असल्याची परिसरात उघड चर्चा आहे. या बेसुमार उत्खननामुळे भारी शिवारातील नैसर्गिक माळरान नष्ट होत असून, शेतीही धोक्यात आली आहे. स्थानिक शेतकऱ्यांनी पिकांच्या नुकसानीबाबत वारंवार तक्रारी करूनही, कथित अर्थपूर्ण संबंधांमुळे खाणकर्म विभागाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. हा संपूर्ण गोरखधंदा 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' या तत्वावर सुरू असून, यात महसूल विभागातील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचाही मोठा वाटा असल्याची चर्चा आहे. खाणकर्म विभागातील अधिकाऱ्यांच्या कथित संगनमताने सुरू असलेल्या या बेछूट उत्खननामुळे यवतमाळ जिल्ह्यातील मौल्यवान खनिज संपत्ती वेगाने नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### ईटीएस मोजणी, केवळ दिखावा

अवैध उत्खननावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि उत्खननाची अचूक मोजणी करण्यासाठी प्रत्येक खाणपट्ट्याची सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ईटीएस (इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन) मोजणी करणे कायद्याने बंधनकारक आहे. परंतु, संबंधित अधिकारी प्रत्यक्ष जागेवर न जाता, केवळ कार्यालयात बसून कागदोपत्री मोजणी दाखवून आर्थिक हितसंबंध जपत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. २०१७ मध्ये नूतनीकरण झालेल्या भारी येथील एका प्रमुख खाणपट्ट्याची अद्याप ईटीएस मोजणी झालेली नाही, हे वास्तव यातील गौडबंगाल स्पष्ट करते.

### तक्रारी थंड बस्त्यात!

भारी येथील गिट्टी क्रशर आणि बेलगाम उत्खननामुळे शेतपिकांचे प्रचंड नुकसान होत असल्याची व्यथा अनेक स्थानिक शेतकऱ्यांनी वेळोवेळी खाणकर्म विभागाकडे मांडली. मात्र, विभागातील काही भ्रष्ट अधिकारी आणि खाण माफियांमधील कथित आर्थिक लागेबांध्यांमुळे या गंभीर तक्रारींकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात असल्याचा संतप्त आरोप शेतकरी करत आहेत. त्यांच्या शेतजमिनी आणि उपजीविकेवर थेट परिणाम होत असूनही, प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. १० :** तालुक्यातील मुळावा येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत महाराष्ट्र दिनानिमित्त विविध उपक्रमांत प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला.

ध्वजवंदनानंतर मुख्याध्यापक डॉ. सय्यद गाझी असर यांच्या हस्ते इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी असेफा हिला शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवल्याबद्दल गौरविण्यात आले. तसेच, खादिम-ए-उम्मत संघटनेच्या सिरत कार्यक्रमातील विजेते जबेरीया, सोफिया, तावीया व उत्तेजनार्थ असद खॉन, अहेपाज यांनाही मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष फयाज अल्ली, ग्रामपंचायत सदस्या फरजाना उपस्थित होते. डॉ. गाझी यांच्यामुळे शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. साकीब अमेर यांनी सूत्रसंचालन केले.

## नि:शुल्क कॅरिअर गायडन्स शिबिराचे आयोजन

### महेश नवमीनिमित्त आयोजन; भावी शिक्षणाची दिशा होणार निश्चित

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. १० :** बारावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, पुढील शिक्षण क्षेत्राविषयी विद्यार्थी व पालकांच्या मनातील यक्ष प्रश्नांची उकल करण्यासाठी माहेश्वरी मंडळ यवतमाळने नि:शुल्क कॅरिअर गायडन्स सत्राचे आयोजन केले आहे. हे सत्र रविवारी (दि. ११) सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत स्थानिक महेश भवनात होणार आहे.

सद्यस्थितीत शिक्षण हा विद्यार्थी व पालकांसाठी कळीचा मुद्दा बनला आहे. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर भावी जीवनात स्थिरावण्यासाठी कोणते शिक्षण क्षेत्र निवडावे, प्रवेश कसा घ्यावा, कोणते महाविद्यालय उत्तम राहील, यांसारख्या प्रश्नांचे समाधान या सत्रातून देण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे. प्राप्त गुण व आवडीनुसार शिक्षण क्षेत्र निवडणे, त्यातील व्यापार, व्यवसाय व नोकरीच्या संधी, तसेच शिक्षण आनंददायी करणारे महाविद्यालय कसे निवडावे, यावर तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. सध्या अनेक नवीन शिक्षण क्षेत्रे उपलब्ध झाली असून, त्यांची माहितीही विद्यार्थी व पालकांना दिली जाणार आहे. हे या सत्राचे प्रमुख ध्येय आहे. इतकेच नव्हे तर, बारावीनंतर शिक्षण क्षेत्र निश्चित केल्यावर प्रवेश अर्ज कसा भरावा, आवश्यक कागदपत्रे कोणती, प्रवेश फे?यांमध्ये कसे सहभागी व्हावे आणि महाविद्यालयांची प्राथमिकता कशी ठरवावी, यावरही सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. माहेश्वरी मंडळातर्फे महेश नवमीनिमित्त आयोजित या सुवर्णसंधीचा लाभ ११ वी व १२ वी तील विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी आपल्या परिचितांसमवेत आवर्जून घ्यावा, असे आवाहन प्रकल्प प्रमुख संदीप सोनी व रितेश चांडक यांनी केले आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## बाजार समितीतील दीड कोटींचा सेस थकीत

**नेर, दि. १० :** जिल्ह्यात तिसरा क्रमांक प्राप्त करणा?या नेर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील व्यापा?यांकडे खरेदी-विक्रीवरील तब्बल दीड कोटी रुपयांचा सेस थकीत आहे. ही रक्कम वसूल करण्यासाठी बाजार समितीचे संचालक गोपाल चव्हाण यांच्यासह सहा संचालकांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे धाव घेतली आहे. सन २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांतील हा सेस व सुपरव्हिजन फी वसुलीबाबत वारंवार मागणी करूनही बाजार समिती प्रशासनाने लक्ष दिले नसल्याचा आरोप संचालकांनी केला आहे. सेस वसूल झाल्यास शेतक?यांना अधिक सुविधा देता येतील, मात्र सध्या मालाच्या नुकसानीमुळे शेतकरी त्रस्त असल्याचे सांगत, चौकशीची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## आई आमुची सावली

*आई पहिला संस्कार,*
*आई पहिला उच्चार,*
*घराचे मांगल्य, चेतनेचे सूर,*
*आई, आम्हा भावंडांचा*
*तुची आहे आधार!*

मातृत्त्वदिनी कुशीत घेणाऱ्या मातृभूमिला आणि जन्म देणाऱ्या मातीला सर्वप्रथम शतशः नमन... खरं ना तसं आईबद्दल आयुष्यात आपण कधी व्यक्तच होत नाही आणि तिला तशी काही आपल्याकडून अपेक्षाही नसते. परंतु जगात सर्वांत सुंदर आणि नि:स्वार्थी जर कोणतं नात असेल ते म्हणजे आई आणि मुलांचं... पती-पत्नी, असो वा बहीण भाऊ, मित्र-मैत्रिणी प्रत्येक नात्यात कुठे ना कुठे स्वार्थ जुळलेला असतो. पण, आईला स्वार्थ असतो तो फक्त बाळाच्या सुखाचा, प्रत्येकच नातं आणि व्यक्तिमत्त्व वेगवेगळं असते आणि असूही शकतं पण जेव्हा ते आई बनतं ना तेव्हा प्रत्येक आईचं वात्सल्य एक सारखच असत... बाळाचे सर्व गुन्हे माफ फक्त तिच्या दरबारातच होतात... तिचं बाळ तिचं विश्व असतं...



म्हणतात ना, 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी...' हे अगदी सत्य आहे. तिची किंमत कुठे होऊच शकत नाही. तिच्यातील आईचा नि:स्वार्थी, प्रेमाचा झरा कधी आटतच नाही. अशीच माझी वात्सल्य मूर्ती माझी आई जी आमच्या घरातील देव्हाऱ्यातील दीपक आहे. जो सदैव आम्हा भावंडांसाठी देवघरात तेवत असतो, तिच्याशिवाय त्या वास्तूला काही किंमत नाही. खरोखर परमेश्वराची प्रचिती म्हणजे आई, प्रत्यक्ष ईश्वराला आपण बघू शकत नाही, पण त्याच्या रूपात आई प्रत्येक क्षणी वावरत असते... अशीच माझी आई... जिच्या पदरी 22 व्या वर्षीच वैधव्य आले... आम्ही तिला तीन मुले, परंतु न डगमगता तिने मायेचे पांघरून आम्हाला घातले. तिच्या पंखाच्या छायेत आम्ही नेहमी सुरक्षित राहिलो. तिने संस्काराची शिदोरीच दान दिली, जे फार अनमोल आहे... परिस्थिती कितीही बिकट असली, प्रवास कितीही कठीण असला तरी तो किती सहजतेने करावा हे तिने तिच्या जीवन प्रवासातून शिकविले... वडील नसताना तिचा आधार म्हणजे ईश्वराचा आशीर्वाद होय... स्वतःचं जगणं विसरून तिने आमच्यात विश्व पाहिले... आज तिचाच प्रवास मी करते आहे. तेव्हा मला तिचं त्याग, समर्पण किती मोठे आहे जे कल्पने पलीकडील असतं.. ते फक्त आईच करू शकते.. खरं ना आईची किंमत काय ते आई झाल्यावरच कळते....

*आई, तू उन्हामधली सावली*
*आई, तू पावसातली छत्री*
*आई, तू थंडीतली शॉल*
*आता यावीत दुःख खुशाल...*
*आई, अंगणातील तुळस*
*आई, मंदिराचा कळस*
*आई, तू भजनात गुणगुणारी संतवाणी...,*
*आई, तू वाळवंटात प्यावं अस थंडगार पाणी...,*

-शैला मिर्झापूरे,
यवतमाळ शहराध्यक्ष, भाजप महिला आघाडी.




## आई मार्गदर्शक गुरू!

आई म्हणजे दुसरे काहीही नसून साक्षात परमेश्वरच. कधी कुठलीही वेदना झाल्यास तोंडी आई गं हेच वाक्य येते. आपण हे जग पाहतो ते आईमुळेच. 'आई म्हणजे जन्माची शिदोरी, जीं सरतही नाही अन् उरतही नाही.'

आई अत्यंत शांत, प्रेमळ व संयमी उलट वडील कडक व शिस्तप्रिय होते. आई मंदा रामदास राऊत आज 73वर्षांची झाली. आम्ही 3 भावंडे, पुतणे व भाचे ह्यांचे शिक्षण तिनेच केले. आम्हा तिन्ही भावंडांना उच्च शिक्षित करण्यासाठी आईने अत्यंत काटेकोर प्रपंच करून अपार कष्ट घेतले. सुनांसोबत नातवांसोबत ती हसतखेळत वावरते. नातेवाईक, शेजारी या सर्वांशी आईचे संबंध अत्यंत सलोख्याचे व दृढ राहिलेले आहेत. आईला वाचन, विणकाम तसेच विविध छंद जोपासण्याची आवड आहे. मी आजपावेतो कधीच तिला नकारात्मक विचार करताना बघितले नाही. आई नेहमीच लहानसोबत लहान तर मोठ्यांसोबत मोठी होऊन आनंद घेते. जरी परिस्थिती बेताची असली तरी तिने प्रपंच अत्यंत नीटनेटका व समंजसपणे केला. नातेवाईक, शेजारी व मित्र ह्यांचे चांगल्या गोष्टींबद्दल मनापासून कौतुक करण्याचे तिनेच आम्हाला शिकविले. आजही या वयात माहेरी गेल्यास आवडीनिवडीनुसार विविध पदार्थ आवर्जून खाऊ घालते. संसार म्हणजे आयुष्यात विविध प्रसंगी करावी लागणारी तडजोडच असते त्यामुळेच प्रपंच सुखमय होतो अन्यथा नाते तुटते हे सुद्धा ती सांगते. मतभेद झाल्यास विसरून जावे व शांत राहावे, हे सांगण्याचे ती विसरत नाही. मुलाला वाढवताना कसे वाढवावे हे शिकवणारी आई. सुरुवातीला सुनील अत्यंत कडक होते, तेव्हा आपल्या चांगल्या वागण्याने माणूस बदलतो हे तिनेच मला शिकविले. आपल्या चुका आजही आई हळुवारपणे लक्षात आणून देते. आईची कधीही कुणाबद्दलही तक्रार नसते हा समंज्यसपणा कौतुकास्पद नक्कीच आहे. आईचे प्रेम सर्वांनाच हवे असते कारण तिथेच तर प्रेम, जिव्हाळा, माहेर व जगण्याची ऊर्जा मिळते. म्हणूनच बाहेर लख्ख दिव्यांची आरास असूनही देवघरातील समईच्या तेजापुढं आपण नतमस्तक होता. आई तुला साष्टांग दंडवत!



-विद्या सुनील खडसे,
जिल्हाध्यक्ष, अंकुर

## अनाथांची माय, गरजवंताचा आधार

### बावीस वर्षांपासून पितृत्व हरविलेल्या बालकांना मायेची ऊब आणि मोफत शिक्षण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

✦ उमेश इंगोले




**नेर (परसोपंत), दि. 10 :** 'जे का रजले गांजले, त्यासी म्हणजे जो आपुले, तोची साधू ओळखावा, देव तेथेची जाणवा' या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या अभंगाला सार्थ ठरवत नेर शहरातील तंबाखेनगर येथील कांचन नारायणराव वीर ह्या गेल्या बावीस वर्षांपासून, गरजवंताचा आधार, अनाथांची माय बनून देश घडविण्याचे काम करीत आहे. त्यांच्याकडून शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांमध्ये अनेकांचे आयुष्य सर्वांग सुंदर झाले आहे. मातृत्वदिनानिमित्त त्यांच्याशी साधलेला संवाद.

त्या म्हणतात, ग्रामीण तसेच शहरी भागातील वीटभट्टी कामगार, शिक्षण घेण्याची आर्थिक परिस्थिती नसलेल्या कुटुंबातील बालके, आत्महत्याग्रस्त पितृत्व हरवलेल्या शेतकऱ्यांची मुले, यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून अशा मुला-मुलींची मोफत निवासाची आणि शिक्षणाची सोय आम्ही केलेली आहे. दरवर्षी, साठ ते सत्तर मुली-मुले आमच्याकडे असतात. त्यांची वर्ग पाच ते वर्ग बारापर्यंत शिक्षणाची सोय आहे. त्याकरिता आम्ही विनाअनुदानित सोपीनाथ महाराज आश्रम शाळा चालवीत आहे. सुरवातीला मी स्नेह आधार चालवीत असायची. नंतर आश्रम शाळांच्या माध्यमातून गरजू मुला मुलांची मोफत शिक्षण, राहण्याची सोय केली. याकरिता लोक सहभाग घेतला जातो. माझ्याकडे असलेल्या दहा एकर शेत जमिनीमधून येणारे उत्पन्न या कमी उपयोगी आणले जाते. शासनाकडे अनुदानाचा प्रस्ताव पडून आहे. परंतु, अजूनपर्यंत शासकीय अनुदान मिळाले नाही. येथून शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांमध्ये काहींचे जीवन घडले आहे. त्यापैकी एक पोलिस निरीक्षक, एक इंजिनिअर, एक पुण्याला बँकेत नोकरीला आहे. पंधरा मुलींनी नर्सिंगचे प्रशिक्षण घेऊन नोकरी करीत आहे. तर काहींचे लग्न होऊन आपल्या जीवनात सुखी आहेत. एकूणच या कामामध्ये मन लावून आम्ही काम करतो. शैक्षणिक सत्र सुरू असताना मुलेली आमच्याकडे असतात. बारावीचा निकाल नुकताच लागलेला आहे. यावर्षी आश्रम शाळेतील तीन मुली गुणवत्ता यादीत आल्या आहेत. मुले घडल्याच आनंद खूप मोठा असून याच समाधान आम्हाला आहे, असे त्या सांगत होत्या. जागतिक मातृत्वदिन निमित्ताने कांचन ताई वीर यांच्या कार्याला सलाम.



अजिंक्य भारत
आपलं यवतमाळ ४
रविवार, दि. ११ मे २०२५

CAPTION मातृत्व दिन



नऊ मास उदरी,
संसाराचा भार शिरी।
वेदनांची गाथा,
तरी ओठी अमृतधारा॥

वात्सल्य सिंधू,
प्रेमाचा तू बिंदू।
तुझ्याच पंखात,
जगण्याचे बळ॥

मातृत्वाला वंदन,
तुझ्या असण्यानेच जीवन!

# पिस्तुलांसह दोन तडीपार जेरबंद

## यवतमाळ स्थानिक गुन्हेशाखेची धाडसी कारवाई; पोलिसांच्या सतर्कतेने मोठा अनर्थ टळला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१०:** यवतमाळ जिल्ह्यातून तडीपार केलेले दोन कुख्यात इतिवृत्त गुन्हेगार देशी बनावटीच्या पिस्तुलांसह आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अत्यंत सतर्कतेने सापळा रचून लोहारा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून या दोघांना लोहारा बायपासवरून अटक केली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक काल, (शुक्रवारी) रात्री गस्त घालत असताना, दोन कुख्यात तडीपार गुन्हेगार संशयास्पदरीत्या फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे, पथकाने रात्री सुमारे नऊ वाजता लोहारा-वाघापूर बायपासजवळ, परमाई लॉन्ससमोर सापळा रचला. यावेळी पोलिसांना पाहून पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या दीपक उर्फ भय्या राममनोहर यादव (रा. देवीनगर, यवतमाळ) आणि प्रफुल्ल उर्फ पप्प्या नंदू रावेकर (रा. इंदिरानगर, यवतमाळ) या दोघांना मोठ्या शिताफीने पकडण्यात आले. पंचांसमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता, भय्या यादव याच्या ताब्यातून एक देशी बनावटीचे पिस्तूल (कट्टा) आणि पप्प्या रावेकर याच्या ताब्यातून मॅगझिनसह एक देशी बनावटीचे पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे असा एकूण अंदाजे एक लाख दोन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या दोन्ही आरोपींविरुद्ध लोहारा पोलिस ठाण्यात अप.क्रं. २१०/२०२५ अन्वये भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ सह महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १३५, १४२ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अटक करण्यात आलेले आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वी खून, खुनाचा प्रयत्न यांसारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. भय्या यादव हा तडीपार असतानाही शहरात शस्त्र घेऊन फिरत होता. पोलिसांनी वेळीच कारवाई केल्याने गंभीर गुन्हे घडण्यापासून रोखण्यात यश आले आहे.



### तडीपारी केवळ नावालाच?

- यवतमाळ जिल्ह्यातून अनेक इतिवृत्त गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले असले तरी, प्रत्यक्षात अनेकजण जिल्ह्यातच वास्तव्य करत असल्याचे धक्कादायक वास्तव आहे. विशेष म्हणणे, या तडीपार गुन्हेगारांचा वापर रेती तस्करी, चोरीसारख्या अवैध धंद्यासाठी होत असल्याचीही चर्चा आहे. उमरखेड येथील तीन तडीपार आरोपी वाशीमच्या एका रेती तस्करासोबत काम करत असल्याचीही माहिती समोर येत आहे, याबाबत पोलिस अनभिज्ञ कसे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह!

- न्यायालयाच्या आदेशानुसार तडीपार गुन्हेगारांवर पाळत ठेवून त्यांच्या हालचालींची वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक असते. मात्र, एकदा तडीपारीचा आदेश बजावून गुन्हेगाराला जिल्ह्याबाहेर सोडल्यानंतर पोलिस यंत्रणा त्यांच्या घराची किंवा नातेवाइकांची झडती घेत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे हे गुन्हेगार पुन्हा जिल्ह्यात सहज प्रवेश करून गुन्हेगारी वर्तुळात सक्रिय होतात. त्यामुळे तडीपारीच्या कारवाईची ठोस अंमलबजावणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## थोडक्यात

### मोटार सायकल लंपास

**यवतमाळ:** बसस्थानक परिसरातुन मोटार सायकल लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी मोटार सायकल क्र. एम.एच. २९ एक्यु ०९१८ किंमत ३५००० रूपयाची घटनास्थळावर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही घटना ५ मे रोजी घडली. याप्रकरणी अतुल भानुदास चर्जण (३८) रा. रेणुका नगर दांडेकर ले-आऊट जाम रोड यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्या विरूध्द गुन्हा नोंद केला.

### नांगरणीवरून वाद

**दारव्हा:** नांगरणी वरून वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी शेतातील रस्त्याची नांगरणी का केली का कारणावरून वाद करून फिर्यादीस शिविगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण करून कुऱ्हाडीने पायावर, डोक्यावर मारून जखमी केले. फिर्यादीची बहीण भांडण सोडविण्यासाठी मध्यस्थी गेली असता तिला सुध्दा काठीने मारून जखमी केले. याप्रकरणी छोटु सुरेश कदम यांच्या तक्रारीवरून प्रथम गजानन कदम विरूध्द गुन्हा नोंद केला.

### जीवे मारण्याची धमकी

**दारव्हा:** शेता शेजारी असलेल्या शेजाऱ्या जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी शेतात जात असतांना त्यांच्या रस्ता का नांगरला अशी विचारणा केली असता संगणमत करून जिवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीच्या भावाला दगड उचलुन मारून जखमी केले. याप्रकरणी प्रथम गजानन कदम यांच्या तक्रारीवरून छोटु सुरेश कदम, शारदा डोंगरे विरूध्द गुन्हा नोंद केला.

### दारूच्या पैशातून वाद

**नेर:** दारूच्या पैशातुन वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी दारू पिण्याकरीता पैसे मागीतले असता फिर्यादीने दिले नाही या कारणावरून वाद करून शिविगाळ करून वीट उचलन फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. यापकरणी संजय बाबुलाल पवार यांच्या तक्रारीवरून गवर्धन शंकर चव्हाण विरूध्द गुन्हा नोंद केला.

### ट्रॅव्हल्सने चिरडले

**पुसद:** रूद्रा ट्रॅव्ल्सने इसमाला चिरडल्याची घटना घडली. याप्रकरणी फिर्यादीचा भाऊ हा ट्रॅव्हल्स खाली आराम करीत असतांना रूद्रा ट्रॅव्हल्स क्र. पी. वाय. ई १९५८ च्या चालकाने वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतक याचा अपघात केल्याने तो गंभिर जखमी होवून मरण पावला. याप्रकरणी किसन आनंदा अवसरमोल यांच्या तक्रारीवरून रूद्रा ट्रॅव्हल्स क्र. पी. वाय. ई १९५८ च्या चालकाविरूध्द गुन्हा नोंद केला.

# पुसदमध्ये पूर्ववैमनस्यातून दोघांवर चाकूहल्ला ; एक ठार

## गंभीर जखमीवर नांदेड येथे उपचार; चार आरोपी अटकेत, एक फरार, अल्पवयीन बालकाचाही समावेश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पुसद, दि. १०:** पुसद शहरात गुन्हेगारी वाढत असल्याचे चित्र दिसत आहे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. शुक्रवारी रात्री पैशाच्या देवाणघेवाणीच्या वादातून पाच युवकांनी दोघांवर चाकूहल्ला केला. या हल्ल्यात २४वर्षीय सुमीत सुरेश पवार यांचा मृत्यू झाला, तर नितीन तुंडलायत नावाचा युवक गंभीर जखमी झाला आहे. हृदयाचा थरकाप उडवणाऱ्या घटनेमुळे शहर हादरले असून, पोलिसांच्या कार्यक्षमतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी देव दिलीप श्रीरामे (वय १९), दर्शन दिलीप श्रीरामे (वय १८), एक विधिसंघर्षग्रस्त बालक, प्रेम दीपक हाके (वय १९) आणि चारुदोष राठोड (वय १९) यांनी हा हल्ला केला. यापैकी चार आरोपींना अटक करण्यात आली असून, एक आरोपी फरार आहे. मृत सुमीत पवार यांचे मोठे बंधू शुभम सुरेश पवार यांनी पुसद शहर पोलिस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, काल रात्री आठच्या सुमारास शहरातील नाईक चौकात देव श्रीरामे आणि नितीन तुंडलायत यांच्यात पैशाच्या देवाणघेवाणीवरून वाद झाला होता. मात्र, काही वेळातच हा वाद मिटला आणि नितीन तुंडलायत व सुमीत पवार तिथून निघून गेले. त्यानंतर रात्री साडेआठच्या सुमारास फिर्यादी शुभम पवार, मृतक सुमीत पवार, नितीन तुंडलायत आणि इतर काही तरुण नवल बाबा वॉर्डजवळ बोलत उभे असताना, पाचही आरोपी गाडीवरून तिथे आले आणि त्यांनी सुमीत पवार यांच्या पाठीत चाकूने वार केला. नितीन तुंडलायत आणि इतर तरुण सुमीतला वाचवण्यासाठी धावले असता, नितीनच्याही पाठीत चाकू मारण्यात आला. या झटापटीत मध्यस्थी करणाऱ्या काही तरुणांनाही किरकोळदुखापत झाली आहे. घटनेनंतर जमा झालेल्या तरुणांनी आरोपी देव श्रीरामे याला पकडून पोलिसांच्या हवाली केले. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी सुमीत पवार यांना मृत घोषित केले, तर गंभीर जखमी नितीन तुंडलायत याला पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलवण्यात आले आहे. पुसद पोलिसांनी या प्रकरणी चार आरोपींना अटक केली असून, फरार असलेल्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली आहेत. या घटनेचा पुढील तपास उमरखेडचे उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंत गायकवाड करत आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमिवर आज सकाळी अपर पोलिस अधीक्षक पियुष जगताप यांनी पुसद शहर पोलिस ठाण्यात तळ ठोकून परिस्थितीची पाहणी केली, तर मृताच्या नातेवाइकांनी आणि मित्रांनी पोलिस ठाण्याबाहेर मोठी गर्दी केली होती.



सुरेश पवार

### पुसदमध्ये वाढली गुन्हेगारी

- पुसद शहरातील वाढती गुन्हेगारी ही चिंतेची बाब बनली आहे. आरोपींना पोलिस व कायदा याचा कोणताही धाक नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे. तसेच सदर घटना ही पोलिस स्टेशन पुसद शहर यांच्या काही हाकेच्या अंतरावर रात्री साडेआठ वाजता घडली, हे मात्र विशेष. आता शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून ठोस पाऊल उचलण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# आदिलाबाद येथील हनुमान मंदिरातील चोरी उघडकीस

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १०:** तेलंगणा राज्यातील आदिलाबाद येथील टाऊनमधील हनुमान मंदिरात चोरी करून दागिने विक्री करण्यास पांढरकवडा येथे आलेल्या आरोपीला पांढरकवडा पोलिसांनी ताब्यात घेतले.

दयानंद सूर्यभान आत्राम (वय २८ वर्ष, रा. निपाणी ता. भिमपूर जि. आदिलाबाद राज्य तेलंगणा ह.मु. बोटोनी ता. मारेगाव) असे अटकेतील संशयित चोरट्याचे नाव आहे. दयानंद याने दि. ९ मे २०२५ रोजी रात्रीदरम्यान आदिलाबाद शहरातील हनुमान मंदिरातील हनुमानाचे मूर्तीचे मुकुट, गदा व गोल कडे चोरी केली होती. आदिलाबाद येथील पोलिसांना विचारपूस केली असता पोलिस स्टेशन आदीलाबाद २ टाऊन येथे अपराध कं. २२५/२०२५ कलम ३३१ (४), ३०५ भारतीय न्याय संहितेप्रमाणे दाखल असल्याची माहिती मिळाली. सदरच्या मुद्देमालाबाबत चांदीच्या धातूच्या दागिन्याचे वजनमाप केले असता सदर दागिने हेचांदीच्या धातूचे असून एकूण वजन १०६.१४० ग्रॅम किं. अं. २०हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेतलेला इसम व चांदीचे दागिने आदिलाबाद येथील पोलिसांचे ताब्यात देण्यात आले आहे.



# सैन्याचे मनोबल उंचावण्यासाठी आज 'तिरंगा रॅली'चे आयोजन

## शिवसेनेचा पुढाकार; पालकमंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वात रॅली

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १०:** काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवून पाकिस्तानमधील दहशतवादी कारवायांची केंद्रे उद्ध्वस्त केले. त्यानंतर सीमेवर निर्माण झालेल्या युद्धजन्य स्थितीत शत्रूराष्ट्राला भारतीय सैन्य कडवी झुंज देत आहेत. अशावेळी राष्ट्र प्रथम ही भावना मनात बाळगून सर्व भारतीय जनता सैन्यासोबत आहे, हा संदेश देण्यासाठी शिवसेनेच्या वतीने 'तिरंगा रॅली' काढून सैन्यास मानवंदना दिली जाणार आहेत.

शिवसेना पक्ष मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून उद्या रविवार, दि ११ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात शिवसेना पक्षातर्फे, भारतीय सशस्त्र दलाला मानवंदना अर्पण करण्यासाठी 'तिरंगा रॅली'चे आयोजन करण्यात आले आहे. यवतमाळ येथे राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वात ही रॅली काढण्यात येणार आहे. येथील गार्डन रोडवर नाट्यगृहाच्या शेजारी शिवाजी महाराज पुतळ्याजवळून सकाळी ८.३० वाजता ही रॅली निघणार आहे. यवतमाळशहरातील प्रमुख मार्गांनी मार्गक्रमण करीत सीमेवरील सैन्याला मानवंदना दिली जाणार आहे. त्यानंतर संविधान चौकात रॅलीचा समारोप होणार आहे. सध्याच्या युद्धजन्य स्थितीच्या काळात देशातील सैन्याचे मनोबल वाढविण्याकरिता सर्वधर्मीय, सर्वपक्षीय संघटना, सामाजिक संस्था, कर्मचारी, विद्यार्थी, युवकांसह, शेतकरी, व्यापारी, महिला भगिनी, नागरिकांसह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी पदाधिकाऱ्यांनी या रॅलीत सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, जिल्हाप्रमुख श्रीधर मोहोड, माजी जिल्हाप्रमुख पराग पिंगळे यांनी केले आहे.

CAPTION तिरंगा रॅली...




**यवतमाळ :** देशाच्या संरक्षणासाठी सदैव सज्ज असलेल्या भारतीय सैनिकांचे मनोबल उंचावण्यासाठी, तसेच वंचितचे पक्षप्रमुख बाळासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून वंचितचे जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वात शहरातून तिरंगा बाईक रॅली काढण्यात आली. तरुणांनी हातात तिरंगा घेऊन 'भारत माता की जय, वीर शहीद अमर रहें' अशा दिलेल्या घोषणांनी शहर दणाणून गेले.

# यवतमाळ शहरातील बसस्थानकावर बॉम्बचा थरार!

## युद्धजन्य परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी पोलिसांची रंगीत तालीम, प्रवासी हादरले

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ गणेश खडसे

**यवतमाळ, दि.१०:** यवतमाळ नवीन बसस्थानक परिसरात आज (शुक्रवारी) सकाळी बॉम्बसदृश वस्तू आढळल्याच्या वृत्ताने वृत्ताने प्रचंड खळबळ उडाली, काही काळ प्रवासीही भयभीत झाले होते. मात्र, हा प्रकार जिल्हा पोलिस दलाने आयोजित केलेल्या रंगीत तालमीचा (मॉक ड्रिल) एक भाग असल्याचे नंतर स्पष्ट झाले.

संभाव्य दहशतवादी हल्ला किंवा बॉम्बस्फोटासारख्या आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी पोलिस यंत्रणेच्या सज्जतेचा आढावा घेण्याकरिता ही रंगीत तालीम सकाळी ११ ते दुपारी १२च्या दरम्यान घेण्यात आली. तालमीनुसार, पोलिस नियंत्रण कक्षाला शहरातील नवीन बसस्थानकाच्या वाहनतळावर घातपात करण्याच्या उद्देशाने एका अज्ञात इसमाने बॉम्ब असलेली बॅग ठेवल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच, जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक पियुष जगताप, पोलिस उपअधीक्षक (गृह) विजय नाफडे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या मार्गदर्शनात पोलिस यंत्रणा तत्काळ घटनास्थळी पोहोचली. बॉम्ब शोधक व नाशक पथक आणि श्वान पथकाने संपूर्ण परिसराची घातपातविरोधी तपासणी केली. काही काळ चाललेल्या या थरारनाट्यामुळे बसस्थानकावरील प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. अखेर, ही केवळ रंगीत तालीम असल्याचे मेगाफोनद्वारे जाहीर केल्यानंतर नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. या सरावामध्ये दहशतवाद विरोधी शाखेचे प्रमुख, सहाय्यक पोलिस निरीक्षक सारंग बोंबीलवार, बॉम्ब शोधक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक उल्हास परांडे, श्वानपथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक संजय ढवणे, विविध पोलिस ठाण्यांचे निरीक्षक सतीश चवरे, रामकृष्ण जाधव, प्रशांत कावरे, यशोधरा मुनेश्वर, नरेश रणधीर, जिल्हा वाहतूक शाखेचे ज्ञानोबा देवकाते, अंगुलीमुद्रा विभागाचे ज्ञानेश्वर मुंडाले, वैद्यकीय अधिकारी आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी सक्रिय सहभाग घेतला.





### सतर्कता बाळगा, अफवा टाळा!

- अशा आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी घाबरून न जाता प्रसंगावधान राखून पोलिसांना सहकार्य करावे. कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा व्यक्ती आढळल्यास तत्काळ पोलिस नियंत्रण कक्ष यवतमाळ (फोन नं. ०७२३२-२४२७००) किंवा डायल ११२ वर संपर्क साधून माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी केले आहे.

# भीषण अपघातात एकजण ठार

**पुसद, दि. १० :** रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्याला भरधाव व निष्काळजीपणे चालवलेल्या पांढऱ्या रंगाच्या कारने पाठीमागून धडक दिल्याने तो गंभीर जखमी होऊन मरण पावला. पुसद शहरात ही दुर्दैवी घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मृत व्यक्तीचे नाव सुनिल देवराव चव्हाण असे आहे. तो रस्ता ओलांडत असताना एम.एच. २९ बी.पी. ७२४६ क्रमांकाच्या कारने त्याला जोरदार धडक दिली. यात सुनिल गंभीर जखमी झाला आणि त्याचा मृत्यू झाला. सुरज देवराव चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात कारचालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.